मराठेशाहीतील वेचक वेधक

य.न.केळकर



Anusaya Diamond Publications

अनुक्रमणिका :

१. प्रशासक शिवाजी महाराज

२. हा आदर्श राज्यकर्त्यांनी पुढे ठेवावा

३. भवानी तलवार : अस्सल ऐतिहासिक सत्य काय आहे ?

४. संभाजी महाराजांची समाधी

५. महाराष्ट्राचा वैभवशाली राष्ट्रीय सण - मराठेशाहीतील दसरा

६. उद्‌गीर लढाईसंबंधीची अस्सल अप्रसिद्ध पत्रे व विजयदुर्ग किल्ल्याची माहिती

७. आपल्या पूर्वजांची खेळकर वृत्ती दाखविणारे मराठी इतिहासातील विनोदी प्रसंग

८. ऐतिहासिक काळच्या स्त्रियांची खाजगी मनोरंजक पत्रे

९. श्रीगणेशकोश : मराठेशाहींतील गणेशदर्शन

TG : MarathaArchives

२०६०५
३१०२६.

प्रशासक
शिवाजी महाराज

शिवाजी महाराजांच्या गुणांचे आणि त्या गुणांच्या विविध पैलूंचे विशदीकरण अनेक तऱ्हांनी करता येते. व्यक्ती आणि राजा अशी महाराजांची दोन रूपे बघितली तरी ती मोठी आल्हादकारक आणि बोधप्रद ठरतात. व्यक्तिश: महाराज हे मातृपितृभक्त, वृद्धांची मर्यादा सांभाळणारे, दृढनिश्चयी, योजिलेले काम यशस्वीपणे शेवटास नेणारे हुन्नरी, प्रसंगपरत्वे वागणुकीला कमालीचे करडे परंतु सर्वसामान्यत: ममताळू असे होते. तर राजा म्हणून त्यांचे तसेच दुसरे काही विशेष प्रकारचे चित्र दिसते.

- प्रशासन हे राजाचे मुख्य कार्य, ते प्रशासन त्याच्या प्रजेला सुखकारक वाटणे यातच त्याच्या प्रशासनाची कसोटी लागते. पराक्रम करून स्वराज्याचा मुलूख वाढविणे या कामाबरोबरच स्वराज्यातली प्रजा संतुष्ट आणि एकनिष्ठ राखणे हेही त्याचे कर्तव्य असते. महाराजांनी सतत पाच पातशाह्यांशी दावा लावला होता यामुळे 'अहोरात्र आम्हा युद्धाचा प्रसंग' अशी त्याची स्थिती होती. त्यांची सर्व कारकीर्द स्वाऱ्या शिकाऱ्या, लढाया, मोहिमा यांनी गजबजून गेली होती. त्यांच्यावेळी महाराष्ट्र सदा युध्यमान असल्यामुळे शत्रूच्या मुलुखात महाराजांच्या धाडी पडत. त्याच्याप्रमाणे शत्रूच्याही धाडी स्वराज्याच्या मुलुखात पडत अशी सदा अस्वस्थ स्थिती असताही महाराजांचे मुलकी प्रशासन व्यवस्थित चालत असे. आणि यामुळेच त्यांना उत्तम प्रशासक म्हणतात.

- महाराजांच्या प्रशासनाचे वैशिष्ट्य हे की पूर्वापार चालत आलेल्या न्यायनीतीत किंवा कानुकायद्यात त्यांनी उलथापालथ केली नाही. महाराजांनी वतने, इनामे, अमानत किंवा जप्त केली व ही मोठी सुधारणा त्यांनी धमक दाखवून अंमलात आणली. असे सांगण्याची अलीकडे एक फॅशनच पडली आहे. परंतु ती गोष्ट वस्तुस्थितीला धरून नाही. वतने त्यांनी अमानत केली किंवा जप्त केली याचा अर्थ काही काळपर्यंत ती वतने किंवा इनामे सरकारने ताब्यात घेतली. कायमची गिळंकृत किंवा सरकारजमा केली असा नाही, व महाराजांच्या काळी तसे करणे अशक्यच होते.

कारण वतनदार हे भूमीपुत्र समजले जात! जणू काही त्या भूमीबरोबरच ते

उत्पन्न झाले अशी सर्वसंमत भावना असे. यामुळे मुलखाचा राजा बदलला किंवा राजवट फिरली तरीही वतनदारांच्या वतनांना धोका नसे. नवे राज्यकर्तेही प्रथम अंमल बसवताना आधी जुन्या वतनदारांना अभयाचे आश्वासन किंवा कौल दैत. महाराजांनी त्या जुन्या दंडकात ढवळाढवळ करून प्रजेचा हक्क हिरावून घेतला नाही व तिला असंतुष्ट केले नाही.

जुनी पूर्वापार कायदेपद्धती आणि न्यायनिर्णयपद्धती महाराजांनी तशीच पण निःस्पृहपणे चालविली. फौजदारी पद्धतीच्या गुन्ह्यांची चौकशी करताना किंवा शिक्षा करताना तत्कालीन राजे लोकांना स्वातंत्र्य असे. परंतु आचारधर्माचे खटले सर्व प्रजेतील गोताकडून त्या त्या जमातींच्या पंचाकडून सोडविले जात व त्यांचा निर्णय अंमलात आणणे एवढेच राजाचे कर्तव्य होते. त्यावेळी वाद पडला तर प्रथम गावचे लोक म्हणजे गोत किंवा गावपंचायत निर्णय देई. तो निर्णय एखाद्याला-वादी किंवा प्रतिवादीला पटला नाही तर भोवरगावचे म्हणजे भोवतालच्या गावचे गोत जमवून त्यांची सभा घेऊन निर्णय होई. समजा तोही निर्णय कोणाला मानला नाही तर आसपासच्या देशमुख, देशपांड्यांच्या सभेकडे ते काम जाई आणि तेथेही निर्णय न झाला तर मग तो दावा राजाकडे जाई. मग राजा आपला न्यायाधीश देऊन ज्युरीसारखे पंच नेमून निर्णय करावयास लावी, व जो निर्णय ठरेल तो राजा सत्तीने अंमलात आणी. जाती-जमाती, पंथ परंपरा यांचे वाद त्यांच्या जातीजमातीतील पंचांकडूनच तोडले जात. सगळ्यात किचकट आणि चिरंजीव वाद वतनांचा! ते पिढ्यान्‌पिढ्या चालत. त्यांच्या चौकशीत पुरावा पुरेनासा झाला म्हणजे मग शेवटी दिव्याचा अवलंब केला जाई. दिव्याचे अनेक प्रकार होते. पण रव्याचे दिव्य सर्वसामान्य वापरात असे. त्याबाबत तेव्हांची म्हणच अशी की. 'दिवसात दिवा नाही आणि साक्षीस रवा नाही.' याचा अर्थ दिवसाच्या प्रकाशात वस्तूचे खरे स्वरूप तत्काळ उमगते त्याप्रमाणे वादात साक्षीदार आणता आले म्हणजे मग निर्णय घेण्यास म्हणजे खरे खोटे निवडण्यास सोपे मग काही रवा काढण्यास लावण्याचे कारण नाही म्हणजे दिव्य देण्याची जरूरी नाही. रवा म्हणजे सोन्याचा तुकडा, तो तुकडा उकळत्या तेलातून हाताने उचलून बाहेर काढणे याला 'रवा काढणे' किंवा 'रव्याचे दिव्य घेणे' म्हणत. रवा काढल्यानंतर त्या माणसाच्या हाताला पंचांसमक्ष रवलेल्या म्हणजे लखोटे घालून त्याला पहाऱ्यात ठेवत व दुसऱ्या दिवशी पंच हात तपाशीत. हाताला फोड आले किंवा इजा झाली तर तो मनुष्य 'दिव्यास लागला' म्हणजे वादात हरला, खोटा ठरला असा निर्णय समजला जाई.

सारांश रूढ आचारधर्मात महाराजांनी ढवळाढवळ वा प्रत्यक्ष हस्तक्षेप कधी केला नाही. राजा म्हणून किंवा सत्ताधीश म्हणून क्वचित एखाद्यावेळी न्याय देण्यास विलंब लावणे. एवढेच महाराजांनी केले असेल. यासंबंधी एक उत्तम उदाहरण कोंडे

देशमुखांचा जो अप्रतिम करिणा प्रसिद्ध आहे त्यात आलेला आहे. वा कोंड्यांपैकी एक वादी महाराजांना भेटला व त्याने वांध्यात पडलेल्या आपल्या वतनाच्या वादाची सर्व हकीकत महाराजांना सांगितली. महाराजांनाही त्याची बाजू पूर्ण सत्य आहे ही खात्री पटली परंतु तत्काळ त्याच्याप्रमाणे निकाल करण्यास मात्र महाराज उद्युक्त झाले नाहीत. याचे कारण महाराजांचे सरकारकून म्हणजे कारभारी मंडळातले लोकच त्या वादाबाबत संबंधी किंवा पक्षपाती होते! म्हणून त्यांना सत्य निर्णय अंमलात आणणे अशक्य झाले. महाराजांनी वादीची परोपरीने अशी समजूत घातली की 'मी आत्ताच तुझ्यासारखा निर्णय दिलातर माझे कारभारी बिथरतील आणि माझ्या शिजविलेल्या राजकारणाला हिसका बसेल! एक तऱ्हेने "Justice delayed is justice denied' म्हणजे न्यायदानात दिरंगाई करणे म्हणजे तो अन्यायच करणे होते. परंतु राजकीय मोठ्या कामाचे वेळी अशी चालढकल करणे नाप्राप्त होते, त्याला इलाज नसतो. मोठ्या चांगल्या गोष्टीच्या प्राप्तीकरता किंवा सिद्धीकरता छोट्या चांगल्याचा बळी जातो त्याला कोणाचाच इलाज नसतो. महाराजांनी कोंडे देशमुखांचा दावा खरा आहे हे मान्य केले परंतु तसा निकाल देण्याचे मात्र टाळले. कालांतराने राजकीय पेच सुटल्यानंतर त्या वादीला सत्य तो निर्णय मिळाला असेल.

पण अशा गोष्टी शिवचरित्रात केवळ तुरळकच आहेत. आचार-धर्म सोडला तर व्यवहारधर्मात मात्र महाराजांनी न्याय न सोडता निःस्पृहपणे निर्णय घेऊन शिक्षा कठोर रीतीने अंमलात आणल्या. उदा. त्यांचा एक सरदार किंवा नोकर शेकूजी गायकवाड याने परद्वार केले. म्हणजे व्यभिचार केला तेव्हा त्यांनी ताबडतोब त्याचे डोळे काढविले! खंडोजी खोपड्याने फितुरी केली तेव्हा त्यानी तात्काळ त्याची डावी-उजवी केली म्हणजे उजवा हात व डावा पाय तोडला. असा त्यांचा करडा कारभार होता. त्यांचे सरकारी नोकर तर फारच भिऊन वागत असत. लाचलुचपत किंवा कुमार्गाने सरकारी अधिकाऱ्याने संपत्ती मिळविल्याची कुणकुण लागताच महाराज त्यास भयंकर शासन करीत. या संबधीचे आत्तापर्यंत अप्रसिद्ध असे अगदी नवीनच उदाहरण माझ्या संशोधनात मला सापडले आहे. ते सांगितले म्हणजे पुरे,

बारा मावळ्यांच्या पाहणी तपासणीचे काम महाराजांनी आपला वासु मुत्सद्दी आण्णाजी दत्तो यास सांगितले. त्यानुसार आण्णाजी दत्तो ठिकठिकाणी जाऊन तपास करीत असता तुकोपंत लोणकर नावाच्या मुजुमदाराने वाममार्गाने फार संपत्ती मिळविल्याची कुणकुण त्यांच्या कानावर गेली. अण्णाजी दत्तोने वरकरणी लोणकराला काही थांग लागू दिला नाही, उलट त्याचा थोडा गौरवच केला. तेव्हा तुकोपंताने अण्णाजी दत्तोस मोठी टोलेजंग मेजवानी केली. त्याचे वर्णन अस्सल करण्यात केलेले मोठे वाचनीय आहे. ते असे - "भोजनसमयी जेवावयास केळीची पाने रुप्याची, - *सुमारसाठी म्हणजे संख्या साठ.* दरपात्री रुप्याच्या वाटा-सुमार पाच येणे प्रमाणे

अण्णाजीच्या पंगतीस व वरकड गृहस्थास रूप्याचे चेंबू व गड्डू. बहुत प्रकार भोजनास केले होते. अण्णाजी दत्तो तुकोपंताची लक्ष्मी देखोन दंग झाला! भोजन जाहलियावर विडे घेतले तेच समयी अण्णाजी दत्तोने आपल्या भोजनाचा हिशेब सहा सजगाण्या झाला असे ठरवून तितके रूके ओसरीवर ठेवले आणि तेथल्या तेथेच तुकोपंताच्या घरावर चौकी बसविली आणि शिवाजी महाराजास लगोलग लिहून पाठविले की तत्काळ हुजरे पाठविणे. तुकोजी लोणकर बारा मावळचा मुजुमदार पण त्याचे घरी मालयेत अपरंपार आहे. हुजरे पाठवणे त्यावर महाराजांनी हुजरे पाठवून तुकोपंतास हुजूर नेऊन त्याला त्याच्या संपत्तीचा जाब विचारला. परंतु तुकोपंताला समाधानकारक हिशेब सांगता आला नाही. म्हणून महाराजांनी त्याचा रोजगार तर कांढलाच पण त्याची सर्व मालमत्ता जप्त करून खेरीज चाळीस हजार होन दंड त्याच्याकडून वसूल केंला. एवढेच नव्हे तर त्याला वाराणशीस जाण्यास फर्माविले. त्याकाळी काशी-वाराणशीस पाठविणे म्हणजे दूर अंदमानात काळ्या पाण्यावर पाठविण्यासारखीच ती कडक शिक्षा होती. या एकाच उदाहरणावरून महाराज उत्तम प्रशासक कसे होते ते स्वच्छ दिसून येईल,

एका ऐतिहासिक म्हणीत 'कायदा थोडा पण अंमल करडा' असे सुराज्याचे वर्णन आलेले आहे. महाराजांच्या काळीही कायदे थोडेच असत. आजच्याप्रमाणे कायद्यांचे अफाट जंगल नव्हते. आणि जंगलात चोरवाटा सहजच वाटेल तेवढ्या निर्माण होतात. कायद्याचा अंमल कडक होत नसल्यामुळे स्वार्थ साधणाऱ्या लबाडांची संख्याही चक्रवाढीने वाढते. प्रजेला पोटापुरते खायला मिळाले, निवाऱ्याच्या जागी निर्धास्त राहता आले आणि व्यक्तिश: सुरक्षितता लाभली म्हणजे ती प्रजा आपल्या राजाशी एकनिष्ठ राहते.

शिवाजीमहाराजांची प्रजा त्यास एकनिष्ठ राहिली याचे बीज कायद्यांचा अंमल त्यांनी कठोरपणे निस्पृहपणे केला यातच आहे. आणि म्हणूनच त्यांना थोर प्रशासक म्हणतात.

❑

'एकता' जून १९७४

TG : MarathaArchives

हा आदर्श राज्यकर्त्यांनी पुढे ठेवावा !

"कायदा थोडा पण अंमल खडा" असे एका जुन्या म्हणीत सुराज्याचे वर्णन केलेले आहे. सध्या आपण 'स्वराज्या'त आहो परंतु 'सुराज्या'त आहो असे मात्र म्हणता येईलसे वाटत नाही! आणि तसे वाटण्याला मुख्य कारण हे की कायद्याचा अंमल कडकपणे होत नाही. कायदे इतके अनंत झाले आहेत की सामान्य मनुण्याला सामान्य व्यवहार करतानाही काही चुकत तर नाहीना, अशी पदोपदी भीती वाटते. कायद्याचे जंगल अफाट पसरलेले आहे म्हणूनच त्यात शेकडो चोरवाटाही सहज निर्माण होतात; आणि कायद्याचा अंमल कडक होत नसल्यामुळे स्वार्थ साधणाऱ्या लबाडांचीही संख्या चक्रवाढीने वाढत आहे. अशा या दुर्दशेच्या काळात स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या स्वराज्यात सुराज्य नांदत होते. म्हणूनच ते सर्वत्र यशस्वी होत गेले. प्रजेला पोटापुरते खायला मिळाले, निवाऱ्याच्या जागी निर्धास्त राहता आले आणि त्याला व्यक्तिशः सुरक्षितता लाभली म्हणजे ही प्रजा आपल्या राजाशी एकनिष्ठ राहते. शिवाजी महाराजांनी या तिन्ही गोष्टी प्रजेस उपलब्ध करून दिल्या. त्यांच्याकाळी कायदे फारच थोडे होते व अगदी ढोबळ होते. परंतु या कायद्यांचा अंमल शिवाजीमहाराज अगदी निःस्पृहपणे कठोर रीतीने करीत म्हणून प्रजेला "जगभयनिर्भयमय नाही कोणाला, उघड्या ताटी करि निद्रा।" असे स्वास्थ्य लाभले; आणि हा अंमल ते कसा चालवीत याचे एक अत्युत्कृष्ट उदाहरण मला माझ्या संशोधनात नवीनच उपलब्ध झाले आहे.

हा ऐतिहासिक अस्सल पुरावा म्हणजे एक अस्सल करीणा असून तो जुन्नरकर देशपांड्यांच्या दप्तरात नव्यानेच मिळाला. त्या वाममार्गाने इस्टेटी करणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांवर पाळत ठेवून गुन्हा शाबीत होताच किती त्वरित गुन्हेगाराला महाराज उग्रशासन करीत ते प्रत्ययास येईल.

पुढे देत असलेल्या करिण्याता किंवा वाक्यात (वाका किंवा करिणा म्हणजे जशी घडली तशी हकिकत निवेदन करणे) खुद शिवाजीमहाराजांचा कारभार आणि त्यांचे पुत्र संभाजी महाराजांचा कारभार दोघांच्याही हकिकती आल्या आहेत. त्यांची मनोमन तुलना वाचक करतीलच.

"कमावीसदाराची चर्या (व्यवहार) व लक्ष्मी (मी) पाहोन येईन" असे अण्णाजी दत्तोने महाराजास कळविले. त्यावर आनाजी दत्तो सुरनीस, पाहाणीस माहालो माहालास निघाला. इकडे अगोधरच तुकोपंताची कन्या उपवर झाली होती ते (ती) सको भिकाजी, नारो भिकाजी, नऱ्हेकर देशपांडे, खेडे बारेकर यांचे घरी दिघली. त्याचा पुत्र गोविंद सखाजी याजला. ते संपत्यवान होते, त्यावर आनाजी दत्तो पाहाणी करीत आले. बरकड कमावीसदार अण्णा दत्तो आपल्या गावास आजि उद्या येईलच तो आपण जरारेच (सडे) संपत्य झाकून असत! (म्हणजे फरारी होऊन तोंड चुकवीत व संपत्ती दडवून ठेवीत.) अण्णाजी दत्तो फिरत फिरत मावळात गेला. तुकोपंतांनी त्यास मेजमानी केली. आपली संपत्य होती ते काही त्याने झाकली नाही. भोजनसमयी जेवावयास केळीची पाने रुप्याची, सुमारे साठ (साठी) दरपात्री रुप्याच्या वाटिया सुमार पाच, येणेप्रमाणे पंक्तीस अण्णाजीस व वरकड गृहस्थास त्याजला रुप्याचे चेंबू व गड्डू, खाशियासी ठेवला (अण्णाजी दत्तोला) बहुत प्रकार भोजनास केले. अण्णाजी दत्तो भोजनसमयी लक्ष्मी देखोन दंग झाला! भोजन जाहलियावर विडे घेतले ते समयी चौकी आणून घरी बैसविली. आपल्या भोजनाचा हिशेब खाशियांच्या केला त्यास रु.।।। .।।।. (पाऊण रुपया) सहाजगाण्यात झाला ते रु. ।।। (पाऊण रुपया) आणून वसरीवर ठेवून घर जप्त केले! शिवाजी महाराजास लिहून पाठविले की हुजरे पाठविणे. तुकोजी कृष्ण लोणकर, बारा मावळचा मुजुमदार याचे घरी मालयेत (संपत्ती) फार आहे ते घेऊन येऊ. "त्यावर महाराजांनी हुकूम पाठविला की ते मालयेत घेऊन येणे" आणि हुजरे पाठविले आणि तुकोपंतास त्यांनी लिहिले. "तुम्ही हुजूर येणे–" त्यावर अण्णाजी दत्तो ते मायलेत येऊन तुकोपंतासह हुजूर महाराजापाशी गेले. महाराजांनी मालयेत घेऊन (जप्त करून) खंड (दंड) होन चाळीस हजार घेतलो!! आणि तुकोपंताचा रोजगार दूर केला! तुकोपंतास महाराज बोलले की तुम्ही वाराणसीस जाणे!! (त्याकाळी काशी वाराणशीस पाठविणे म्हणजे अंदमान बेटात काळ्या पाण्यावर पाठविण्यासारखेच होते, तिकडील यात्रा करून जिवंत परत येणे मुश्कील असे.)

तुम्हास खर्चास होन पाचशे देतो. तुम्ही तेथून आलियावर तुम्हास रोजगार सांगू. महाराज (बारा मावळच्या) सुभेदारावर इतराज झाले. त्यांनी त्याचा सुभा दूर करून आणिक (दुसरे; बदला) कमावीसदार सुभेदार, मजुमदार, तिकडे पाठविले. महाराजांनी तुकोपंतास काशीस जावयास निरोप दिला - खर्चास सरकारांतून देत होते त्यास (परंतु) तुकोपंत बोलले की, "आपण वडिला वडिलांपासून चाकर, महाराजांच्या वडिलांचे आहो. पिढी दर पिढी चाकरी भोसल्याच्या दरबारात करीत आलो आहो- महाराजांचे नाव पदरी आहे. (तेव्हा) खर्चास घेऊन कशास काशीस जावे? महाराजांच्या हुकुमावरून महायात्रास जातो. तेथून आलियावर महाराज समर्थ आहे. अन्नवस्त्राची बेजमी सर्व महाराज करतील. आपण चाकरी महाराजांच्या दरबारावेगळा. दरबारा वेगळी कोणाचीच करणार नाही; आणि माझ्या वडिलांनी भोसल्याच्या दरबारा-वाचून चाकरी आणिक (अन्य) दरबारात केली नाही."

मग निरोप महाराजांचा घेऊन तुकोपंत महायात्रेस गेले. बहिरो विठ्ठलही आपल्या घरास आले. भीमेपलीकडे कौलात मोगलाईच्या माणसे ठेविली होती तेथे आले. तुकोपंतानी २ महिने राहून आपला मोहसबा (हिशेब) माहालचा बहिरोपंताकडून देऊन आपले अंगी लांझा (आरोप) कवडीचा नाही ऐसे महाराजास विदित केले. ऐसे असता आनाजीपंतानी माझे घर नाहाक बुडविले" इतके बोलून महायात्रेस गेले. तिकडे त्यास यात्राकरासी (यात्रा करावयास) दोन अडीच वर्षे लागली तो मागे शिवाजीमहाराजास देवाज्ञा झाली.

राज्य विज्वर झाले (अराजक, बेदाद) महाराज संभाजी राजे राज्य करू लागले. सिंहासनी बैसले. त्यांच्या राज्यात चाकरी करावयासी बहिरो विठ्ठल लोणकर उमेदवार जाले. सांगाते एक ब्राह्मण दोघे माणसे घेऊन महाराजांच्या दरबारास आले. तेथे पेशवे, सुरनीस आठ प्रधान यांच्या उपार्जन (आर्जव) सरकारकून त्यांची केली. त्यास ते (सरकारकून अष्टप्रधान) बोलले की "या राज्यात काही आपली रदबदल चालत नाही! अवघी रदबदल कवि कलस कबजीबावा याजकडे जाली आहे. त्याकडे जाणे, त्याची उपार्जना करणे, ते रोजगार सांगतील–" त्यास कबजीबावानी पद्धत पाडली होती की जो रोजगार मागावयास येईल त्याने आपणास येऊन भेटावे आपण त्यास प्रायश्चित देऊ. आमचे पंक्तीस आमच्या बायकोच्या हाते भोजन घालू. मग त्यास रोजगार सांगू.

असा प्रकार पाहिला म्हणून बहिरो विठ्ठल कबजीबावाकडे गेले नाहीत. त्याची भेट घेतली नाही मग मनसुबा महाराजांचा (असा) जाला की कोकणात जावे. त्यास गांगोलीच्या घाटे कोकणात चालले. बहिरो विठ्ठलाची महाराजाची भेटी होईना. मग बहिरो विठ्ठल लष्कराबरोबर चालले. त्यास गांगोलीच्या घाटमाथा मुक्काम झाला. तेथे त्यानी विचारलं की (बहिरोपंताने विचार केला की) कसी तरी (कोणच्याही रीतीने) महाराजांची भेटी घ्यावी. आपुल्या स्वमुखे चार गोष्टी महाराजस सांगाव्या. महाराजांनी रोजगारा दिधला तर करून जावे अगर आपल्या ठिकाणास जावे."

(असा विचार करून) प्रात:काळी कूच होताच आपण पुढे घाटी जाऊन वाटेवर एके घोडियावर बैसला. तो (इकडे) महाराजाचे कूच ही झाले. लष्कर वाटेने चालले. त्यावर महाराजांची पालखी येताच बहिरो विठ्ठलाने उडी टाकून जाऊन महाराजांचे पालखीची दांडी धरून पालखी उभी केली! त्यास महाराज बोलले की

माझे पालखीची दांडी धरून पालखी का उभी केली. तू आहेस कोण? ''त्यास हा बोलला की मी लोणकर विठ्ठल कोरदेव याचा पुत्र. माझे नाव बहिरो विठ्ठल.'' ''झालास लोणकर तर माझी पालखीची दांडी धरून पालखी उभी करावयाचे प्रयोजन काय?'' हा बोलिला की, ''रोजगार कारणे आलो आहो. महाराजांच्या दरबारात दोन महिने येऊन बसलो आहोत. कोठे माझ्या रोजगाराची योजना येत नाही.'' महाराज बोलले, ''सरकारकूनाकडे जावे (जावयाचे) होते. त्या वर्तमान सांगोन रोजगाराची योजना करावी (करावयाची) होती (होतीस).'' त्यावर हा बोलला, ''मी २ महिने सर्वांच्या घरात जाऊन उपार्जना केली. ते सर्व बोलले की 'आमचे हाती काही नाही. अवघाअवघा कारभार (झाडून सारा) कबजीबावाकडे झाला आहे. त्याचकडे जाणे, ते तुम्हास रोजगार सांगतील.'' मनोदय की कबजीबावाकडे जावे त्याची भेटी घ्यावी पण कबजीबावा आधी प्रायश्चित देऊन आपले पंक्तीस भोजनास घालून मग रोजगार सांगू असे म्हणून लागला. ते मला पुरवेना- मग चित्तांत आले की महाराजांचीच भेट घेऊन स्वमुखे विनंती करावी. पण आपली भेट घ्यावी तर दरबारात देवडीस मला कोणी येऊनच देईना! असा २ महिने हैराण झालो. या करता महाराजांच्या दर्शनास असा झालो आहे.''

(हा करिणा अति महत्त्वाचा विश्वसनीय असला तरी तो त्रुटितच उपलब्ध झाला हे दुर्दैव होय. करिण्यातले पहिले ५ बंद गहाळ असून वर दिलेल्या शेवटच्या मजकुरानंतरच्या मजकुराचे बंदही गहाळ आहेत. आशा आहे की ते त्याच दप्तरांत अधिक शोध केला असता सापडावेत.)

❑

TG : MarathaArchives

भवानी तलवार : अस्सल ऐतिहासिक सत्य काय आहे?

शिवाजी महाराजांची भवानी तलवार कोठेतरी शाबूत असलीच पाहिजे व तिचे दर्शन घडावे म्हणून प्रत्येक महाराष्ट्रीयाला असोशी लागलेली असते. परंतु दुदैव असे की, अद्यापपर्यन्त ती सफळ होऊ शकलेली नाही. किंबहुना आता तर ती शशशृंगासारखी अप्राप्यच ठरणार अशी भीती भडसावू लागली आहे.

अशा स्थितीत लोकांच्या भोळ्या भक्तीचा फायदा घेऊन मधून मधून या भवानीचे तोतयेही निर्माण होऊन लोकांची जिज्ञासा पल्लवित करण्याचे कार्य करीत असतातच.

भवानी तलवारीला प्रसिद्धी आणि चिरंजीवित्व मिळाले आहे. ते मूलतः आपल्या बखरवाङ्मयामुळे! बखरीपेक्षा अधिक विश्वास्य समजल्या जाणाऱ्या समकालीन वा उत्तरकालीन पत्रव्यवहारादिकांत तिचा कोठेच आढळ होत नाही. अस्सल पत्रादिकांचा काही उपयोग करून 'इतिहास' लिहिण्याचा पहिला प्रयत्न म्हणजे ग्रँट डफने लिहिलेला 'मराठ्यांचा इतिहास' हाच होय.

तथापि त्यालाही मिळाला तो 'पत्रव्यवहार' फारसा नव्हता व त्याची मुख्य मदार निरनिराळ्या लोकांकडून म्हणजे ऐतिहासिक घराण्यातील जाणत्या लोकांकडून त्या त्या घराण्यांच्या लिहून घेतलेल्या बखरीच होत्या. त्यांपैकीच काही पुढे स्व. साने यांना मिळाल्या. त्या त्यांनी काव्येतिहाससंग्रहात छापल्या.

सर्वात अधिक विश्वसनीय जुनी समजली जाणारी बखर कृष्णाजी अनंत सभासदाची. तीत महाराजांनी वाघनख व बिचवा चालवून खान मारला असे सांगितले आहे. पुढे 'पट्टा व बिचवा यांची कातर करून त्यांनी सैद बंडाचे वार परतवले', असे वर्णन आहे. पण त्यांत भवानी तलवारीचा उल्लेख नाही.

चिटणिसाचे म्हणणे

नंतर मल्हार रामराव चिटणीस विरचित 'श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक प्रकरणात्मक चरित्रा'ची बखर तिच्यात मात्र भवानी तलवारीची गंगोत्री म्हणजे तिच्या उगमाची जागा निर्दिष्ट केली आहे. ती अशी -

"नंतर सोंदवळकर व कोंदवळकर हे हबीशयाचे चाकर मर्द मातबर होते. त्यांचे राजकारण महाराजांकडे आले. आपली स्वारी कोकणात यावी म्हणजे तळाघोसाळ

घेऊन देतो अशी त्यांनी खातरजमा केली. खेरीज जंजीरीयाचेही राजकारण आले. त्याचवरून खासा स्वारी कोकणात जाऊन दोन्ही किल्ले तळा घोसाळा व पेंचवा किल्ला असे घेतले. प्रांतात अंमल बसविला. बिरवाडी सैदांची, ते मेट चांगले असे पाहून तेथे किल्ला केला. याप्रमाणे करून नंतर हरिहरेश्वराचे दर्शन करून तिकडून येता मार्गी गोवलेकर सावंत येऊन भेटले. त्यास नावाजून चाकर ठेवले. त्याचपाशी ३०० होनांची तरवार नामांकित होती ती महाराजास कळलियावरी ३०० होन व पोषाख देऊन घेतली व तिचे नाव 'भवानी' असे ठेवले. ती प्राप्त जाहलियावरी बहुत यशस्वी झाले म्हणून तिची पूजा नित्यनेमे आदरे करून करिते झाले.''

या उताऱ्यावरून सावंताकडून घेतल्यावर लगेच तिचे नाव भवानी ठेवले कां पुढे अफजलखानाला मारल्यावर ते नाव ठेले याचा नीट खुलासा होत नाही. मात्र त्यानी ती आपल्या देव्हाऱ्यात किंवा देवघरात दैवतासारखी जपून ठेवली असावी.

या तर्काला थोडासा आधार स्व. पारसनिसांच्या 'इतिहास संग्रहात' सापडतो. 'भोसल्यांचे कुलाचार' म्हणून छत्रपतींच्या खाजगी कडली जाबता म्हणजे 'खाजगी खात्याचे नियम' नावाचा जो स्वतंत्र ५०/७५ छापील पृष्ठे भरलेला, तपशील सांगणारा जाबता पारसनिसांनी छापला आहे. त्यात 'जाबता जिराइतखाना' याच्या कायदेकानूंत पुढील आज्ञा आहेत.

'शिकल करून बंदोबस्त'

''जिराइतखाने यांनी प्रात:काळी अंघोळ करून गंध अक्षता लावून वस्त्र पात्र असेल ते निर्मळपणे, गळाठान दिसतां. आपले कारखान्यात येऊन सरकारी हत्यारे, पट्टा, भाला, बर्ची, गुप्ती व सेती व गुर्दा व खाडा व तेगा व पेशकबज व फरसटाळ व तीरकमान, सांग सुरई कट्यार बुकभाला, पिस्तुल, बकमार व ढालांचे व बंदुकीचे व हुद्दे तरवारांचे व दुर्बीण व घड्याळे वगैरे सदरहूची देखरेख रोजचे रोज झाडून पुसून जंग लागला न लागला हे पाहून, वरचेवर शिकल करून बंदोबस्त राखीत जावा.''

आणि यापुढे या जिराइतखान्यातील कामगारांचे जे मानपान ठरलेले होते. ते त्यासंबंधी एक कलम असे आहे -

''पूजा भवानीची व नैवेद्य पूर्वीपासून आम्हाकडे चालत आला आहे.'' म्हणून या लोकांची कलम लिहिले आहे तर त्याप्रमाणे सरकारातून त्यास पावत जाईल.''

हे व पुढील कलमे दसऱ्याच्या सणासंबंधीची आहेत त्यावरून त्या दिवशी या भवानीची पूजा केली जात होती असे दिसते. तथापि पूजा भवानीची म्हणजे भवानी देवीची की भवानी तलवारीची याचा नि:संदिग्ध खुलासा त्यावरून होत नाही. शंकेला अवकाश राहतोच.

'शिवदिग्विजय' बखरीत म्हटले आहे की, 'सावंतांना पराभूत केल्यावर त्याच्या जवळची २०० होनांची एक तलवार अतिनामांकित प्रसिद्ध होती ती शिवाजी-महाराजांच्या मनात भरली म्हणून ती त्यांनी सक्तीच्या खुशीने त्याच्याकडून नजर म्हणून मिळविली. या जबरदस्तीच्या प्रकाराला पुढे बरखरकाराने "देवीने एकाच वेळी महाराजांना व सावंतांना दृष्टान्त देऊन ती तलवार महाराजांना देऊन टाकण्याची प्रेरणा सावंताना दिली वा म्हणून महाराजांना ती त्यांनी न मागताही त्यांना अर्पण केली' असे काव्यमय पांघरूण घातले आहे.

सक्तीची खुषी

जेते हे मनात भरलेल्या शत्रूच्या वस्ता सक्तीच्या खुषीने घेतच असतात! इंग्रजांनी धुलीपसिंगाकडून कोहिनूर हिरा असाच मिळवला होता. त्याच्याही आधी रणजितसिंगाने १८१३ साली काबूलच्या शहासुजाला आपल्या दरबारी आश्रय दिल्यानंतर हाच कोहिनूर हिरा त्याच्याकडून सक्तीच्या खुषीने बळकावला होता! १८५७ च्या बंडानंतर नेपाळात आश्रयास गेलेल्या पेशवे कुटुंबातील स्त्रियांना स्वत:जवळचे नामांकित जडजवाहीर असेच जंगबहादुराला सक्तीच्या खुषीने द्यावे लागले होते!

असो. पूर्वोक्त चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक बखरीत महाराजांनी खानाला जी तलवार खूपसून मारले ती भवानीच होती असे खालील उताऱ्यावरून दिसते -

"खानाने फिरंगीचा बार महाराजावरी चालविला. डोईस जिरे होती. ती किंचित तुटोन जखम गव्हाइतकी लागली. महाराजानी सफाई करून 'तुम तो बडे ओर पठाण, हमारी भवानी शिवाजी की देखो' म्हणून तलवारीचा वार खांद्यावर केला त्याने पोटापर्यन्त वार झाला. खान पुरे होऊन मुर्दा पडिला."

याच्या आधी पृ. १३२ वर असं वर्णन आहे - "महाराजानी चोळणा काचा घालून उजवे हाती भवानी तलवार घेऊन व बिचवा डावे हाती वाघनखे पाठी ढाल याप्रमाणे (खानाच्या भेटीस) सिद्ध झाले."

चित्रगुप्ताच्या बखरीत जे श्लोक उद्धृत केले आहेत त्यांत अफजलखान व शिवाजी यांच्या हमरीतुमरीत शिवाजीच्या तोंडी पुढील उद्‌गार घातले आहेत.-

"केवा काय तुझा मर्कट जसे चेष्टा करी आगळी सीवाजी सरजा समर्थ अवनीं या भोसल्याचे कुळीं" ऐके रे मतीमंदटा! बरळसी सर्जा शिवाजीपुढा सिंहासन्मुख जाण काय करिशी तू अफजला रे मुढा! हस्तीं हें तुळजा फिरंग चमके घेईल प्राणा झणी नाही सोडविता तुला कुणी दिसे प्रत्यक्ष तो रे रणीं.

वाघनखांत जहर

बडोदे येथे द्वारकानाथ जगन्नाथ कोरडे यांच्या घरी उपलब्ध झालेल्या (संवत

१८८६ साली लिहिलेल्या) 'श्री शिवाजी प्रताप' बखरीत 'महाराजानी वाघनखे खुपसूनच खानास ठार मारले' असे म्हटले आहे. एवढेच नव्हे. तर ती वाघनखे अत्यंत जहरी विषाने माखलेली होती की त्यांनी जरी यत्किंचित् ओरखडा उठला. तरीही विष अंगात भिनून माणूस ८/१५ दिवसांत मेलाच पाहिजे,'' असे अधिक वर्णन केले आहे!

श्री. कोटस्थाने यांना १९३५ साली उपलब्ध झालेली शिवाजीमहाराजांची एक बखर प्रसिद्ध झालेली आहे. तीत शिवाजीमहाराजांनी बिचव्याने खान मारला असे वर्णन आहे. भवानीचा उल्लेख नाही.

सुप्रसिद्ध स्व. वाकसकर यांनी संपादित केलेल्या ९१ कलमी बखरीत ''पोटात बिचवा मारूनच खान पुरा केल्याचे'' वर्णन आहे.

पारसनिसांनी आपल्या इतिहाससंग्रहात त्यांना साताऱ्यास उपलब्ध झालेल्या एका जुन्या 'शिवाजी महाराजांच्या' बखरीत अफझल प्रकरण छापले आहे त्यात आलेला तपशील व अगिनदास शाहिराच्या पोवाड्यातील तपशील पूर्ण जुळतात. याच बखरीची दुसरी एक प्रत पुढे पांडोबा पटवर्धनांना मिळाली. ती स्व. वि. ल. भावे यांनी आपल्या मराठी दप्तर रुमाल १ मध्ये 'शेडगावकर बखर' या नावाने छापली आहे. अर्थात या दोन्ही बखरींत महाराजांनी खान कसा मारला त्याचे वर्णन एकसारखेच आहे. त्यात महाराजांनी वाघनख खूपसून व बिचवा चालवूनच खान ठार मारला. इतकेच म्हटले आहे. तलवारीने मारला असे नाही.फक्त सैद बडदाचे वार, फिरंगी व बिचव्याची कातर करून परतविले इतकेच आहे.

कवींद्र परमानंदांच्या शिवाजी समकालीन किंबहुना शिवाजीमहाराजांच्या आज्ञेने लिहिलेल्या शिवभारताच्या अफजलवधाच्या २० व्या अध्यायात म्हटले आहे की - भगवती तुळजादेवीने प्रार्थनेच्या वेळी महाराजांना दर्शन देऊन सांगितले की - जो हा अफजल खान नावाचा यवनश्रेष्ठ जवळ येत आहे तो कपटी असून तुझ्याशी युद्ध करू पाहातो त्याला तू तलवारीच्या जोराच्या वाराने भूमीवर पाड तुझ्या या हाताने त्याचा मृत्यू व्हावा अशी ब्रह्मदेवानेच योजना केली आहे म्हणून हे राजा! मी तुझी तलवार होऊन राहिले आहे. याप्रमाणे बोलून भवानी त्यांच्या तलवारीत शिरली आणि महाराज जागृतावस्थेत असूनही त्यांना ते स्वप्नच वाटलं!

त्यानंतर पुढे शिवभारतकाराने खान - शिवाजींच्या भेटीत (२१ व्या अध्यायात) महाराजांनी आपल्या तरवारीचे टोक खानाच्या पोटात खुपसून त्याची सर्व आतडी बाहेर काढली इ. वर्णन आहे त्यांत वाघनखाचे नाव नाही -

स्व. पी. के. गोडे यानी 'हरी कौर्स कॉन्ट्रिब्युशन टू द प्रॉब्लम ऑफ द भवानी स्वोर्ड ऑफ शिवाजी द ग्रेट' नावाचा मोठा शोध निबंध 'न्यू इंडिया ॲटिक्वरी' मध्ये १९४० साली प्रसिद्ध केला. त्यांत संभाजीमहाराजांच्या एका लढाईचे वर्णन असून

त्या लढाईत संभाजीमहाराजांच्या हातात भवानी तलवार होती असे सांगितले आहे. हा कवी संभाजीमहाराजांच्या पदरचा राजकवी होता. त्याच्या काव्याचा काळ स. १६८५ आहे. म्हणजे शिवाजीमहाराजांच्या नंतर संभाजीमहाराजही ती भवानी तलवार लढाईत वापरीत होता, असे म्हणता येईल.

चौकशी झाली नाही.

या भवानी तलवारीपुरतेच पहावयाचे तर मात्र असेच आढळते की, ही तलवार छत्रपतींच्या देवघरात किंवा त्यांच्या जिराइतखान्यात म्हणजे शस्त्रागारात शाबूत आहे. किंवा नाही याची चौकशी कोणीच केली नाही. कागदपत्रांच्या विविध संशोधनाच्या उद्योगात 'नगाऱ्याची घाई तेथे टिमकी तुझी काई' असाच जणू प्रकार झाला. म्हणजे या भवानी तलवारीचा शोध लावण्याचाच एकमेव ध्यास घेऊन कोणी संशोधक त्यामागे लागला नाही.

अर्थात् हेही खरे की, संशोधकांना - त्यांना सापडणाऱ्या कागदपत्रात जर भवानी तलवारीचा उल्लेख आला असता तर तो त्यांनी खचितच उत्साहाने जगास जाहीर केलाच असता. पण त्यांना उल्लेखच आढळला नाही म्हणून तो विषय मागे पडत गेला.

कसेही असो, शिवाजीमहाराजांची भवानी तलवार पाहण्याची जिज्ञासा प्रथम इंग्रजांनी दर्शविली हे मात्र सत्य आहे. ज्ञानाविज्ञानाच्या सर्वच शाखात इंग्रज हे मराठ्यांच्या पुढे कोसन कोस गेलेले असल्यामुळे, त्यांची शोधक बुद्धी जागृत असे. आमचा इतिहास आम्हाला जितका ठाऊक होता त्यापेक्षा इंग्रजांनाच आमचा इतिहास अधिक अवगत होता! खरें खोटे पारखणारी चिकित्सक दृष्टी चालवून, इतिहास वस्तुस्थितीला धरून कसा लिहावा हे शास्त्र ग्रँड डफच्या मराठ्यांच्या इतिहासानेच प्रथम आम्हाला कळले. हे नाकबूल करण्यात अर्थ नाही.

डफने भवानी तलंवार स्वत: पाहिली असावी. असं वाटते. ग्रँट डफच्या ३ ऱ्या आवृत्तीतील एक तळटीप अशी आहे.

Shiwaji's sword is an excellent genoa blade of the first water. It's Whole history is recorded by the heroditory historian of the family.

मात्र खुद्द डफच्याच लिखाणातील मजकूर असा आहे. (पृष्ठ १३३)

He was a man of small stature and of an active rather than strong make. His countenance was handsome and intelligent. He had very long arms in proportion to his size, which is reckoned a beauty among marathas. The sword which he constantly used which he named after the Godess Bhavani is still preserved by the Raja of satara with the utmost veneration and has all the honours of idol paid to it.

विजयचिन्ह

मात्र भवानीप्रमाणे अफजलखानाची तलवारही छत्रपतींच्या घरात विजयचिन्ह म्हणनू जतन केल्याचे डफच्या इतिहासात आवर्जून लिहिले आहे त्याकडे मात्र कोणाचेच लक्ष आजवर गेल्याचे दिसत नाही. पृष्ठ ७९ वर त्याने असे म्हटले आहे.

It is worthy of remark that the sword of Afjalkhan is still a valued trophy in the armoury of shivaji's descendents."

पण ते कसेही असले तरी शिवाजीमहाराजांची भवानी तलवार आज मात्र सातारा किंवा कोल्हापूर या छत्रपतींच्या संग्रहात नाही असे 'दुदैवाने' म्हणावे लागते.

दोनतीन वर्षापूर्वी मुम्बईस झालेल्या शिवाजी महोत्सवात श्री. बाबा पुरंदरे महाराजांची भवानी तलवार परजत नाचत होते. पुरंदरे 'शिवशाहीर' हे बिरूद बाळगणार आणि महाराजांच्या वेडाने झपाटलेले त्यामुळे सातारच्या राजघराण्याशी ते निकटच्या स्नेहासारखेच झालेले आहेत. प्रथम ते संशोधकाच्या पेशात चिकित्सक दृष्टी ठेवूनच वावरत असत (आता अलीकडेच त्यांनी शाहिराचा पेशा स्वीकारला असल्यामुळे त्यांच्या जुन्या सत्याच्या आग्रही वृत्तीचा लोप झाल्याचे लोक बोलतात.) म्हणून भवानी तलवार म्हणून त्यांनी जी नाचवली ती त्यांनी स्वत:ची खात्री करून घेऊनच तशी नाचवली असणार असे लोक सहजच समजले असतील.

खोटे नाणे जगी पसरते ।
फारपणाने खरेही ठरते! ।
खरे बिचारे दिसते भलते ।

मग बिनघोर। नाचते पहा लांडोर असा प्रकार घडला. परंतु त्यांच्या दुदैवाने ती तलवार शिवाजीमहाराजांची नसून थोरल्या शाहूमहाराजांची आहे असा स्फोट त्यांचे गुरू श्री. ग. ह. श्वरे यांनीच केला आहे! त्या तलवारीवर 'छत्रपती शाहू, महाराज कदीम' अशी स्पष्ट अक्षरे खोदलेली आहेत. अर्थात दुसऱ्या शाहूमहाराजांच्या कारकिर्दीत त्या तलवारीवर ती थोरल्या शाहू महाराजांची तलवार आहे, असे स्पष्ट कोरून ठेवले आहे. म्हणजेच ती थोरल्या शिवाजीमहाराजांची नाही असे खरे यांचे स्पष्ट म्हणणे आहे.

पहिल्या भ्रमनिरासानंतर

सातारचा भ्रमनिरास झाल्यानंतर साहजिकच कोल्हापूर दरबाराकडे इतिहासप्रेमी लोकांचे डोळे आशाळभूतपणे बळतात. कोल्हापूर ही साताऱ्याप्रमाणेच शिवछत्रपतींच्या औरस वंशाची दुसरी शाखा. संभाजीवधानंतर सर्वाधिकाराने छत्रपती असल्यासारखेच राजाराममहाराज वर्तत होते व मोगलांविरूद्ध राजकारण करून लढत होते. तेव्हा त्यांच्याकडे भवानी तलवार जाणे अगदी शक्य आहे, असे अनुमान निघू शकते. पण

तेथेही याबाबत निराशाच पदरी पडलेली आहे.

श्री. पुरंदरे यांच्याप्रमाणेच शिवछत्रपतींच्या व त्याच्या वंशजांच्या इतिहासाशी एकरूप झालेले वा. सी. बेंद्रे यांनी जुले १९३८ च्या मंडळ त्रैमासिकात शिवाजीमहाराजांच्या तलवारीच्या शोधासाठी आपण इंग्लंडात कसा भगीरथ प्रयत्न केला पण शेवटी निराशाच कशी झाली त्याचे एका स्वतंत्र लेखात सविस्तर कथन केले आहे. ते लिहितात...

"श्री शिवछत्रपतींची तलवार लंडनला आल्याचे पुष्कळ दिवस ऐकत होतो. मध्यंतरी या बाबत कै. वि. ल. भावे यांनी तेथील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला त्यावरून मात्र ती ब्रि. म्युझियम आणि इंडिया ऑफिसमध्ये नसल्याची पूर्ण खात्री झाली व महाराजांच्या तलवारीचे दर्शन घडण्याची आशा मावळली. परंतु संशोधनासाठी इकडे येण्याचे मुक्रर होताच पुन्हा आशेचा अंकुर फुटला व प्रयत्न केल्यास यश येईल काय असा प्रश्न वारंवार मनात येऊ लागला. येताच म्यूझियम प्रथम पाहिले व निराश व्हावे लाले. नंतर इंडिया ऑफिस लायब्ररीच्या पुस्तकांच्या हस्तलिखित यादीत पुढील मथळा आढळला.

"Indian art in Marlborough House of catalogue of collecon the occasion of his visit to India in 1875-76.

हा मथळा पाहून मग ते पुस्तकच मागवून पाहिले. पण त्यात एवढाच मजकूर होता-

"The sabre (No 20) formerly the porpety of the great maratha chief has a one edged old europeon blade bearing the sacrad intial letters. J. H. S. three times repeated."

आणि पुढील तपशीलवार वर्णनात म्हटले आहे -

Now in the Indian Room of marble owing to house by C. purdon clark Director South Keusington museum, (Published for private circulation) in 1898."

20 Sabre ""Maratha" straight one edged old Europeon blade with two groves on each side, in one of which J. H. S is stamped three times. The raised steel supports at the hill are damascened with gold in Horal deorgus, the guarded hilt is of irin with a broad knucle guard and a circular pommel, tersuinating in a spike and tncousted with heavy open work Horal decoration of gold, thicken set with large diamonds and rubies. Presented by H. H. the maharaja of Kolhapur as a relic of the Maratha chief Shivaji to whom if formerly belonges.

शेवटी अनेक वशिले लावून १६ मे रोजी बेंद्र्यांनी ती तरवार प्रत्यक्ष पाहिली

व तिचा फोटोही घेतला. त्यांनी शेवटी मात्र लिहिले आहे.

"आता ही तरवार म्हणजे शिवाजी महाराजांची भवानी तलवार होय किंवा महाराज फक्त एकच तलवार वापरीत होते. असे मानण्याचे कारण नाही."

संशय कायम

म्हणजे पुन्हा संशय राहिलाच! सारांश एकाच व्यक्तीचे दोन तोतये एकमेकांसमोर आणून परस्परांनी दुसऱ्यास खोटे ठरवावे असाच नेमका प्रकार घडला आहे. म्हणजे कोल्हापूरकर महाराजांनी इंग्रज राजपुत्रास १८७५ साली दिली. ती भवानी नाही व पुरंदरे यांनी मुंबईत नाचविली तीही भवानी नाही!

कोल्हापूरकर महाराजांनी भवानी तलवार इंग्रज बादशहाला अर्पण केली ही बहुत शरमेची व नादानीची गोष्ट केली असाच लोकांचा समज झाला असल्यास तो यथार्थच होता. यासंबंधात १९२७ साली काही जाहीर चर्चा झाली असावी. कारण लोकांचा तो गैरसमज दूर करण्याकरता व कोल्हापूरकर छत्रपतींवरील देशभक्तिशून्यतेचा आळ घालविण्याकरता स्व. केशव सीताराम ठाकरे यांनी खुद्द शाहूमहाराजांना भेटून त्याबाबत मिळालेली माहिती २३ जुले १९२७ च्या 'ज्ञानप्रकाशा'त पत्ररूपाने प्रसिद्ध केली होती ती अशी –

श्रीयुत ज्ञानप्रकाशक तर्फे यांस - न. वि. वि. आपले पत्र आणि टाइम्स ऑफ इंडिया यात भवानी तलवारविषयी जी पत्रे प्रसिद्ध झाली आहेत, त्यांतील विधानांना पोषक असा हा खुलासा करीत आहे. कै. शाहूमहाराज छत्रपती करवीरकर यांना एकदा मुंबई मुक्कामी भवानीबद्दल मी स्वत: खुलासा विचारला होता. एडवर्ड बादशहा प्रिन्स ऑफ वेल्स म्हणून येथे आले असता त्यांना शिवाजीमहाराजांची भवानी तलवार आपण नजर केली ती कोणाच्या प्रेरणने? असली पूज्य व राष्ट्रीय महत्त्वाची वस्तू आपणाला देववली तरी कशी? या माझ्या प्रश्नाला शाहूमहाराजांनी जे उत्तर दिले तेच स्मरणाने नमूद करीत आहे.

उत्तर – 'भवानी तलवारीविषयी' लोकांनी निष्कारण गैरसमजुतीचा घोटाळा माजविला आहे. भवानी आमच्या करवीर घराण्यात कधी कोणी आणलीच नाही. ती साताऱ्यासच आहे. शिवाय ती आणलीच असती तर ती प्रिन्स ऑफ वेल्सला नजर करण्याइतकी आमच्या भोसले घराण्याची विशेषत: छत्रपतीची मनोवृत्ती, अजून काही लोक समजतात इतकी, नादान झालेली नाही. प्रिन्स ऑफ वेल्सच्या नजराण्यात मी जी तलवार दिली ती आमच्या संग्रहातील एक जुन्यातली जुनी, जुन्या मराठी शस्त्राचा नमुना म्हणून एक चांगल्या पात्याची, जरा झकपक बनवून, थोडे नवीन जड काम करून दिली. ती काही भवानी तलवार नव्हे! भवानी तलवार हे नावच चुकीचे आहे.

वास्तविक त्या हत्याराला 'खांडा' म्हणतात. अफजलखानाच्या मुकाबल्यापूर्वी थोडेच दिवस पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी तो खांडा शिवाजीमहाराजांना नजर केला होता. कारण महाराजांनी त्यांच्यापासून पुष्कळ हत्यारे खरेदी केली म्हणून संतोषाने तो खांडा आठवणीवजा नमुन्याचे उत्तम हत्यार म्हणून त्यांनी नजर केला. पुढे अफजलखानाच्या मुकाबल्यात अकल्पनीय यश महाराजांना आले तो याच हत्याराचा पायगुण, 'हीच माझी ती यशदायिनी भवानी' अशी महाराजांची भावना कायम झाली.

केवळ समजूत

भवानी घेऊन महाराज युद्धाला जात ही केवळ समजूत आहे! भवानीची देवघरांत त्रिकाळ पूजाअर्चा होई आणि दरबारच्या वेळी ती छत्रपतीच्या गादीवर पुढे आडवी ठेवण्यात येई. छत्रपती सिंहासनाला अगर गादीला पाय लावीत नसत. सिंहासनाजवळ येताच पहिला मुजरा गादीला, दुसरा खांड्याला म्हणजे भवानीला. मग बाजूने हळूच गादीवर सरकून चढून बसत. शेवटच्या प्रतापसिंहाचा फोटो पहा. त्यात गादीपुढे खांडा आडवा ठेवलेला दिसेल. हा भवानी खांडा आज सातारकरांच्या देवघरांतच पूजला जात असतो. भाऊसाहेब सातारकरांचे व आमचे काही जुने पुराणे वितुष्टाचे खूळ असले तरी मी कधी सातारला गेलो किंवा आमची मंडळी कधी गेली तर प्रथम आम्ही देवघरांत जाऊन भवानी खांड्याचं दर्शन घेऊन त्याला त्रिवार लवून मुजरा करतो. हा आमचा कुळधर्मच आहे. मग आमचा हा कुळधर्म खरा का तुम्ही विद्वान लोकांनी उठविलेल्या भरमसाठ गप्पा खऱ्या?

मला वाटते की या खुलाशाने इतिहास संशोधक व चिकित्सक मंडळीची खात्री पटेल की शिवाजीची वंदाभवानी साताऱ्यासच आहे ती काही सप्तसमुद्र ओलांडून तांब्रांच्या देशाला गेलेली नाही.

पण श्री. ठाकरे यांच्या या निवेदनानंतरही बऱ्याच शंका मनात उद्भवतात. कसे ते पहा. शाहू महाराज छत्रपती कोल्हापूरकर वारले ६ मे १९२२ रोजी. त्यानंतर पाच वर्षांनी ठाकरे यांनी, केव्हा एकदा पूर्वी मुंबईमुक्कामी त्यांचे व महाराजांचे संभाषण झाले होते. त्याची स्मरणाने ही हकीकत प्रसिद्ध केली! शिवाय त्यांनी दिलेली सर्व माहिती खुद्द महाराजांच्या तोंडून वदविली आहे. आणि त्यांत महाराज ज्या तलवारीबद्दल म्हणजे भवानी समजल्या जाणाऱ्या तलवारीबद्दल खुलासा करीत आहेत. ती तलवार 'मीच प्रिन्स ऑफ वेल्सच्या नजराण्यात दिली' असे ते स्पष्ट सांगत आहेत. अर्थात तो १८७५ साली छत्रपतींनी प्रिन्स ऑफ वेल्सला जी 'भवानी तलवार दिली म्हणून प्रवाद आहे.' तिच्याबद्दलचा तो खुलासा होऊ शकणार नाही! ठाकरे यांनी शाहू-छत्रपतींच्या तोंडी 'मी' बद्दल 'आम्ही' असा शब्द घातला असता तर 'आम्ही' म्हणजे आमचे पूर्वज असे समाधानं तरी करून घेता येण्याची सोय झाली असती.

हे कसे काय?

पण तेही समाधान मानण्यास जागा नाही. कसे ते पहा. कोल्हापूरकर छत्रपतीनी प्रिन्स ऑफ वेल्सला भवानी तलवार दिली ती १८७५ साली आणि मुलाखत देणारे हे शाहू छत्रपती कागलकर घराण्यात जन्मले २६ जुले १८७४ रोजी! म्हणजे ते त्यावेळी अवघे पाऊण एक वर्षाचे होते! (पुढे त्यांचे दत्तविधान त्यांच्या १० व्या वर्षी होऊन मग ते कोल्हापूरकर छत्रपती घराण्यात आले आणि त्यानंतर २-४-१८९४ रोजी वीस वर्षे पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष राज्यकारभार करण्याची इंग्रजी सनद त्यांना मिळाली. नंतर १९०० मे मध्ये त्यांच्या छत्रपती घराण्यास इंग्रज सरकारने 'महाराज' ही पदवी वंशपरंपरा दिली. महाराज ६ मे १९२२ रोजी मुंबईस वारले.)

सारांश श्री. ठाकरे यांनी महाराजांच्यां तोडून वदविलेल्या खुलाशात मोठेच संशयस्थान राहिलेले आहे. मेलेल्या मनुष्याचा हवाला देऊन 'खरा' म्हणून सांगितलेला इतिहास म्हणजे सत्यकथन काही प्रत्यंतर पुराव्याखेरीज सर्वस्वी सत्य मानणं धोक्याचेच असते. महाराजांनी तत्संबंधीच्या काही दप्तरी दाखल्यांचा आधार देऊन सांगितले असते तर निराळे. शिवाय असा पुरावा ग्राह्य किंवा अग्राह्य ठरविण्याचे वेळी साक्ष देणाराची वृत्ती स्वभाव, हेतू इत्यादीही लक्षात घेणे आवश्यक असते.

नोंद नाही

सारांश श्री. ठाकरे यांच्या खुलाशानेही संशयनिवृत्ती होत नाही. 'भवानी तलवार साताऱ्यास आजही शाबूत आहे.' असे महाराज म्हणतात. परंतु नुकतेच परवा, साताऱ्यास प्रसिद्ध होणाऱ्या 'ऐक्य' पत्राच्या १६ जून १९७८ च्या अंकांत सातारच्या शिवाजी म्युझियमचे तपशीलवार वर्णन छापले आहे. पहिल्या दालनातील शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे व् नंतर शस्त्र दालनातील पाचसात फूट लांबीच्या भाल्याचे १८ ते २४ इंच लांबीच्या खजिरांचे, तसेच सोनसळी पट्टे, गुर्दे, पिटे, चिलखते इत्यादिकांचे वर्णन केले आहे. पण त्यात भवानी तलवारीची नोंद नाही!

शिवाजी महाराजांची भवानी तलवार आपल्या संग्रही असल्याचा दावा खा. बी.डी. पद्मजी यांनी करून त्याबाबत एक पुस्तिकाही प्रसिद्ध केली आहे. पण ती भवानी तलवार असे मात्र म्हटलेले नाही! प्रा. बाळकृष्णकृत शिवचरित्रात त्या तलवारीचा फोटो छापला आहे. या सर्व विवेचनाचा निष्कर्ष हाच की आजीमतीस तरी भवानी तलवारीचा कोठे पत्ता लागत नाही.

पण हे खरे असले तरी निदान सन १८२० सालापर्यंत तरी ती तलवार सातारकर छत्रपतींच्या घरात मोठ्या भक्तिभावाने जतन करून ठेवलेली असा नवा निश्चित पुरावा मला पेशवे दप्तरातील प्रतापसिंह छत्रपतींच्या स्वहस्ते लिहिलेल्या दिनचर्येत उपलब्ध झाला आहे. तो असा

'वैशाख वद्य ११ रविवार शके १७४२ इंग्रजी शके १८२० कल कल्याहून साहेब आले. त्यास पहावयास तलवार भवानी पाहून लावून दिली. साहेब व त्याची मडम किल्ला सातारा पाहावयास किल्ल्यावर गेले. भोईसरकारी २० दोन मेण्यांचे मागितले.''

सारांश सन १८२० पर्यंत तरी भवानी तलवार साताऱ्यास होती! मग पुढे कोल्हापूरकर महाराजांसारखीच सातारकर महाराजांनीही ती कोणा बड्या इंग्रज पाहुण्यास भेट म्हणून दिली किंवा अशा पाहुण्यांनी ती दडपण घालून सक्तीच्या खुषीने मिळविली या सर्वच आता तर्काच्या गोष्टी आहेत.

(पुरवणी टीप – 'बॉम्बे अँड वेस्टर्न इंडिया - लेखक जेम्स डग्लस - भाग १.. १८९३. ग्रंथात शिवाजीमहाराजांसंबंधी एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्याच्या अखेरीस भवानी तलवार व तिचे म्यान यांची चित्रे आहेत. ही तलवार सरळ पात्याची आहे. बाकदार नाही. किंवा खांड्यासारखी आखूड व टोकाला रुंद झालेली नाही.)

शिवाजीमहाराजांची भवानी म्हणून एकच तलवार प्रसिद्ध आहे. तथापि 'भवानी' नाव ठेवलेल्या तलवारी अनेक सरदार दरबादारांकडेही असल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, कल्याणच्या सुभेदारांचे जमाखर्च या लेखात स्व. नानासाहेब चापेकरांनी छापलेली ही नोंद पहा.

सिलेखाना खर्च भवानी तरवार इची मूठ बांधली. त्यास रेशीम २।। = कमाण व तीर खरेदी केले. ५८।। बंदूक नवी केली. दणे भवानजी लोहार सिरढोणकर.

❑

TG : MarathaArchives

रजि.नं. १२६

संभाजी महाराजांची समाधी

इतिहास संशोधनाचा उद्योग महाराष्ट्रात सुरू झाल्याला आता पाऊणशेवर वर्षे होऊन गेली. संशोधकांनी समकालीन अस्सल पत्रव्यहार शोधून काढून आजवर परंपरेने चालत आलेले कितीतरी समज हे गैरसमजच आहेत, हे आधारानिशी सिद्ध करून दाखविलेले आहे जुन्याकाळी शास्त्रशुद्ध इतिहास लिहून ठेवण्याची पद्धती आपण शिकलेलो नव्हतो. खरे-खोटे, संभाव्यअसंभाव्य याची काटेकोर शहानिशा न करिता परंपरेने ऐकत असलेल्या गोष्टी एकत्र गोठून त्यांच्या बखरी लिहून ठेवाव्यात, अशीच आपणाकडे स्थिती होती. यामुळे त्या लिखाणात खऱ्या व ऐकीव गोष्टीची गल्लत झालेली असे. बखरीतून आलेली सगळीच माहिती काही खोटी नसते. परंतु त्यातील कित्येक बाबी समकालीन अस्सल पत्रव्यवहाराच्या दाखल्याने पाहिल्यास त्या चुकीच्या ठरतात. याचे एक अगदी ढोबळ उदाहरण म्हणजे अद्यापहि बहुजन समाजच काय, पण सरकारसुद्धा सन १६२७ हेच शिवाजीचे जन्म वर्ष मानते आणि तेव्हाच त्यांचा जन्मोत्सव करते! शिवाजीच्या समकालीन अशा जेधे शकावलीत, खुद्द शिवाजी महाराजांच्या आज्ञेने लिहिलेल्या शिवभारतात, चिटणिसांच्या चित्रे-शकावलीत व आणखी अनेक शिवकालीन अस्सल साधनातून इ. स. १६३० हे शिवाजीमहाराजांचे जन्मवर्ष दिलेले असता आणि संशोधकांनी गेली तीस वर्षे त्याचा पाठपुरावा केला असताही अद्याप सरकार मात्र जुन्या जन्मतिथीलाच चिटकून बसले आहे. गेल्या मुंबई प्रान्ताच्या विधिमंडळात नवी जन्मतिथी सरकारने सुट्टीसाठी अधिकृतपणे जाहीर करावी असा एक ठरावही मांहला गेला होता, हे पुष्कळांच्या स्मरणात असेल.

शिवाजीमहाराजांच्या जन्मकालाविषयी जी चूक केली जाते, तशीच चूक संभाजीमहाराजांच्या छत्रीच्या स्थलाविषयी केले जाते. म्हणजे असे की, खुद्द तुळापूर येथे संभाजी महाराजांचे दहन झाले नसताना व तेथे त्यांची छत्री अर्थातच बांधली गेली नसताना, उत्साही लोकानी तुळापुरास आपल्या कल्पनेनेच अमूक अमूक जागा ही संभाजी महाराजांच्या छत्रीची जागा होय, असे ठरवून तेथे उत्सव सुरू केला व गेली वीस वर्षे तो उत्सव सतत चालू राहिल्यामुळे मूर्तिमंत असत्याला सत्याची पुटे चढल्यासारखे होन ते असत्य किंवा अपसत्य हेच खरे सत्या अशी लोकांची गैरसमजूत दृढ होत चालली आहे. यांचे एक ठळक उदाहरण सांगण्यासारखे आहे; ते असे-

आतापर्यंत बहुजन समाजातील लोकांना इतिहासाची फारशी आस्था नसे. परंतु आता तेही सुशिक्षित व साक्षर होत चालल्यामुळे त्यांनाही इतिहासाचे प्रेम आणि अभिमान निर्माण होत आहे. पं. नेहरुंच्या हस्ते प्रतापगडावर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला गेला, तेव्हापासून खडकीच्या उत्साही कामगार वर्गात ते लोण पोचले आणि त्यांनी संभाजी महाराजांचा उत्सव करण्याचे ठरविले. तसेच तेव्हापासून ते कामगार लोक दरसाल तुळापुरास जाऊ लागले आहेत. आता तर त्यांनी आपसात वर्गणी करून निधी जमवून, तुळापुरास पक्की समाधी बांधण्याचे निश्चित ठरविले आहे!

परंतु वास्तविक स्थिती अशी आहे की, संभाजी महाराजांचा वध औरंगजेबाने केल्यानंतर त्यांचे शव त्याने कोल्ह्या-कुत्र्यांकडून खावविण्याकरिता टाकून दिले होते. नंतर त्याच्या शवाचे तुकडे व शीर एकत्र करून, उचलून नेऊन एका मराठा सरदाराने त्यास मौजे वढू येथे विधीपूर्वक अग्नि संस्कार केला व तेथे अर्थातच छोटीशी देवळी पण केली. दहनाची ती जागा मात्र निश्चित होती आणि म्हणूनच पुढे शाहू महाराजांनी त्याच स्थळी पक्के वृंदावन बांधले. एवढेच नव्हे तर त्या वृंदावनाची व्यवस्था नीट राहावी, त्याची पूजा-अर्चा निरंतर चालू राहावी व तेथेच अन्नछत्रही असावे, यासाठी माणसे नेमून त्यांना कायम इनामेही करून दिली. त्यासंबंधी छत्रपतींच्या रोजकीर्दीतील अस्सल नोंद आहे, ती अशी-

"कै. संभाजी राजे स्वामी यांचे वृंदावन दर जागा मौजे वढूत ।। पाबळ येथे करून शुश्रूषेसाठी व व्यवस्थेसाठी भिकाराम गोसावी, वासुदेवभट, शामभट धर्माधिकारी ठेवून धूपदीप, नैवेद्य, बागतुलसी व अन्नछत्राबद्दल बागाईत जमीन बिघे ५, कोरडवाहू वहीत जमीन बिघे २० आणि बाकीची पडजमीन बिघे १०५ मिळून १२० बिघे जमीन दिली."

छत्रपति संभाजी महाराजांच्या वेळी औरंगजेबाची छावणी तुळापुरांजवळ पडली होती. पण छावणी फारच मोठी नि कोसानुकोस अनेक गावापर्यंत विस्तारलेली होती. तुळापुरास प्रत्यक्ष संगम आहे. म्हणून त्याला क्षेत्र मानण्याची पुरातन पद्धतीप्रमाणे वहिवाट आहे. मौजे वढू हे इतके छोटे खेडे आहे, की ते दुसऱ्या एका त्या मानाने मोठ्या अशा कोरेगावच्या सान्निध्याने ओळखले जाते. "वढू कोरेगाव" असाच त्याचा सजोड उल्लेख नेहमी केला जातो. हे वढू व हे कोरेगाव ही दोन्ही तुळापुरानजीकच आहेत. संभाजी महाराजांचा प्रत्यक्ष वध छावणीत कोठेतरी झाला असेल, परंतु दहन मात्र वढू येथेच झाले, ही गोष्ट वरील हकिगतीवरून लक्षात येईल. तुळापूर क्षेत्राच्या सान्निध्यामुळे संभाजी महाराजांनी समाधी तुळापुरासच आहे, असे लोक म्हणू लागले आणि तोच समज कालान्तराने दृढ होऊन संभाजी महाराजांची समाधी किंवा वृंदावन तुळापुरासच आहे असा गैरसमज दृढावला. सुदैवाची गोष्ट ही की, आता म. म.

पोतदार व बेंद्रे यांनी अस्सल आधारानिशी वढूच्या समाधीबद्दल सरकारचीही खात्री पटविली आहे व म्हणूनच परवा बांधकाम स्मारकापर्यंत पक्की सडक करून देण्याचे जाहीर आश्वासनही दिलेले आहे.

तानाजीच्या समाधीबद्दलही असाच प्रकार पूर्वी झालेला आहे. वास्तविक तानाजीचे दहन, त्याचे शव उमराठ्यास नेऊन तेथे करण्यात आले व वृंदावनही अर्थात् तेथेच आहे. परंतु तानाजी सिंहगडावर पडला म्हणून लोकांनी तेथेच त्याचे पक्के दगडी स्मारक उभारले आहे. दरसाल तेथे मोठा उत्सवही होत असतो. तानाजी हा सिंहगडावर पडला एवढी गोष्ट तरी निश्चित असल्यामुळे एक तऱ्हेने संबंध सिंहगड हीच तानाजीची समाधी मानण्यास हरकत नांही आणि त्या दृष्टीने तेथल्या कोणत्याही स्थळी त्याच्या समाधीची कल्पना करून कोणी समाधी बांधली व उत्सव केला तरी काही बिघडते असे नाही. परंतु प्रत्यक्ष दहनाची म्हणजे वृंदावनाची किंवा समाधीची जागा ती नव्हे ही रुखरुख मनात उतरतेच! आणि जर खरी जागा कोणती याला बळकट पुरावा उपलब्ध झाला तर त्या स्थळी उत्सव करणे हे केव्हाही श्रेयस्कर होय.

तानाजीच्या उदाहरणाप्रमाणेच संभाजीच्या वृंदावनाबाबत प्रकार घडत आहे. संभाजी महाराजांना तुळापुरच्या क्षेत्रात कोठेतरी मारले असले तरी त्यांचे दहन मात्र वढू येथेच झाले, हे निश्चित! व म्हणूनच वढू येथील समाधी हीच संभाजी महाराजांची खरी समाधी!

नोव्हेंबर १९६९

❑

TG : MarathaArchives

महाराष्ट्राचा वैभवशाली राष्ट्रीय सण

मराठेशाहीतील दसरा

मराठ्यांचे धार्मिक आणि सामाजिक सणसमारंभ अनंत आहेत. परंतु ज्यांना त्यांचे खास 'राष्ट्रीय' असे सण म्हणता येतील, असे फक्त तीनच होत. दसरा, दिवाळी आणि शिमगा. त्यापैकी दिवाळीचा सण हा त्यातल्यात्यात राष्ट्रीय सण म्हटला, तरी त्याचे स्वरूप कौटुंबिक असेच होते. मराठेशाहीत दसऱ्याचा मान दिवाळीला कधीही मिळत नसे. किंबहुना, दिवाळी हा मुख्यत: दसरा सणाचेच शेपूट, असे मानण्यात येई. 'साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी-दसरा', या तुकाराम-महाराजांच्या उक्तींत या दोन सणांचा संज़ोड उल्लेख आलेला आहे, तोही सार्थच होय.

शिमगा आणि दसरा हेच मराठ्यांचे सामाजिक, सार्वजनिक आणि राष्ट्रीय असे दोन सण किंवा उत्सव. परंतु त्यातही दसऱ्याचे माहात्म्य साहजिकच विशेष. शिमगा हा समाजाच्या ख्यालीखुशालीचा आणि करमणुकीचा प्रतीक असला तर दसरा हा त्याच्या पराक्रमाचे प्रतीक आहे. मराठ्यांनी आपले साम्राज्य एके काळी भारतभर स्थापले, ते हजारो स्वाऱ्याशिकाऱ्या करून. आणि या सर्व स्वाऱ्या किंवा मोहिमांचे प्रस्थान दसऱ्यालाच ठेवले जाई. वर्षाचे बारा महिने; त्यापैकी तब्बल आठ महिने मराठे मोहिमात गुंतलेले असत. फक्त नाइलाज म्हणून पावसाळ्यात चार महिने घरी आपल्या मुलाबाळात येऊन विश्रांती घेत. पावसाळा संपून दसरा उजाडला की, धार्मिक सीमोल्लंघनाच्या विधीबरोबरच त्यांचे स्वाऱ्याशिकाऱ्यांचे सीमोल्लंघनही प्रत्यक्ष सुरू होत असे.

साडेतीनचे माहात्म्य

दसऱ्याची धार्मिक परंपराही पराक्रम सुचित करणारीच आहे. रामाने 'दशाशिर' रावणाचा वध या दसऱ्याच्या दिवशीच केलेला आहे. तसेच अज्ञातवास संपवून पांडवांनी शमीच्या वृक्षावर ठेवलेली आपली शस्त्रे या दसऱ्याच्या दिवशीच काढून पुन्हा हाती घेतली व भारतीय युद्धासारखे युद्ध लढून ते भारतवर्षाचे सम्राट झाले. महाराष्ट्राची कुलस्वामिनी भवानीदेवी - तिने असुरांचा वध केला तो याच दसऱ्याला. यामुळे मराठ्यांच्या दसऱ्याच्या सणाला कमालीचे धार्मिक पावित्र्यही लाभलेले आहे. दसऱ्याच्या सणाचा मुहूर्त हा 'साडेतीन' मुहूर्तांतील मुहूर्त मानला जातो. ऐतिहासिक

काळी या 'साडेतीन' संख्येला काही विशेष माहात्म्य होते. 'साडेतीन शहाणे', 'साडेतीन राव'. 'साडेतीन फाकडे', 'साडेतीन वस्त्रे;' त्या प्रमाणेच हे 'साडेतीन मुहूर्त'!

असा हा दसरा जवळ आला म्हणजे मराठेशाहीत प्रत्येक घरी आपआपल्या परी दंगल उडून जाई. दसऱ्याआधीच पेशव्यांची व त्यांच्या सरदारांची कलमजारी म्हणजे सैन्याची जमवाजमव सुरू झालेली असावयाची. शिलेदारांना. पाग्यांना, पथक्यांना, ''दसऱ्याच्या दिवशी डेरेदाखल व्हावयाचे आहे, तरी येऊन हजर व्हा'', अशी पत्रे किंवा हुकूम गेलेले असावयाचे. यामुळे खेड्याखेड्यातून आपआपल्या घरी गेलेल्या शिलेदारांची या सुमारास पुण्याकडे नुसती रीघ लागलेली असावयाची. प्रत्येक कुटुंबात आंनदाइतकेच शोकाचेही भरते यावेळी यावयाचे. कारण, नवरा शिपाई म्हणून पराक्रम करण्यास रोजगारावर निघाला हा अभिमान गृहिणीला एकीकडे वाटे, तर त्याचवेळी नवऱ्याचा व आपला पुढे आठ महिने विरह होणार आणि त्याची मनाने सारखी चिंता वाहावी लागणार, ही काळजी तिचे मन दुसरीकडून कातर करून टाकी. मराठा स्त्रीच्या या आनंददु:खमिश्रित भावनांचे वर्णन मराठी शाहिरांनी आपल्या लावण्यापोवाड्यादिकातून अप्रतिम केलेले आहे. उदा. एका लावणीतील हे वर्णन पहा.

आनंदाला दु:खाची डूब

''जाऊ धन्याच्या डेऱ्याला, मजकूर केला त्या घटकेला, पत्र लिवली ।। दखनेत फिरे हलकारी ताकीद केली । चढे हिंमत रोजगाऱ्याला, जाऊ पुण्याला, तलवारीला दरोबसी बांधिली मेणं शिकल केली ।। गडी घरचा पाठिवला - जलदी गेला जिनगराला ताकीद केली । घोड्याला रंग पाहुन जिन फाजिली ।। मुबलक पैसा खर्चीला उंच अब्रूला किनखापाची खरेदी केली । ढेलजेत बसले शिंपी म्होरकी शिवली ।। दाहा रुपये दरमहा केला मोतद्दार ठेविला संगे नेयाला सोबत झाली । घोड्याची खटपट त्याच्या हवाली केली ।। ऊठ सखया आंघोळीला सैंपाक झाला, भोजनाला नार बोलली । ह्या रत्नाताटांभोवती रांगोळी भरली ।। जीन भिडविला घोड्याला गेंदजोड त्याला तुरा खोविला म्होरकी दिली । निघाली घाई घरीं अस्तुरी कष्टी झाली । ह्या अवघ्यांसी चांगला भेटतो सर्व्याला मुजरे करतो घोडी धरली । संगे मैत्राची मंडळी घालवीत आली ।। पदर लाविला नेत्राला पाय दिला रिकिबीला तयारी केली । ह्यो रस्ता वाहतो पुण्याचा रंव पडली ।। रात्रीचा दिवस केला पुण्याला गेला चांदरात्रीला हजिरी दिली । घोडे शिपाई पाहून बोली केली ।। उतारले डेऱ्याम्होर, बसले धीर गादीवर विडे घेई । चल जाऊ पाहू श्रीमंत दिल्लीची छाई०।।

दुसऱ्या एका अतिप्रसिद्ध 'पंचकल्याणी' लावणीत, दसरा करून स्वारीत गेलेल्या मराठा शिलेदाराच्या गृहिणीची हुरहूर कशी चित्रित झाली आहे, ती पहा :-

"पंचकल्याणी घोडा अबलख । जिनावर कलाबतु लखलख । बाई सूर्यपान लगीचे ग नाजुक । वर अंबिर बसले छुन् न् न् न् न् न् नन पायात झांजर बोले ॥१॥ संगे बहु बोथाट्याची गर्दी । मागे पुढे फौज अर्धी अर्धी । शिलंगणाचे सोने लुटिले । दसऱ्याच्या मुहूर्ताने डेरे दिले ॥२॥ हिंदुस्थान मुलुख नटबाट । पाहिला अजिंठ्याचा घाट । झाडी असल जंगल दाट, कि मैना बोले जसे अक्रुराने हरि मथूरेशी नेले । पतिवाचून बाई महाल सुना । तुला करूणा नाही नारायणा । मेल्या उगाच राही रे मना! हौस नाही पुरली पोरपणीच मनिच्या मनीं कल्पना जिरली ॥३॥"

पूर्वी मराठेशाहीत, मराठी साम्राज्याच्या ऐन माध्यान्ही हा सण कसा वैभवाने साजरा केला जात असेल त्याची कोणालाही मनाने सहज कल्पना करता येऊ शकेल. स्वराज्यनाशानंतर इंग्रजांच्या गुलामगिरीत असलेल्या संस्थानांतून दसऱ्याच्या स्वारीचेच काय ते एकमेव आकर्षण लोकांना वाटत असे. कारण, त्यावेळच्या स्वारीत एखादे कल्पनारम्य रंगीबेरंगी स्वप्न पडावे त्याप्रमाणे लोकांना जुन्या स्वराज्यांतील वैभवाचा काहीसा साक्षात्कार झाल्यासारखा वाटे. बडोदा व म्हैसूर यांच्या दसरामहोत्सवाचीच केवळ वर्णनात्मक पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत; हे त्याचेच एक प्रत्यंतर होय.

आता समकालीन ऐतिहासिक कागदपत्रांतून कोठे कोठे दसऱ्याची वर्णने आली आहेत. ती वाचूनच आपली जिज्ञासा कशीबशी पुरवून घेण्याखेरीज इलाज नाही.

इंग्रज वकील लिहितो

सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत पुन्हा एकदा मराठी साम्राज्याचा परमोच्च बिंदू गाठला गेला होता. त्यावेळच्या पुण्यातील एका दसरासमारंभाचे वर्णन सर जॉन माल्कमनेच मुद्दाम लिहून ठेवलेले आहे, ते असे :-

"नवरात्र संपून दसऱ्याच्या दहाव्या दिवशी शिलंगणाचा मोठा समारंभ असतो. त्यावेळी तमाम मराठी फौज साऱ्या वैभवानिशी पहावयास मिळते. सारे सरदार, शिलेदार, दरकदार, एकांडे शिपाई, पायदळ, तोफा, सर्व सजून स्वारीस निघतात. मराठ्यासारखे घोड्यावर बसणारे बाळाभ्यासी तेच! काय ती त्यांची उमदी घोडी! त्यावर तऱ्हेतऱ्हेचे साज घातलेले, आणि बहुमोल पोशाख करून त्यावर बसलेले उमदे मराठी शिलेदार त्या गर्दीतही लीलेने आपआपल्या घोड्याकडून विविध कसरती करीत चालतात; त्याचे वर्णन काय करावे! नानाविध रंगांच्या पोशाखांनी आणि हजारो जरीलग्याच्या उजाळ्यांनी लाटा उठल्याप्रमाणे डहुळलेला तो समुदायसमुद्र पाहून दृष्टीचे पारणे फिटल्यासारखे वाटते, नौबती, नगारे, तुडुम-ताशे, मर्फे, झांजा, तंबूर, ढोल आणि लेजिमा या जयवाद्यांनी वातावरण धुंद झालेले असते. खास पेशव्याची स्वारी रुप्याच्या अंबारीत स्वार झालेली असते. मागे इतर मोठमोठे मानकरी आपआपल्या सजवलेल्या घोड्यावरून हत्यारे परजीत चाललेले असतात.

शिलंगणाची ही स्वारी मोठ्या समारंभाने पुण्यानजीक एखाद्या विविक्षित ठिकाणी सायंकाळी जाऊन पोचते. तेथे खासा पेशवा आधी शमीपूजन करतो. तसेच शेजारीच एक शेत मुद्दाम राखून ठेवलेले असते. त्यातील कणसे पेशवा खुडतो. ते होताच मग त्या ठिकाणी सोने लुटण्यासाठी आणि कणसे लुटण्यासाठी एकच सगळ्यांचा तोबा होऊन जातो. पेशव्याने शमीची पाने खुडताच सगळीकडून तोफांचे व बंदुकींचे शतावधी आवाज होऊ लागतात. अशा रीतीने समारंभ उरकल्यावर अंधार पडल्यावर स्वारी परतते; त्या वेळी हजारो चंद्रज्योती आणि महतापा पाजळत असतात. त्यांचा दिवसासारख्या लख्ख प्रकाश पडलेला असतो. गर्दी इतकी झालेली असते की 'झुगारिल्या जरी वरूनी ताट तरि ते खाली कधी पडेना.' म्हणजे बत्ताशाचे ताट वरून फेकले तरी एकही बत्तासा पायदळी पडणे शक्य नाही, इतके माणसाला माणूस भिडले.''

प्रभाकर शाहिराने या स्वारीचे ५-४ चरणांतच मोठे बहारीचे वर्णन केले आहे, ते असे

''तुडूम नौबती, तंबुर, । बिनिवर मेघापरि गाजती ।
सजेले रथ भंवती साजती ।
कडिकंठ्यांचे स्वार पदाति उदंड ते विराजती ।
पाहुन नृप मांडलिक लाजती ।
बहुत दुतर्फा घणघण नादें गजघंटा वाजती ।
कितिक भालदार भाट गर्जती ।
।। चाल ।। बाई घटाव खुब स्वारीचा ।
चाले गोल थटुन बहारिचा ।
पडे प्रकाश अंबारिचा ।
छत्रचामरे ढळती ज्यावर कनक ओपाओपिती ।

स्वारी शनवारवाड्यात परत आल्यावर मोठा दरबार होई. त्यावेळी सर्व लहानमोठे सरदार पेशव्याला नजराणा करीत आणि पेशवेही त्यांचा बहुमान पोशाख, पालख्या, दिवट्या, अफ्तागिरी देऊन करीत. दरबारात आपले नवे पवाडे गाऊन दाखवून बक्षिसे मिळवीत.

''फंदी अनंत कटिबंद छंद ललकारी ।
श्रीमंताचे दरबारी ।''

किंवा -

''उलटली स्वारि मग महताबा लावूनि ।
कुर्निसा करिती जन वाड्यामधें जावुनि ।
दाखवी पवाडा गंगु हैबती गावुनि ।

महादेव गुणिराज फेकिती तनन तान दरबारांत ।
प्रभाकराचे कवन पसरले सहज सभोवति नगरांत ।''

उत्तर पेशवाईत पेशव्यांच्या रियासतीत शिंदेच तेवढे जबरदस्त होते. लष्करी बळाच्या जोरावर त्यांनी पेशव्यालाही गुंडाळून टाकले होते. किंबहुना पुण्याला राज्य म्हणावयास तेवढे पेशव्याचे, परंतु अमंल मात्र शिंद्याचाच; अशी विपरीत अवस्था झाली होती. ''खलक् खुदाका, मुलुख बादशाहाका, अंमल अंग्रेज सरकारका'' त्याचप्रमाणे दक्षिणेत ''मुलुख पेशवाका पण अमंल शिंदे सरकारका' अशी अक्षरश: अवस्था झालेली होती. शिद्यांचे वैभव पराकाष्ठेस पोचले होते. सत्ता आणि संपत्ती त्यांच्या दरबारी एकवटली होती. जुन्या काळी सणासमारंभाचे वेळी राजेलोक जे जहजवाहीर अंगावर घालीत, त्यावरून समाज त्यांच्या श्रीमंतीची कल्पना करी. दौलतराव शिंद्याला 'मोतीवाले' असाच तत्कालीन लोकांनी स्वयंस्फूर्त किताब दिलेला होतात. दौलतराव शिंद्याच्या लष्करांतील एका दसरा सणाचे वर्णन साक्षेपाने लिहून ठेवले आहे. ते परक्या त्रयस्थाचे म्हणून त्यात एरवी न आढळणाऱ्या बारीक सारीक मनोरंजक गोष्टींची नोंदही अगत्याने केलेली असल्यामुळे अशा सणांचा तपशील त्यावरून चांगला समजून येतो. तो म्हणतो - ''गेल्या १८ तारखेस दसरा पडला. मराठी लष्करांत यासारख्या दुसरा महत्त्वाचा सणच नाही. नवरात्रापासून सुरुवात होऊन विजयादशमीला त्याची पूर्तता होते. दसऱ्याच्या आदल्या दिवशी प्रत्येक शिपायाची मोठी धांदल उडून गेलेली असते. आपली घोडी नटवणे-सजवणे, शिला-भाला, हत्यारे-पात्यारे शिकल करून परजून ठेवणे; उद्या स्वारीच्या वेळी घालावयाचा पोशाख काढून ठेवणे; असा सगळीकडे एकच उद्योग सुरू असतो. दसऱ्याचा दिवस उजाडताच शिंद्याचे कवायती कंपू आण जिनसी म्हणजे तोफखाना तयार होऊन शिस्तीने बाहेर पडून छावणीशेजारच्या मैदानात फरा धरतात. प्रथम बडा कंपू गोल बांधून उभा राहतो. त्यांच्या मध्यास बारा तोफांचा चबुतरा असतो. नंतर पलीकडे जीन बॅप्टीस्टचे ब्रिगेड आणि मग त्याच्या डाव्या हातास अलिभोलाचे म्हणजे बिनकवायती कंपूचे पथक खडे होते. कवायती कंपूचे विलायती बॅण्ड आणि तंबूर तर अलिगोलांचे देशी बाजे वाजत असतात. अलिभोल शिपाई बाजांच्या कलकल्यातच मधून मधून 'अल्ला हुं अकबर' सारख्या आरोळ्याही मारतात.

''सकाळपासून कंपू बाहेर पडलेले असते तरी शिलंगणाची मिरवणूक दौलतराव शिंदा छावणीतून बाहेर पडल्याखेरीज सुरू होत नाही. तो निघण्यास दुपारचा तिसरा प्रहर उलटून जातो. खासा शिंदे निघाला म्हणजे आधी त्यांच्या जरीपटक्याचा हत्ती आघाडीस असतो. जरीपटक्याच्या हत्तीच्या मागे शिंद्याच्या खास नागनिशाणी झेंड्याचा हत्ती असतो. हे हत्ती रुप्याच्या साकळा घालून आणि रंगीबेरंगी वेलपत्ती अंगावर काढून आणि उंची झुली घालून सजविलेले असतात. निशाणांच्या हत्तींच्या मागून

नगारे-नौबतीचे हत्ती आणि त्यामागे शेकडो भालदार, बाणदार, निशाणदार चालतात. आणि त्याही मागे मग शिंद्याचा सारा घोडदळाचा रिसाला असतो. हा रिसाला स्वारीत पुढे सारखा मागेपुढे दौडत राहून चांगला विस्तीर्ण असा मोकळा रस्ता राखण्याचे काम करतो. रस्ता मोकळा झाला म्हणजे पायगापथकांचे एकांडे शिलेदार आपआपल्या नामांकित घोड्यावर बसून जातात. रिसाल्यांनी लांबदस्त नानाविध कसरती तेथे सुरू असतात. ते दृश्य खरोखरीच अपूर्व असते. अशा रीतीने मिरवणूक रमतगमत चालू झाली म्हणजे ती जेथे शमीचे झाड अगोदर पुरून ठेविलेले असते, त्या मैदानापाशी पोहोचते. तेथे दौलतराव शिंदा पालखीतून पायउतार होतो. मग पंडित आणि पुजारी त्याच्या हस्ते बळी देऊन दुधादह्याने शमीचे पूजन करवितात. मग शिंदा आपल्या तलवारीने त्या शमीच्या झाडाची एक फांदी तोडतो. त्याचवेळी त्याला शुभशकुन घडतात. अर्थात् त्याची तयारी अगोदरच करवून ठेवलेली असते! या समारंभात मुख्य शुभशकुन चाष पक्षाचा. चाष म्हणजे निळकंठ पक्षी. हा पक्षी आपल्या उजव्या हातास उडालेसा दिसणे हा अत्यंत शुभशकुन मानलेला आहे. म्हणून या वेळी मुद्दाम आणून तयार ठेवलेले चाष पक्षी उडविण्यात येतात. हे पक्षी उडालेले दिसले की जिकडे तिकडे आनंदाचा एकच गदारोळ होतो आणि तोफाबंदुकांच्या शिलकांनी वातावरण सुन्न होऊन जाते. लगेच शमीचे सोने आणि धान्याची कणसे लुटण्याकरिता सर्वांची एकच गर्दी होऊन जाते. इतके होईतो सायंकाळ होते आणि मग दारूकाम सोडीत, हवायांच्या उजेडात स्वारी परतते आणि नंतर छावणीत मोठा दरबार भरवून नजरांचा समारंभ सुरू होतो.''

❏

TG : MarathaArchives

उद्गीर लढाईसंबंधीची अस्सल अप्रसिद्ध पत्रे व विजयदुर्ग किल्ल्याची माहिती

पुढील तीन पत्रांपैकी दोन पत्रे उद्गीरच्या सुप्रसिद्ध लढाईसंबंधी असून ती मला कै. स. ग. जोशी यांच्या दप्तरात उपलब्ध झाली. तिसरे पत्र विजयदुर्ग किल्ल्याच्या माहितीचे आहे. ही माहिती १३ डिसेंबर १८३५ रोजी विजयदुर्ग येथील पाच लोकांनी, जुनी हकीकत मिळवून इंग्रज सरकारला लिहून दिली. हे तिसरे पत्र मला विजयदुर्ग येथील लेल्यांच्या दप्तरात मिळाले. विजयदुर्गाची माहिती देणाऱ्या पाच लोकांत कृष्णाजी धोंडदेव लेले हे गृहस्थ आहेत.

(१) **श्री** **रामोजयति**

राजश्री हरबाजी बावा स्वामीस विनंती उपरी सांप्रत श्रीमंत नानाची मर्जी पाहाता शरीरी वेथा. क्षीण फार जाहाले. लोकास पैसा द्यावा हे बुधी येकंदर नाही. रदबदली केली तर तोडून जाब सांगतात. राजश्री भाऊ व राजश्री रघुनाथपंत मोगलास बुडवावे या उमेदीने गेले, ते गोस्ट राहिली. मोगल बलकट आहे आपले जोऱ्याने उदगिरीस आला. तेथे बुनगे ठेऊन सडा झाला. यांची त्याची गाठ पडली. येक जुज मातवर जाहाले. इभ्रामखा गाडदीयाचा भाचा पडला माणूसही फार पडले. तेथून रोज तीन चार कोश मोगल चालत चालत आवशावर आला. हे भोवते आहेत रोज झटपट होते परंतु याची सलाबत मोगलावर पडत नाही. **येक इभ्रामखान मात्र जुजतो वरकड मराठे झटत नाही काठ्या घालितात तऱ्ही निकड होत नाही माणूस बेदील. कोणास पैसा दिल्हा नाही रोजमुरे यावर चाकरी घेतात यामुले मन कोणी घालीत नाही.** राजश्री दमाजी गायेकवाड परलीवर राहिले होते त्याजवर खंडागले येऊन पडले. त्याणी सारे लस्कर लुटून पस्त केले. दमाजीस दोन तीन जखमा होऊन दोन च्यारसे रावतानसी पलोन श्रीमंताच्या लस्करात गेले. इतके दिवस मोगलापासी मराठे नव्हते सांप्रत जाधव खंडागले आटोले पांढरे बाके वगैरे दाहा हजार जमा जाले व अलीकडे घारूराजवळ मोगल आला असेल. हणवंतराव व जानोजीची फौज तयार आहे बसालतजंग करणाटकची फौज घेऊन आला त्याची भेट

जाली असेल. अगर होईल याउपर मोगल भारी जाला याचा त्याचा तूर्त तह होत नाही. मोगलाचा मनोदये पंढरपुरास येऊन भीमेच्या पाण्याने वरते यावे दुसरे धारूरवरून परांडे यासी येऊन सिनेच्या पाण्याने नगरास अगर पेडगावास यावे ऐसे आहे. या चिंतेत हे श्रीमंत फार हैराण आहेत आशामधे छ १३ जमादिलाखरचे प्रहर रात्री सहा दिवसात उजनीहून कासीद आले. दिलीची पत्रे आली की आबदली फौज घेऊन आला तो व रोहिले जाट सुजायत दौला येकत्र होऊन दिलीवर आले. तेथे सिंद्याचे व त्याचे जुज जाहाले **जनकोजी सिंदे यासी जखमा आहेत दत्ताजी सिंदे पाच हजार फौजेनसी मोगलाच्या फौजेत गर्क जाहाले.** ते सारे लोक कापून ठार केले. दतबाचा मुर्दा देखील सापडला नाही लस्कर सारे मोगलानी लुटून दिली घेऊन पातशाहा मारिला व वजरी मारिले. यांचा आमल तमास उठविला. दिलीची पातशाही आबदली करीत आहे हे विनंती

(२) (पत्र पुढील प्रमाणे अपुरेच सापडले आहे)

डाव केलरे व लूट बहुत जाली आपले फौजेतील दीड हजारपर्यंत माणूस पडले नवसे हजार घोडे पडले व ज़खमी जाले. या प्रमाणें मोंगलांस जेहर करून त्याच तलावर मुकाम जाला. या फौजा भोवत्या होऊन तोफांची मारगीर फार केली यामुळे मोगल जेहर देऊन बोंलीस वकील पाठविला. साठ लक्षांची जाहागीर व़ दौलताबाद, बऱ्हाणपूर, आसेरी व विजापूर च्यार ठिकाणे यांसी दिली. तह करार जाला याउपरी रविवारी अथवा सोमवारी द्वितीयेस श्रीमंत या तलावरून कूच होऊन पैठणास जाणार. श्रीमंत भाऊसाहेब व दादा तेथे येऊन भेटी होणार. याची रवानगी फौजसुद्धा हिंदुस्थानात व आणखीही जागाजागा फौजाची रवानगी होणे ते होऊन उभयेता श्रीमंत फिरोन येतील. रागश्री जानोजी भोसले व मुधोजी भोसले श्रीमंत भाऊच्या लष्करात फौज सुद्धा आले आहेत त्यास राजश्री लक्षुमणपंत येथून गेले त्यांस आम्ही आपले कर्जाविसी बहुत निरवण केली ते बोलिले की कर्जाची याद व येक कारकून आप्पाकडे पाठवून द्यावा. प्रस्तुत ते सारे मंडल गंगातीरी येणार यास्तव भोसल्याची हप्तेबंदी दफ्तरी आहे त्याची नक्कल लेहून कृष्णाजी (पुढील बंद गहाळ आहे.)

(३) (लेले दप्तर विजयदुर्ग)

श्रीरामेश्वर

असल बमोजीब नकल $\frac{१}{२}$ दोन बंद रास.

यादी किले विजेदुर्ग हा किल्ला कोणी कोणते शब्दांत बांधिला व तो बांधावयासी

काय खर्च लागला व त्याचे (इमार) तीचा अजमांस काय होतो व आणखी सरकारी इमले तेथे असतील त्याची सदरहू चौकशी करणे विसी हुजूरचा हुकूम नंबर ता। माहे दिजंबर सन १८३५ चा सादर जाहाला त्याजवरून किल्ले मजकुरी आनंदराव रायाजी सानालेकर शिरस्तेदार जाऊन तेथील राहाणार भले माणूस व माहितगार या जवल चौकसी केली ते सुरू सन सीत सलासीन मया तेन अलफ शके १५५७ मन्मथनाम संवत्सरे

१ सिवाजीमहाराज याचे वडील सहाजीराजे हे निजामशहा पातशहा राजा याजकडे चाकरीस होते ते समयी चाकण किल्ला आपले निसबतीस घेतला नंतर आपली जहागिरी पुणे व कर्नाटक प्रांत घेतला. शहाजी राजे यांणी आपली स्त्री जिज्याबाई ही गरोदर होती त्यास सिवनेरी किल्ल्यावर ठेऊन कर्नाटक प्रांती गेले. जिज्याबाई सिवनेरीवर असता सिवाजी महाराज शके १५४९ प्रभवनाम संवत्सरे सन समान अशरीन अलफ वैशाख बहुल द्वितीयेस जन्म जाहाला. ते तीन वर्षाचे होत पर्यंत तेथे होते त्यास व जिज्याबाई यास आपले भेटीस आणिली ती माहाराज बारा वर्षाचे होतपर्यंत तेथेंच होते. तेव्हा पादशहाचे भेटीस नेले त्याणी पादशहास गुजरा केला नाही हे शहाजी राजे याणी पाहोन याची वर्तणूक ठीक नाही सेवटपर्यंतच याची बुद्धी असीच राहून पादशहास व आपल्यास वैरत्व पडेल असी करणी याचे हातून होईल यास्तव आपले जहागिरीत रवाना करून द्यावे असा सिद्धांत करून विजापुराहून जिज्याबाईसाहेब व सिवाजी महाराज यासी पुणे सुभ्यावर दादाजी कोंडदेव कुलकर्णी हे होते ते बहुत विश्वासू त्याजवळ पाठविले. तेव्हा दादाजीपंत ५००० फौज महाराजाचे हुजुरातीत ठेविले नंतर महाराज रायगडास येऊन किलेकोट बांधीत गेले त्यास विजयदुर्ग किला शाहालीवान शके १५७५ विजईनाम संवत्सरे सन आरबा खमसेन खाली बांधिला. त्यास सत्तावीस बुरूज आहेत. हा विजयी संवत्सरी बांधिला सबब याचे नाव विजयदुर्ग असे ठेविले. तो विजयसंवत्सर महाराज याचे कारकीर्दीत सिहूशकात आला याजवरून १५७५ शकांत बांधला असे होते. मागील कागदपत्र कोणाजवल नाही. हा किला बांधावयास येक कोटी रुपये लागले असतील. असा अजमास दिसतो हे काम समुद्रातील पैका खर्च करूनच होते असे नाही महाराज ईश्वर अंश पुण्यप्रतापी त्यायोगेकरून काम सिद्धीस जाऊन कीर्ति चालत आहे त्या अलीकडे किल्ल्याचे आत इमले वगैरे कामे केली त्यास खर्च लागला असेल त्याचा अजमास रुपये

८२००० आंगरे सरखेल यांणी काम केले ते अमुक शकांत येक वेळ चालले असे माहिती नाही

४०००० किल्ल्याचे पूर्वेचे बाजूस फडास *जागा* पातकाम ? बांधोन तट त्यास

तोफाच्या बंड्या केल्या आहेत त्यासुधा खर्च लागला ते रुपये.

१०००० चर किल्ल्याचे आंगाबरोबर दक्षणेकडे पूर्वेपासून पश्चिमेस समुद्रापर्यंत मिलविला त्यास

३०००० कोठी चिरेबंदी चौअंगे वितीवर पर्यंत तिमजला कौलारा बांधिली खाली फरसबंदी आहे त्यास

२००० सदर प्रथम बांधिली त्यावेळी खर्च लागला ते रुपये

८२०००

१७५००० पेशवे याचे अमलात मामलेदार तालुकी मजकुरी आले त्याणी कामे केली ती अमुकच शकात व येकच वेल केले असे मिलत नांही त्यासी खर्च रु. ।।

१५००० लादणी यशवंत दरवाज्याआत दक्षणेस रामसेज्या नजीक दुलबाजी मोरे हवालदार याणी महादाजी रघुनाथ मामलेदार याचे कारकीर्दीत बांधिली

४०००० हौद चिरेबंदी पाण्चे साठाकरिता महादाजी रघुनाथ बिवलकर मामलेदार याणी बांधिला.

३०००० लादणी हौदानजीक चिरेबंदी चौफेर आत दारूगोळा ठेवावयाची जागा वर बैठकीची जागा दर्या वगैरे हवा पहावयाची जागा या लादणीचे काम प्रथम कांही महादाजी रघुनाथ याणी केले त्याजवर गंगाधर गोविंद मामलेदार याणी पुरे केले त्यासुधा खर्चाचा अजमास

१०००० घनचक्राचे बुरुजाचे उत्तरेस खाली खुब लढा म्होणोन तट नारो त्रिंबक यांणी बांधिला त्यास खर्च

८०००० सतोल बुरूज फुटोन तो (ल) ला होता त्याचे कामा मुळापासून गंगाधर गोविंद भानू यांणी केले

१७५०००

२७५०० हल्ली सरकार अंमल जहाल्यावर इंजनेर खात्याकडून कामे केली ते सन १८२१ पासून सन १८३० पर्यंत दरसाल होत गेले ते रुपये.

९५०० महांकाळ बुरूज यासी पायथ्यास भांब मोठी पडली ती अजम मेहरबान जारव्हिस साहेब याजकडून काम कण्यास विठ्ठल रघुनाथ कामत आले त्याणी काम केले त्यास रुपये.

१८००० अजम पोजीर साहेब याणी वेताळ बुरुजानजीक ३ ।४ भांबी तटास पडल्या होत्या त्या नीट केल्या व कोठी व सदर व नगारखाना व रामसेजा व येसवंत दरवाजावरील तक्तपोसी सुद्धाबंगला व गरुड दरवाजा व हणमंत दरवाजा व ग्याट येक व विहीर वगैरे किल्ल्याचे दागदुजीचे वगैरे नवे कामे केली त्यास

२७५००

२८४५०० येकूण येक कोटी २ लक्ष चौऱ्यांशी हजार पाचशे रुपये प्रथम काम करते वेळी लागले असतील असा अजमास नजरे येतो. हल्ली सदरहूचा अजमास रुपये येक कोटीपर्यंत होईल असे दिसते.

२ गोद किल्ल्यापासून येक कोशपर्यंत लांब पूर्वेच्या अंगास आरमारच्या पालगुराबा वगैरे गलबते छावणीस ठेवावयाबद्दल आंग्रे सरखेल यांणी खणोन खाली पापडी व खाडीचा धका वगैरे इमारत बाधिली आहे त्याचा अजमास रूपये दहा हजार हल्ली किंमत रुपये सहा हजार पर्यंत १ नाके भेट किल्ल्यापासून दक्षिणेच्या अंगासखुसकी मागे आहे याशिवाये दुसरा टापू बरये यांस खुसकीमार्ग नाही हे नाके आंग्रे सीरखेल याणी बांधिले त्याचे काम बुरूज व तट मिळोन येकंदर रुपये १००० हल्ली किंमत रूपये ५०० अजमासे

येणे प्रमाणे जंजिरे मजकुरी इमले हली आहेत तारीख १३ माहे दिजंबर सन १८३५ मिती मार्गशीर्ष व ।। ९ शके मजकूर

सया

१ रामभट बिन संभुभट मुर्तजोतिसी उपाध्ये धर्माधिकारी मौजे गिरे दस्तुर खुद
१ गंगाजी बिन रामजी नाईक जावकर दस्तुर खुद
१ बच्चाजी महादेव दामले व ।। गोपालबाग दस्तुर खुद
१ कृष्णाजी धोंडदेव लेले दस्तुर खुद
१ मोरो बापूजी जाइखे तलाटी पेटा गिरे

जुलै, १९४८

❑

TG : MarathaArchives

आपल्या पूर्वजांची खेळकर वृत्ती दाखविणारे

मराठी इतिहासातील विनोदी प्रसंग

विनोदी कोट्या, विनोदी घटना, विनोदी खोड्या, जुन्या ऐतिहासिक काळी अर्थातच आजच्या सारख्या झालेल्या असतील, कारण मनुष्यस्वभाव हा तेव्हा होता तोच अशाचा तसा आजही कायमच आहे. मग ऐतिहासिक साधनांतून किंवा इतिहास, बखरी इत्यादिकांतून अशा घटनांची नोंद फारच तुरळक का सापडते? तर याचे एक मोठे कारण हे आहे, की जुन्या काळी विनोदाला प्रतिष्ठा किंवा मान्यता अशी फारशी देण्यात येत नसे. रामदासांनी एके ठिकाणी "टवाळा आवडे विनोद" असे म्हटलेले आहे. त्यावरून विनोद म्हणजे टवाळी इतकाच अर्थ तेव्हा अभिप्रेत होता. बहुजन-समाजचरित्रात अर्थातच विनोद पुष्कळ असे. याचे कारण तो समाज अडाणी, अशिक्षित, असंस्कृत असे. अशा लोकाचे हर्षविषाद किंवा रागलोभ इत्यादी भावनाप्रकार अतिउत्कट असतात. त्यामुळे त्यात संयम किंवा सुसंस्कृतता बिलकूल नसते. जुन्या ऐतिहासिक वाङ्मयात विनोदस्थळे सापडण्याचे हमखास ठिकाण म्हणजे तमाशातील लावण्या वगैरे प्रकार होत. त्यात विनोदी घटना आहेत. विनोदी कोट्या आहेत. पोट धरधरून हसवणारा व हसूनहसून रडविणारा हास्यरसही आहे. बहुजनसमाज वगळून राहिलेला समाजाचा जो छोटा अंश असे त्यातच संत, पंडित वगैरे साहित्यिक लोक आणि हरतऱ्हेचे राज्यव्यवहार करणारे राजकारणी लोक यांचा समावेश होई. राजकारणी लोकांनी केलेला प्रचंड पत्रव्यवहार किंवा त्यावेळी लिहून ठेवलेल्या बखरी आणि संतांनी किंवा पंडितांनी लिहून ठेवलेले काव्यवाङ्मय इत्यादिकांतून तत्कालीन सभ्य विनोदाचे प्रकार शोधावे लागतात. पण असा शोध करूनही विनोदस्थळे फारच तुरळक आढळतात. याचे कारण काय ते सुरवातीसच सांगितले आहे उत्तम कोट्यांची उदाहरणे किंवा हजरजबाबींपणाची उदाहरणे पुष्कळ आढळतात व त्याने हसूही येते. परंतु ज्या घटनांमुळे हास्यरस पिकेल अशी उदाहरणे क्वचितच आढळतात. हास्यरस किंवा विनोद निर्मिती होण्यासारख्या घटना तेव्हाही आजच्यासारख्याच कितीतरी घडत असल्याच पाहिजेत. परंतु विनोदाला अशिष्टपणाचा डाग असण्याच्या प्रवादामुळे त्यांची नोंद करून ठेवीत नसत हेच खरे. अशा स्थितीत काही विनोदस्थळे पुढे देत आहे:

दुसऱ्या बाजीरावाचा कारभारी सदाशिव माणकेश्वर म्हणून होता. होता सामान्य कारकूनच! किंबहुना कारकुनीत शिरण्याच्या आधी तो केवळ भटक्या तंबोरीवाला हरदास होता. त्याचा उदयकाळ आला आणि तो दुसऱ्या बाजीरावाचा दिवाण झाला. अशा रीतीने तो वाघ्याचा पाग्या झाला, तरी त्याची अक्कल होती तितकीच कायम होती! पण नाना फडणिसाच्या जागेवर आपण आलो ह्याचाच त्याला केवढा व वाट.

एकदा असा प्रसंग घडला की नानांच्या बेलबागेत कोणा वर्तकाची कथा होती. हे वर्तक गृहस्थ असूनही हौसेने कथा करीत. कथा निम्मी झाल्यावर सदाशिव माणकेश्वर दिवाण मोठ्या रुबाबाने कथा ऐकण्यास प्रविष्ट झाले. अर्थात वर्तक कथेकऱ्याने रंगात आलेले विवेचन थांबवून शिष्टसन्मानाकरता एक गाणे सुरू केले. हेतू हा की सदाशिव माणकेश्वर व त्यांचा परिवार स्थानापन्न होईपर्यंतची गडबड थांबावी. सदाशिव माणकेश्वराने बुवांना नमस्कार केला तो कीर्तनकार त्याच्या ओळखीचाच निघाला. तेव्हा त्याने त्यांच्याकडे हात करून हे कथा करण्याचे काम कधीपासून स्वीकारले असे विनोदाने म्हटले. त्याबरोबर त्या हरदासाने लगेच उत्तर केले, "आपण वीणा खाली ठेवला तोच आम्ही उचलला." हे कीर्तनकाराचे उत्तर ऐकताच सर्वत्र मोठा हशा पिकला. कारण दिवाण म्हणून मिरवणारा सदाशिव माणकेश्वर हा थोड्याच वर्षांपूर्वी केवळ एक भटक्या व क्षुल्लक हरदास होता, ही गोष्ट जगजाहीरच होती.

एकदा सरदार घोरपड्यांच्या घरी काही उत्सवात रामजोशी बुवांची कथा होती. जोशीबुवांनी त्यादिवशी असा काही रंग आणला की विचारता सोय नाही! कृष्णाच्या वृदांवनातील गोपींसमवेत चाललेल्या क्रीडांचा विषय! जोशीबुवा कमालीचे रंगेल तितकेच व्युत्पन्न! त्यांनी स्वरचित ठेवणीतली अंशी काही पदे म्हटली की, त्यांच्या पदांनी श्रोते गुंग झाले आणि मग जेव्हा ते आपल्या पांडित्याने आपल्या पद्यातील श्लोकांची उकल यथास्थित करून दाखवू लागले तेव्हा तर श्रोत्यांना हरिकीर्तनात वसल्याबसल्याच तमाशातील सारा शृंगाररस लुटता आला. व श्रोते माना डोलावून शेजाऱ्यास डिवचून "काय बहार आहे बुवांची" असे म्हणू लागले. होताहोता आख्यान संपत आले. "हेचि दान देगा देवा" ची वेळ नजीक येत चालली. त्याबरोबर घोरपड्यांचे दिवाण यजमानांच्या कानाशी लागून कुजबुजू लागले. यजमान खुश होतेच. परंतु दिवाणजीचे लक्ष मालकाचा पैसा वाचवण्याकडे! त्या दोघांची ती घासाघीस जोशी बुवांनी हेरली आणि एकदम पुढील आर्या गाऊन त्यांनी घोरपड्यास चकित व संतुष्टही केले. ती आर्या अशी-

"भोजासम कविताप्रिय कर्णासम दानशूर घोरपडे । ऐसे असता माझ्या बिदागीचा कां तुम्हास घोर पडे?"

ही आर्या ऐकताच दिवाणजीचे तोंड पहाण्यासारखे झाले आणि श्रोत्यांत मात्र

हास्याचा कल्लोळ उठला.

आता व्रात्य खोड्यांमुळे निर्माण होणाऱ्या हास्यरसाची एकदोन उदाहरणे पहा-

पटवर्धनांच्या कुळात पुरुषोत्तम दाजी हा पुरुष मोठा कर्तबगार निपजला. तो बेफाट धाडशी आणि तसाच व्रात्य विनोदी होता. त्याला पेशवेसुद्धा वचकून असत. मग इतरांची काय कथा! पेशव्यांचे नितांत एकनिष्ठ भक्त होते, त्यात नाना फडणीस आणि पटवर्धन मंडळी प्रमुख, आणि या दोघांचेही परस्परांशी अतिशय प्रेम असे. तथापि नाना फडणीस हे अधिकाराने तर त्यावेळी पेशव्यांसारखेच झाले होते. कारण सवाई माधवराव तेव्हा लहान होते. नाना मितभाषी, गंभीर अशी त्यांची सर्वत्र खाली ख्याती. पण त्यांचीही चेष्टा ह्या पुरुषोत्तम दाजीचे अशी केले की ती बखरीत नमूद होऊन राहिली आहे. तो प्रकार असा-

हरिहरराव पटवर्धनांचे लग्न पुरुषोत्तम दाजीने सासवडास केले. त्यावेळी नाना गेले होते. पटवर्धनांनी नाना फडणिसास मेजवांनी केली. त्यावेळचे हे वर्णन-

नानास मेजवानी जाहली ते दिवशी दाजी यांची आचारी यास सांगून तिखटाचे सार करविले. शुद्ध भगवतीची पूड वस्त्रगाळ करून तिचे ते सार रुप्याचे पातेल्यात घालून चमच्याने वाढावयास आणिले. सर्वांना वाढवून नानास वाढविले. आचारी यास सांगितले. "जे, वरकड मंडळीस थोडेथोडे घालून नानाचे वाटीत मात्र अंमळ अधिक घालावे." याप्रमाणे सांगितले होते. त्याप्रमाणे आचारी यांनी सार वाढावयास आणले. सर्वांत वाढून नानास वाढिले. नाना यांचे मनात द्राक्षाचे सार असेल, म्हणून पांची बोटे बुडवून तोंडात घातली तो एकच आग जाहली! तोंड पसरले आणि बोलले की "दाजी, तिखट लागले!" असे म्हणताच दाजी आचारी *** यात शिव्या देऊ लागले जे, "हे आचारी दररोज आम्हास असेच तिखट घालतात. हे पूर्वीपासून आहेत, यास निरोपही देता येत नाही!" असे म्हणताच नाना म्हणाले, "त्या गरीबास शिव्या कशाला देता? आपण तिखट लोकास घालवीत असता म्हणून ऐकले होते. ते प्रत्यक्षच आज पाहिले! आता लोणी दही आणविणे." मग तिखट थोडे शांत जाहले. त्यास नानांना जन्मात तिखटाचा संस्कार नाही. त्यांची फारच आग जाहली! भोजने होत आली तो सयाजी नाईक गोखले म्हणून होते त्यांचा गळा फार मोठा व सुस्वर. त्यास दाजीनी सांगून ठेविले होते की, "माझे पाठीमागे उभे असावे. मी सूचना करीन त्याबरोबर सारंगात कडकडावून श्लोक असा म्हणता जे सारी पगंत दचकावी! याप्रमाणे सूचना केली होती, तो त्यास डोळा घातला. त्याबरोबर त्यांनी जो श्लोक म्हटला तो नाना दचकून मागे पाहू लागले! मग दाजींनी सांगितले की, "हे रामजी नाईक गोखले आमचे पदरीच असतात." असे म्हणताच नाना बोलले की, "सारे खरे, परंतु हा मांडव उडाला! आता धर्मास दुसरा श्लोक म्हणून नका!"

याप्रमाणे हसू लागले. नंतर भोजने जाहली. कचेरीत येऊन विडे घेतले.

पुरुषोत्तम दाजीच्या व्रात्य विनोदाचे आणखीही काही नमुने सापडतात.

एकदा परशुराम भाऊ पटवर्धनांच्या पत्नीस डोहाळे लागले. ते वर्तमान पुरुषोत्तम दाजीस पुरंदरावर कळताच त्यांनी तेथून डोहाळ्याचा जिन्नस तातडीने तासगावात रवाना केला. पत्राबरोबर आलेला बस्ता परशुरामभाऊंनी नोकराजवळ देऊन जिन्नस तिकडे धरात नेऊन सोडा म्हणून सांगितले. त्याप्रमाणे नोकराने मरशुरामपंतांची पत्नी राधाबाई हिच्याकडे तो जिन्नस नेऊन पत्र वाचून दाखविले, आणि तो बस्ता सोडावयास लागला. प्रथम पांढरे कापड सोडले तो आत खाखा निघाला. आत गजनी, त्याचे आत हमरू, किनखा वगैरे सात तट होते. शेवटी त्याचे आत रुप्याचा डबा निघाला. तेव्हा सगळ्यांनाच औत्सुक्य झाले की यात अशी कोणती वस्तू असणार शेवटी तो डबा उघडला. तो त्यात चिंचेचे आकडे दिसले. पण बारकाईने पाहता. त्यात मोठा खेकडा होता. तेव्हा सारे हसू लागले. डोहाळे लागले असता कित्येक वेळा स्त्रियांना आंबट चिंचा वगैरे खाण्याची फार इच्छा होते. दाजींनी त्याची थट्टा करण्यासाठी चिंचेच्या आकड्या ऐवजी खेकडाच पाठवला. खेकड्याचे आकडे असतात हे प्रसिद्ध आहे.

पुरुषोत्तम दाजींच्या विनोदी मस्करीचा आणखी एक नमुना असा-

एका स्वारीस श्रीमंत माधवराव पेशव्यांबरोबर पुरुषोत्तम दाजीही होते. दाजींना मस्करी करण्याची लहर आली. त्यांनी मुकट्याने एक घूस धरून आणली आणि रात्री तिच्या शेपटास पलिते गुंडाळून शेपूट पेटवून सोडून दिली. ती घूस घाबरून गोट गोट हिंडू लागली. तो लष्करात शत्रूचा छापाच आला म्हणून मोठी गलबल झाली. शेवटी ती घूस खासा श्रीमंतांचे लष्करात बाडातही शिरली. मग काय हवया पेटवून धावा झाला आणि शोध सुरू झाला. पाहातात तो घूस! आली कोठून तर पटवर्धनांच्या गोटातून! थोरले माधवरावांचा राग मोठा कठीण होता. परंतु ही गोष्ट केवळ पुरुषोत्तम दाजींचे हातून घडली म्हणूनच खपली.

वर ज्या नोंदी दिल्या आहेत त्या निरागस हास्यरसाच्या आहेत असे कोणीही म्हणणार नाही. असला व्रात्य विनोद करणारांनाच तेवढे हसू लोटावयाचे. परंतु त्या खोड्यांचा ज्यावर प्रयोग झालेला असतो त्यांना मात्र यातना, दुःख किंवा भीतीच निर्माण होत असते. अर्थात हा निरागस हास्यरस किंवा विनोद नव्हे. परंतु बखरीत आवर्जून विनोदाची म्हणून ही उदाहरणे नमूद केलेली असल्यामुळे तत्कालीन विनोदाची कल्पना काय होती हेही चांगले कळून येते. असो. आता आणखी एक विनोदाचे उदाहरण देतो. उदाहरण देतो.

एकदा गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब मिरजकर कचेरीत बसले असता त्यांना हुजऱ्याने एक लखोटा आणून दिला व जरुरीचा आहे असा त्याबरोबर निरोपही

सांगितला. बाळासाहेबांनी लखोटा फोडून बघितला. तो पत्रबित्र काही नाही. फक्त दोन, संस्कृत कवितेचे चरण. श्रीमंतांनी हुजऱ्यास विचारले हे कोणी दिले. तेव्हा देवडीवर एक ब्राह्मण आहे. त्याने दिले असे त्याने सांगितले. बाळासाहेबांनी त्या ब्राह्मणास बोलावून म्हटले, "संस्कृत मला थोडे समजते. पण हे तुमचे संस्कृत कसले? त्यावर ब्राह्मण म्हणाला, "महाराज, आपल्या पदरी आपण पुष्कळ चतुर पंडित बाळगले आहेत त्यांची मदत घ्यावी." बाळासाहेबांना ब्राह्मणाचा रागही आला व कौतुकही वाटले. त्यांनी आपल्या आश्रित पंडितास बोलावून पत्र त्यांचे पुढे टाकले. त्यात पुढील दोन काव्यचरण होते.-

उद्वयं मम वृत्तिश्च भद्वयं मम भोजने । दद्वयं नास्पृशत् दंतानं तद्वयं नास्ति मद्गृहे ।

पण कोणाही पंडिताला श्लोकाचा अर्थ सांगता आला नाही. शेवटी त्या ब्राह्मणानेच त्याची उकल करून दाखविली: उद्वयं म्हणजे उसने, उधार. भद्वय म्हणजे भाजीभाकरी, दद्वयं म्हणजे दहीदूध, तद्वयं म्हणजे तेलतूप. सारांश असा की उसने उधार हीच माझी वृत्ती. म्हणजे उसने उधार हीच माझी वृत्ती. म्हणजे उसने किंवा उधार काढून मी कसातरी जगतो आणि भाजीभाकर कशीतरी मिळते, हेच माझे भोजन दहीदुधाचा दातांना स्पर्शही झाला नाही. त्याप्रमाणे तेलतूपही माझ्याकडे नाही. "दद्वयं नास्पृशद्दन्तान" यात दद्वयं हे दंतस्थानाचे वर्णन असूनही त्यांनी आजपर्यंत दातांना स्पर्शही केला नाही अशी एक चमत्कृती वर्णिली आहे. या प्रसंगी विनोद व थोडा हास्यरसही निर्माण झाला असेल खचित, पण तो बुद्धिनिष्ठ विनोदाचाच एक प्रकार म्हणावा लागेल.

असे मराठी इतिहासात विनोदाचे काही नमुने आहेत. त्यावरून तत्कालीन विनोदाची कल्पना येईल.

'श्रीयुत' दीपावली विशेषांक
नोव्हेंबर १९६१

[illegible library stamp]

TG : MarathaArchives

ऐतिहासिक काळच्या स्त्रियांची खाजगी मनोरंजक पत्रे

काही दिवसांपूर्वी पुणे आकाशवाणीने महर्षी कर्वे यांची एक खास मुलाखत श्रोत्यांना ऐकविली होती. त्यांत स्त्रीशिक्षणाबाबत आपली कोणती आकांक्षा अद्याप अतृप्त राहिली आहे ते सांगताना कर्वे असे म्हणाले होते. "आज मोठमोठ्या उच्च स्थानांवर काही काही स्त्रिया दिसून येतात, हे खरे असले तरी स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या मानाने अद्याप इतके अफाट मोठे आहे की सांगता सोय नाही. म्हणून भावी काळात एकूण एक स्त्री साक्षर झाली पाहिजे."

पण अद्याप खेड्यापाड्यातील सारे पुरुष तरी साक्षर कोठे झाले आहेत? ही आजची १९५९ सालांतील स्थिती! मग शतकापूर्वीच्या इतिहासकाळात काय अवस्था असेल ते सांगणे नकोच! त्या काळी लिहिणे वाचणे हे फक्त ब्राह्मणांचे तेवढे कर्तव्य, असे समजले जाई. बाकी इतर ज्ञातींनी शेती आदि बहुविध व्यवहार करावे आणि क्षात्रधर्मही आचरावा. असे असल्यामुळे शेकडो ९० पुरुषवर्ग हा निरक्षर आणि म्हणून अशिक्षित असे. ही पुरुषांची स्थिती; मग स्त्रिया ह्या एकजात निरक्षर असल्या तर आश्चर्य कोणते? पुढारलेल्या ब्राह्मण ज्ञातीतसुद्धा स्त्रियांनी वाचणे - लिहिणे करणे हे अशिष्ट समजले जाई. मग बहुजन समाजातील स्त्रियांची भावना तेव्हा काय असेल, ते सांगणे नको. बायको लिहिती वाचती झाली तर ती छचोर बनून उन्मार्गगामी होईल, असे खोटेच भय तेव्हा घालण्यात येत असे. स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ, त्याची दासी होण्यासच योग्य, अशी साऱ्या पुरुषवर्गाची तेव्हा भावना असल्यामुळे स्त्री शिकली तर आपल्या बरोबरीची होईल, मग आपले पुरुषी श्रेष्ठत्व ते काय राहिले? याच मत्सरी भावनेचा पगडा तेव्हा पुरुषांच्या मनावर बसलेला होता.

वास्तविक दोनचार बाबी सोडल्या तर स्त्री ही पुरुषापेक्षा कोणत्याही बाबतीत उणी पडत नाही. शारीरिक कष्टाच्या किंवा बौद्धिक सामर्थ्याच्या ज्या ज्या गोष्टी पुरुष करून दाखवितात त्या त्या सर्व स्त्रियांनी अगदी तशाच करून दाखविलेल्या आहेत. कोल्हापूरकर छत्रपतींपैकी ताराबाईसाहेब व जिजाबाईसाहेब, इचलकरंजी संस्थानच्या अधिपती अनूबाई घोरपडे किंवा अहिल्याबाई होळकरीण, यांनी तर वर्षानुवर्षे प्रत्यक्ष राज्यकारभार मुख्यत्यारीने हाकले. बाळाजी विश्वनाथांची स्त्री राधाबाई आणि पुढे

पेशवे कुटुंबातील गोपिकाबाई, आनंदीबाई, यांनी कितीतरी राजकारणे आणि कारस्थाने केली. 'राजव्याघ्री' म्हणून किताब पावलेली रागबागीण हिने तर प्रत्यक्ष शिवाजी-महाराजांशी शस्त्र घेऊन युद्ध केले व पेशवाईनंतर झाशीवाल्या लक्ष्मीबाईने इंग्रज सरकारशी तुमुल झगडा केला. सारांश स्त्रिया पुरुषांपेक्षा कर्तृत्वात ईश्वराने कमी तर बनविलेल्या नाहीत खास याचे एक गमतीदार उदाहरण सांगण्यासारखे आहे. ते मघाशी सांगितलेल्या कोल्हापूरकर जिजाबाईंचे होय.

१७६३ साली दत्तक घेतलेले छत्रपती शिवाजी महाराज़ अगदी लहान होते व म्हणून कारभार जिजाबाईसाहेब पाहू लागल्या. त्यावेळी त्यांनी सुप्रसिद्ध रामचंद्रपंत अमात्याचे चिरंजीव भगवंतराव अमात्य हेही बापाप्रमाणेच मोठे मुत्सद्दी व राजकारणी पुरुष होते. त्यांना दौलतीचा कारभार पाहण्यास सुचविले तेव्हा त्यांनी "स्त्रीबुद्धी अश्वाश्वत - सबब हे काम मी करणार नाही." म्हणून अमर्यादेचे उत्तर दिले. ते ऐकताच आईसाहेब क्रोधायमान झाल्या व बोलल्या की "आपण काम न कराल तर मोठीशी अडचण पडेल असे समजू नये; ते काम यःकश्चित कुणबिणीकडून चालविता येईल." नंतर गंगू, रंगू, भोगू, नागू आणि लिंगू अशा पाच शहाण्या कुणबिणी पसंत करून शिरोळ, आळते, वडगाव, वगैरे ठिकाणी कामे सांगून रवाना केल्या. त्याच काही दिवस काम चालवीत होत्या.

अलीकडे इतिहाससंशोधनाचे कार्य फारच विस्तारले आहे. आणि त्यामुळे जुन्याकाळची लक्षावधी ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झालेली आहेत व रोज नवी नवी होत आहेत. त्यांत पुरुषांप्रमाणे स्त्रियांचाही पत्रव्यवहार काही आढळतो. अर्थात् पुरुषांच्या मानाने तो फारच अत्यल्प, खंडीस रतीइतका थोडा भरेल. पण त्याचे कारण काय ते सुरुवातीस सांगितलेल्या तत्कालीन लोकसमजुतीतच सापडतो. पण म्हणून काही ती पत्रे पुरुषांनी लिहिलेल्या पत्रांपेक्षा कमी योग्यतेची किंवा नीरस नाहीत. जुन्या ऐतिहासिक काळीही राजघराण्यातील किंवा श्रीमंतांच्या घरातील स्त्रिया चोरून - मारून का होईना पण लिहिणे वाचणे शिकत व त्या शिकण्याचा त्यांना प्रसंगी पत्रे लिहिण्यासाठी मोठाच उपयोग होई. स्त्रियांची सापडणारी अशी पत्रे फार थोडी आणि म्हणूनच त्यांची अपूर्वाही जास्त. राजकारणी सार्वजनिक व्यवहाराची पत्रे सोडली तरी आईने मुलास वा मुलीस लिहिलेली, जावाजावांनी एकमेकीस लिहिलेली, बायकांनी नवऱ्यास लिहिलेली किंवा आजीबाईंनी नातवंडास लिहिलेली अशी बहुविध प्रकारची कौटुंबिक पत्रे वाचताना आजही मोठा मौज वाटेल. त्यांतील काही हे नमुने पहा.

१७४५ साली नानासाहेब पेशव्याची आजी राधाबाई हिने नानासाहेबांस लिहिलेले हे खरमरीत पत्र पहा. यावेळी पुण्यास अवर्षणामुळे पाण्याचा दुष्काळ पडला होता. तेव्हा सरकारी बागातील विहिरींच्या मोटा बंद ठेऊन आधी नागरिकांना

पाणी पुरविण्याचा हुकूम आपल्या अधिकारांत आपण का व कसा काढला ते राधाबाई नानासाहेबास कळवीत आहे.

"रा. त्रिंबकरावमामा यांचे कारभारी आम्हाजवळ बागेच्या मोटा चालवायासी परवानगी मागत होते. त्यास आम्ही सांगितले की, बागेत केळी व ऊस, वांगीची झाडे व मीरशेंगाची (मिरच्यांची) झाडे आहेत ती वाळली तरी कार्यास येतील. वरकड झाडे आहेत ती काही महिना दीडमहिन्यात मरत नाहीत म्हणून आज्ञा केली. पण ते त्यांनी एकले नाही, आणि उलट सातान्यास तुमचेकडे लिहून पाठविले! बहुत उत्तम केले!! बाग वाचवून शहर पाणिया करता हैराण करावे हे तो कार्याचे नाही. मोटा चालत्या केलियाने पाणिया करता आकांत होईल ऐसे आहे. पाणियासाठी पुढे कज्जे मारामाऱ्या होतील. ते काही आमच्याने ऐकवणार नाही. हे तुमच्या चित्तास न ये. तरी आम्हीच उठोन सातारियास येतो. येथे लोकांची हैराणगत आमच्याने पाहवणार नाही."

आनंदीबाई ही राघोबादादांची दुसरी बायको. तिच्या आधीची पहिली बायको जानकीबाई नावाची होती. गोपिकाबाई व जानकीबाई या जावाजावांचे परस्पर फार रहस्य होते. एकदा गोपिकाबाई नानासाहेब पेशव्याबरोबर स्वारीत होती. तिने धारवाड मुक्कामाहून पुण्यास जानकीबाईला पत्र लिहिले, ते असे-

"चि. सौ. जानकीबाई यासी प्रति सौ. गोपिकाबाई आसीरवाद. उपरी येथील कुशल ताा वैशाख वद्य द्वितीया नजीक धारवाड येथे समस्त सुखरूप असो. विशेष. तुम्हाकडून कागद सर्वदा येत असतात परंतु तुमचे खासा पत्र सुखसंतोषाचे येत नाही यावरून अपूर्व भासते. तरी सर्वदा पत्र पाठवून कुशलार्थ लिहून संतोषवीत जावे. वरकड चिरंजीव दादा यांचे जेवणास व फराळास जपत जावे. बहुत काय लिहिणे लोभ असा दीजे"

उलटपक्षी एकदा जानकीबाई राघोबा बरोबर स्वारीत गेलेली होती. तिला पुण्याहून गोपिकाबाई लिहिते-

"पंधरा दिवसाआड येथे पत्रे सरकारची येतात आणि आपणास पत्रे लिहावयास अवकाश होत नाही! तस्मात् येथे आम्हाजवळ तुम्ही होता तेव्हा तुमची माया येथल्या मुलांलेकरा नंतर वाटली गेली होती पण आता तेथे दादावरच माया राहिली! इकडील विरसलासे दिसते. परंतु ऐसे नसावे. येकायेकीच मित्रपणास अंतर न पडावे. बहुधा विस्मरणे करूनच असे होत असेल ते स्मरणे करूनच करावे."

या पत्रातील जावाजावांचे प्रेम किती गोड वाटते.

❑

जानेवारी १९६०

TG : MarathaArchives

श्रीगणेशकोश

मराठेशाहींतील गणेशदर्शन

महाराष्ट्रांत होणाऱ्या प्रत्येक धार्मिक मंगल कार्यासाठी गणपति देवतेची सुरुवातीस प्रस्थापना करावीच लागते. या दृष्टीने पाहिले असता गणपती हेच सर्व महाराष्ट्राचे एकमेव आदिदैवत म्हणता येईलहि. परंतु खरेच बोलावयाचे तर तो दावा टिकत नाहीं. कारण महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेली तीर्थक्षेत्रे किंवा देवस्थाने यांचा आढावा घेतला तर त्यांत शिवाची, रामाची, कृष्णाची, मारुतीची जी स्थाने आहेत, त्यांची संख्या गणपतीक्षेत्रांपेक्षां किती तरी पटींनी अधिक भरेल.

महाराष्ट्रांतील गणपती देवाच्या प्रसिद्ध आणि जागृत देवस्थानांची नोंद करणे या दृष्टीने सोपे आहे. मराठेशाहीपुरते बोलावयाचे तर मराठी राजांनी ज्या गणपतिस्थानांचा परामर्श घेतला तीच मराठी इतिहासांतील गणपतींची ठळक शिरगणती ठरते.

या दृष्टीने इतिहासांत नोंद झालेल्या गणपतींची परिगणना प्रथम अष्टविनायकांपैकी आठ गणपति, नंतर छत्रपतींनी, पेशव्यांनी आणि त्यांच्या सरदारांनी ज्यांना नवस केले किंवा नेमणुका करून दिल्या ते गणपती आणि त्यानंतर बहुजन लोकांनी पूज्य मानलेले गणपति अशा क्रमाने करूं.

चिंचवड :

चिंचवडच्या मोरया गोसाव्यांनी स्थापलेला गणपती फार जुना असून मोगल बादशाहांनीहि त्याला इनामे, वतने करून दिलेली आहेत. शहाजीने दिलेल्या सनदा आतां अलिकडे प्रसिद्ध झाल्या आहेत; व त्यापुढील काळांतील तर शेकड्यांनी सांपडतील. पुण्यांतील कसब्याचा गणपती शिवाजी महाराजांच्या मातु:श्रींनी म्हणजे जिजाबाई-साहेबांनी स्थापिला. याला विश्वसनीय ऐतिहासिक दस्तऐवजी आधारहि मिळतो. शिवापूर देशपांड्याच्या अधिकृत शकावलीत अशी नोंद आहे :

"गणपती जुना भेड्याचे आवर होते देशमुख देशपांडे यांचे घराचे दरम्यान असे देवालय हाली आहे. जिजावसाहेब शाहाजी राजे यांची स्त्री शिवाजी महाराज यांची आई हिणे बांधिले आहे. कलम १"

खुद्द शिवाजीमहाराजांनी तर नारोबा गोसावी चिंचवडकरांकडून गुरूपदेश घेतला होता. ते स्वत: चतुर्थीचा उपवास करीत असत. एकदा भोराजवळ आंबवडे येथे चतुर्थीस त्यांचा मुक्काम पडला असता तेथे गणपतीचे देऊळ नाही असे त्यांस आढळले म्हणून त्यांनी त्याच दिवशी तेथे गणपती स्थापून त्याचे पूजन करून मग उपवास सोडला. त्या गणपतीसाठी दिलेल्या जमिनीची नोंद अलीकडे नव्या संशोधनांत उपलब्ध झाली आहे.

पुण्यापासून १६ कि.मी. वर मुळा नदीस मिळणाऱ्या पवना नदीकांठी चिंचवड आहे. फार पूर्वी पुण्यात एक ब्राह्मण गृहस्थ रहात होता. तो व त्याची पत्नी ही दोघे अत्यंत सच्छील व निस्सीम गणपतीभक्त होतीं. पण त्यांस संतति नव्हती. पुढे गणपतिकृपेने मुलगा झाला म्हणून त्यांनी त्याचे नाव मोरेश्वर ऊर्फ मोरोबा असे ठेवले. मोरोबाच्या जन्मानंतर ते कुटुंब चिंचवडच्या दक्षिणेस ६ कि.मी. वर पिंपळे नावाचे खेडे आहे तेथे रहाण्यास गेले. मोरोबा लहानपणापासूनच देववेडा होता. लवकरच त्याचे आईबाप वारले. तेव्हां तो चिंचवडच्या पश्चिमेस ३ कि.मी. वर ताथवडें म्हणून खेडें आहे, तेथे रहाण्यास गेला.

त्यावेळी मोरगांव हेंच गणपतीचे जागृत स्थान म्हणून प्रसिद्ध होतें, थे ताथवड्याच्या आग्नेयीस ८० कि.मी. दूर होतें. तरी मोरोबा दरमहा चतुर्थीस तेथे जाऊन येत. मोरगांवच्या पुजाऱ्याला मोरोबांचा भक्तिभाव पाहून त्यांच्याविषयी फार आदर वाटूं लागला. आणि तो दरवेळी मोरोबांना तपेलीभर दूध देऊं लागला. पुढे एकदां अशी गोष्ट झाली की, पुजारी रानांत गेला होता. घरी फक्त एक आंधळी मुलगी होती. परिपाठाप्रमाणे मोरोबांनी दुधाची तपेली मागितली, तेव्हां त्या मुलीने पुजारीबाबा रानांत गेल्याचे सांगितलें. मोरोबा त्या मुलीला म्हणाले, "जाऊ देत, तूंच तपेली आणून दे!" आणि चमत्कार असा झाला कीं, त्या आंधळ्या मुलीला दृष्टी आली; आणि तिने ती दुधाची तपेली मोरोबांस आणून दिली. यानंतर शिवाजीमहाराजांचे डोळेहि मोरोबांच्या कृपेने बरे झाले आणि मग मोरोबांची 'सिद्ध पुरुष' म्हणून कीर्ति पसरली; आणि त्यांच्या दर्शनाकरितां लोकांचे लोढे येऊ लागले. तेव्हां तो उपद्रव टाळण्यासाठी मोरोबा ताथवड्याजीक गर्द जंगल होतें, त्यांत चिंचेची व वडाची मोठी झाडी होती, तेथे एकान्तवासांत जाऊन राहिले.

कालान्तराने मोरोबा वृद्ध होऊन थकत चालले. चतुर्थीला मोरगांवास चालत जाण्याच्या प्रवासास कष्ट पडूं लागले. एकदां असेच रखडत ते मोरगांवास जाऊन राहिले. मोरगांवास दर्शनाकरितां गेले असतां उशिरामुळें देवाची कवाडें लागलेली दिसलीं. उपास, चालण्याचे श्रम आणि देवदर्शन न झाल्याची रुखरुख यामुळे देवळाबाहेर टेकले असतां त्यांस झोंप लागली, तेव्हां गणपती त्यांच्या स्वप्नांत आला आणि त्याने सांगितले कीं, "तुझी कसोटी लागली. तूं आतां येथवर येण्याचे श्रम घेऊं नकोस. मीच तुझ्या अंतर्यामी येऊन रहातों व सात पिढ्यांपर्यंत तेथे वास करतों. चिंचवडास परत चल, तेथेंच मी आहें." देवाच्या आज्ञेनुसार मोरोबा चिंचवडास घरी

आले. तो चमत्कार असा की, त्यांच्या घरांत एक स्वयंभू गणपतिमूर्ति पाषाणाची प्रकट झाली होती! मोरोबांस अत्यानंद होऊन त्या जागी त्यांनी एक मोठें देऊळ बांधले, आणि जवळच स्वत: जिवंत समाधि घेतली.

मोरोबांचा मुलगा चिंतामणि. तुकारामबुवांना चिंतामणीच्या देवांशाची प्रचीति आली म्हणून ते त्यांना 'देव' म्हणूं लागले; आणि तेथून ह्या घराण्याचे आडनांवच देव पडलें. या चिंतामणि देवांचा पुत्र नारायण गोसावी यांच्याकडून शिवाजीमहाराजांनी गुरूपदेश घेतल्याची माहिती 'राजव्यवहारकोशा'च्या प्रास्ताविक श्लोकांत नमूद आहे. औरंगजेबाने गोमांसाचे ताट भरून या नारायण गोसाव्यांकडे पाठविले तेव्हां त्याचे जाईच्या फुलांनी भरलेले तबक झालें. हा चमत्कार पाहून औरंगचेबाने देव घराण्याला ८ गावे इनाम करून दिलीं. नारायण देवांना चिंतामणि देव म्हणून मुलगा झाला, आणि त्यांचा मुलगा पुन्हां नारायण गोसावी होता. हे सातवे देव. गणपतीच्या आशीर्वादानुसार या घराण्यांतील देवत्व सातव्या पिढीपर्यंत अखंड राहिलें. पुढे ते खंडित झाले म्हणतात; आणि त्याला निमित्त झालें, ते हे की नारायण देवांना मूळ मोरोबांची (मोरया गोसाव्यांची) समाधि उकरून पहाण्याची इच्छा झाली! या सातव्या पुरुषाला म्हणजे नारायण देवांना धर्मधर नांवाचा एक पुत्र झाला. पण तो १८१० साली वारल्याने औरस वंश खुंटला, म्हणून साखरी नावांच्या नारायण देवांच्या एका दूरच्या नातलगास इनाम गांवे टिकविण्यासाठी दत्तक म्हणून पुजाऱ्यांनी आणून बसविलें. आतांहि देवाची साक्ष चिंचवडास आहे म्हणतात कीं, तेथे होणाऱ्या वार्षिक उत्सवाचे वेळी कितीही जत्रा प्रसादास आली तरी कधी साहित्य कमी पडत नाहीं.

या देवांचे वंशज नाना फडणीस व हीरपंत फडके यांनी बांधलेल्या मोठ्या वाड्यांत रहातात. त्या वाड्याशेजारींच देवांच्या समाध्या आहेत. त्यापैकी मुख्य देऊळ मोरया गोसाव्यांच्या समाधीचें. त्या देवळावर जो मराठी शिलालेख आहे, त्यावरून देवळाच्या बांधणीस कार्तिक शु. द्वादशी, शके १५८० (म्हणजे सन १६५८-५९) विलंबी संवत्सरांत सुरुवात होऊन ते सोमवार, आषाढ शु.४ विकारीनाम संवत्सरांत समाप्त झालें.

नारायण देवांच्या समाधीच्या देवळावरील लेखावरून ते देऊळ बांधणीचं काम कार्तिक शु. १० शके १६४१ मध्यें सुरू होऊन वैशाख शु. ३ शके १६४२ मध्यें पुरे झालें.

चिंचवडास मार्गशीर्ष व. ६ स जत्रा भरते व ती तीन दिवस चालते.

मोरोबा गोसाव्यांना निजामशाही, आदिलशाहीपासूनच्या मुसलमान राज्यकर्त्यांनी दिलेल्या सनदा व त्यानंतर मराठी अंमलांतील शहाजीमहाराज, शिवाजीमहाराज आणि पेशवे इत्यादिकांनी दिलेल्या सनदा आतां पुष्कळच प्रसिद्ध आहेत. शिवाजी महाराजांनी दिलेल्या दोन चार सनदा मावजी पारसनीसकृत "सनद्स ॲण्ड

लेटर्स" या ग्रंथांत छापल्या आहेत.

राज्याभिषेक शक ११ माघ शु. ५ इंदुवासरी दिलेल्या आज्ञापत्रांत संभाजी-राजे यांनी देशाधिकारी व देशलेखक प्रान्त पुणे वर्तमान व भावी यांस असे लिहिले आहे: "श्री देवस्वामी वास्तव्य मौजे चिंचवड, प्रांत पुणे, बागा व इनाम कारकीर्द निजामशहा व मलीकंबर व कारकीर्द आदिलशहा व राजश्री महाराजसाहेब व कैलासवासी स्वामी कारकीर्द दर कारकीर्द चालत आले आहे. सबब गरीब गुरीब व फकिर फकिराणा, जो कोणी येतो त्यांस अउदक देत आहेत. याबद्दल गावं इनाम करून दिल्हा आहे. तेणेंप्रमाणे आम्हांसही चालविणे अगत्य आहे. तरी तुम्ही सालावाद चालिले आहे. तेणेप्रमाणे चालविणें, हरदरसाल नुतन पत्राचा उजूर न करणें. तालीक लेहून घेऊन अस्सल पत्र फिरावून देणें. जाणिजे. छ. ४ माहे सफर लेखनालंकार."

यानंतर संभाजी छत्रपतींनी राज्यभिषेक शके १४ मध्यें जो करडा हुकूम काढला होता तो पहिला म्हणजे या गणपती संस्थानास छत्रपति किती मानीत होते, तेथे स्पष्ट निदर्शनास येतें. आज्ञापत्र समग्रच उद्धृत करण्यांसारखे आहे.

श्री ।। शंभु भजनोत्कंठ मोरेश्वर सुत नीळकंठ

"स्वस्तिश्री राज्यभिषेक शके १४ प्रभवनाम संवत्सरे श्रावण शुद्ध षष्ठी, गुरूवासरे क्षत्रिय कुलवतंस सिंहसनाधीश्वर श्री राजा शंभु छत्रपती स्वामी यांणी, सुभेदारांनी व जुमलेदारांनी व कारकुनांनी व हवालदारांनी व बारगिरांनी व अफरादानी व बाजेललष्कर व हुजरात व सुभेहाय व हशम यांसी आज्ञा केली ऐसीजे:– मौजे चिंचवड, प्रांत पुणे हा गांवा श्रीदेव यांकडे चालतो. तेथे आपल्याला कांही उपद्रव देऊं नये, अशी पहिल्यापासून स्वामींची आज्ञा. असे असतां तुम्ही रहदारीस नाहक दरपत्ती करितां (हरकती?) मौजे मजकुरी उपद्रव देऊन धामधूमही करितां. रयतीकडून गैरसनदी मनास येईल ते मागत होता. म्हणोन कळो आले. तर या गांवी तुम्हाला धामधूम कराया काय गरज? हे ढंग स्वामींस कैसे मानों पाहतात? याउपरीही बदरहा वर्तणूक केलीया, तुमचा एकंदर मुलाहिजा होणार नाही. जो धामधूम करील, त्याला स्वामी जिवेंच मारतील. हे जाणून मौजे मजकुरास तसदी न देणें. बोभाट येऊं न देणें. ताकीद असे. जाणिजे. लेखनालंकार"

मर्यादेयं विराजते

राज्याभिषेक शके १८ मध्ये राजाराम छत्रपतींनी नारायण गोसाव्यांस पुन्हा चिंचवड गांव इनाम करून दिला. त्यांत, "श्री मोरोबा गोसावी देव यांचे पुत्र श्री नारायण गोसावी देव हे बहुत थोर साधू मंगलमूर्तीचे वरदायक अनुष्ठान निरत सत्पुरूष युगेश्वर बहुत प्रसिद्ध यांचा महिमा अपार आहे ऐसे जाणून." असे देवांचे वर्णन केले आहे.

अर्बातिसैन अलक् (४-१०-१०००) २ रजब (मुसलमानी वर्षाचा सातवा महिना) रोजी शंकराजी नारायणांनी चिंचवडकर देवांना मौजे माण तर्फ कर्यात मावळ हा गांव इनाम दिला.

(ता. १६-८-१७२४ तारखेचे बाळाजी विश्वनाथाचे देशाधिकारी प्रांत पुणें, यांस आज्ञापत्र)

"श्री देवचिंचवड हे बहुत थोर सत्पुरूष व अनुष्ठानी तत्पर, व महाराज राजश्री स्वामीच्या राज्याची अभिवृद्धी व्हावी, ये करिता त्यास नूतन इनाम मौजे वीर तर्फ नीरथडीपैकी एक चावर (१० बिघे)जमीन वंशपरंपरा इनाम दिली आहे, ती चालविणे."

(पांडोबा दप्तर, मंडळ संग्रह प. क्र. १५०६.)

(वास्तविक बाळाजी विश्वनाथ १७२० साली वारले. मग त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नांवे हे पत्र कसें? बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतरहि कांहिं वर्षे त्यांचा शिक्का बाजीराव पेशवे वापरीत होते हे ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध झाले आहे. पण गतपित्याचा शिक्का वापरणे निराळे व गतपित्याच्या नांवाने आज्ञापत्र काढणे निराळें! हे विचित्र दिसतें. कदाचित मूळ कागदांतील सन उतरवितांना लेखकाची चूक झाली असेल.)

रांजणगांव :

रांजणगांव हे दुसरे अष्टविनायकांपैंकी स्थान. त्याला "गणपतींचे रांजणगांव" असेंच म्हणतात, राजणगांवे दोन आहेत. एक केडगांवजवळचे व हे दुसरे गणपतीचें. हे स्थान शिरूर म्हणजे घोडनदीचे अलिकडे पुण्याजवळच आहे. देऊळ चुनेगच्ची व सुंदर कळसांचे आहे. चिंचवडचे देव हेच येथील पुजारी. सध्या जी दृश्यमूर्ति आहे, ती मुख्य नव्हे. तिच्याखाली तळघरांत एक लहान मूर्ती आहे. तिला १० सोंडा व २० हात आहेत. मुसलमानांच्या भयाने ती मूर्ती तेथे लपवून ठेवण्यांत आली होती, ती तशीच आहे, तसे सध्याचे पुजारी सांगतात. यांनी सुप्रसिद्ध मल्हाराव होळकरांचे दिवाण गंगोबा तात्या चंद्रचूड यांना लिहिलेंली दोन महत्वाची अप्रसिद्ध पत्रें श्री. य. न. केळकर यांना त्यांच्या संशोधनांत मिळालीं. त्यावरून देवळाचे बांधकाम कसें, केव्हां झाले व मौजे रांजणगांव श्रीच्या अन्नछत्राचे बेगमीसाठी इनाम करून घेण्याची खटपट कशी झाली ते कळते.

पहिले पत्र असें: "आपण (आम्ही) येथे कारखान्याचा प्रारंभ केला. आपण (आम्ही) पाच वोवऱ्या केल्या व राजश्री त्रिंबकपंतापासून पाच करविल्या. व वे. मू. गोपाळभट यांचेपासून पाच करविल्या. त्या येक बाजू तयार जाली मग आपण (आम्ही) भिक्षावर्ती प्रदक्षिणेचे वाटेचा फरश तयार केला. देवळामागील गणेशतीर्थ

संगी बांधून तयार जाले. आता सांप्रत श्रीचे सन्मुख महाद्वाराचे दरवाजा पहिला होता. तो मोडून थोर संगी कामाचा आरंभ केला आहे. आपणास कळावे आपला (आमचा) हेत आपण येतो पावेतो टाकी चालवावी, परंतु आता महागाईमुळे चालेल न चालेल हे कळेना. हे आशीर्वाद."

देवांचे दुसरे पत्र असे: "मौजे रांजणगांव तर्फ पाबळ तनखा रुपये २२११. हा गांव श्रीच्या अन्नछात्राचे उत्साहाचे बेगमीस असावा. या विसी गतवर्सी आपले आगमन जाले होते. हे समई सूचना केली आहे. सांप्रत श्रीच्या साहित्यास प्रविष्ठ होय. ते गोष्ट केली पाहिजे."

थेऊर :

थेऊरचा गणपती हे अष्टविनायकांपैकी तिसरे स्थान देऊळ दगडी व सभामंडप लाकडी. देवळाभोवती ओवऱ्या व सोपे. खास पेशव्यांचा वाडाही बांधलेला होता. थोरल्या माधवरावांचा मृत्यू देवळांतील एका ओवरीतच झाला. पेशव्यांनी हरिपंत फडक्यांना वंशपरंपरेने चौघडा बक्षीस दिला होता, तो चौघडा त्यांनी स्वत:स न घेतां थेऊरच्या गणपतीस दिला. याचा अर्थ असा की, हरिपंताला चौघड्याच्या मानाबद्दल जी नेमणूक पेशव्यांनी करून दिली, त्या नेमणुकीचा पैसा हरिपंतांनी थेऊरच्या चौघड्यासाठी दिला. ११ माणसांचा हा चौघडा होता. पेशवाई गेल्यावर इंग्रज सरकारांतून त्यासाठी वार्षिक ८०० रुपये मिळत. देवळांत वसईच्या मोहिमेत चिमाजी आप्पांनी जिंकलेली एक प्रचंड पोर्तुगीज घंटा आहे. थेऊरला मुळामुठेचे पात्र विस्तीर्ण असून मोठा डोह आहे. रमाबाईचे - सतीचे स्मारक नदीकाठी आहे. कोणी म्हणतात, मोरया गोसाव्यांना थेऊरलाच प्रथम सिद्धी प्राप्त झाली. चिंचवडच्या देव घराण्यांतील पुरुषांना पेशवे गुरू घराण्यासारखेच मानीत व त्यांच्यावर देणग्यांचा वर्षाव करीत. यासंबंधी कितीतरी महत्त्वाच्या नोंदी राजवाडे खंड ६ मधील पुरंदऱ्यांना शकावलीत आलेल्या आहेत. उदाहरणार्थ, "शके १६७६ भाद्रपद मास शु.९ मंगळवार, श्री देव चिंचवड वानवडीतून पर्वतीस आले. श्रीमंतांनी त्यांचे डेरे मोरोपंताना याचे बागांत दिल्हे. श्रीमंत भाऊ डेरे यासी देवाकडे येऊन गेले. शुद्ध १० बुधवार, श्रीमंत नाना व भाऊ श्रीचे दर्शन करून गेले.

शुद्ध ११ सह १२ गुरूवार. श्रीमंत उभयता प्रसादास आले. त्यांस वस्त्रे देऊन वाटे डेरियांतून लाविले. शुद्ध १३ शुक्रवारी श्री देव श्रीमंताच्या वाडियांत येऊन, भाऊ दरवाजियापावेतो सामोरे येऊन, वाडियांत नेऊन, श्रीस शाल १ व धोतर जोडा १, मुर्तीस पदके सुमार २ दोन, मुलास त्यांचे, कडी सुमार ३ तीन दिल्ही. वस्त्रे अवघे भाऊबंद वगैरे मिळोन गाठोडी बांधोन दिल्ही. याखेरीज देवाचे बायकांस लुगडी सुमार १२ बारा दिल्ही. ऐसा बहुमान करून नदीपार चिंचवडास गेले."

थेऊरला तर पेशवे वारंवार जात येत असत. थेऊरच्या गणपतीवर नानासाहेब पेशव्यांची केवढी भक्ति होती, ते या पुढील नोंदीवरून समजेल. ही नोंद १७५२ सालची आहे. ती अशी: "आषाढ वद्य ८ गुरुवारी श्रीमंत राजश्री बाळाजी पंडित प्रधान, थेऊरास सुवर्णाचा रथ हत्तीचा केला होता. त्याचे दान करावयास गेले. दुसरे दिवशी शुक्रवारी अधिवासन केले. तिसरे दिवशी मंदवासरी एकादशीस दान केले. लाखा सव्वा लाखा रु॥ सोने होते."

थोरल्या माधवरावांच्या लग्नासाठी चिंचवडाहून श्री देव मुद्दाम आले होते. त्यासंबंधी नोंदी अशा: "शुद्ध १३ मंदवासर. राजश्री पंतप्रधान यांचे दुसरे पुत्र माधवराव यांचे लग्नाची देवकप्रतिष्ठा दो प्रहरा खाशा नानांनी केली.

शुद्ध १४ रविवारी श्रीमंतांचे लग्नास श्री धरणीधर देव आले. नदीपलीकडे राहिले."

शके १६७६ मधील ही आणखी एक नोंद पहा: "श्रावण शुद्ध ४ मंगळवार, श्रीमंत राजश्री श्री भाऊ व पुरंदरे घोडीयाचे रथात बैसोन धावतच जाऊन थेऊरच्या देवाचे दर्शन घेऊन ताबडतोब बरोबर आले."

थेऊरच्या गणपतीला पेशवे कुटुंबांतील लोक नेहमीच नवस करीत असत.

दरसाल संक्रांतीला पेशव्यांतर्फे निरनिराळ्या आप्तस्वकींना व सरादारांना तिलशर्करा पाठविण्यात येई. त्या याद्यांत सुरुवातीस आधी ज्या देवांच्या नावे तिळगूळ पाठविण्यात येई. त्यांत श्री देव थेऊर, श्री देव चिंचवड व श्री देव मोरेश्वर यांचा समावेश असे. (प. द. भ. १७, ले. ८४ पृ. ६५)

थोरल्या माधवरावांची थेऊरच्या गणपतीवरील निष्ठा तर निस्सीमच होती. त्या देवाच्या पायाशी मृत्यू यावा म्हणून थेऊरास ते आले, त्या दिवशींच त्यांनी मोत्यांचा तुरा १० हजार रुपयांचा देवास दिला.

असे हे थेऊरचे माहात्म्य ऐतिहासिक कालापासून चालत आले आहे. पण वाईट इतकेच वाटते की, ही सगळी जागृत देवस्थाने मोगलांच्या स्वाऱ्यांत विच्छिन्न झालेली आढळतात. थेऊरच्या गणपतीचाही विध्वंस निजामच्या स्वाऱ्यांत व पुढे यशवंतराव होळकराच्या मुसलमान पेंढाऱ्यांच्या स्वाऱ्यांत झाल्याचे दाखले आढळतात.

सिद्धटेक :

सिद्धटेक हेही अष्टविनायकांपैकीच महत्त्वाचे गणपतिस्थान. हे भीमेच्या काठी आहे. या गणपतीस सिद्धिविनायक म्हणतात. या गणपतीची प्रसिद्धी पूर्वापार असली तरी थेऊरच्या गणपतीचे माहात्म्य थोरले माधवराव पेशव्यांच्या तेथे झालेल्या मृत्यूमुळे जसे विशेष वाढले तसेच या सिद्धटेक गणपतिस्थानाचे माहात्म्य येथे हरिपंत फडक्यांचे देहावसान झाले त्यामुळे वाढले. हरिपंतांना पोटदुखीची व्यथा फार दिवसांपासून होती. अखेर या दुखण्याने ते अत्यवस्थ झाले तेव्हा गणपतिचरणी चरणी मृत्यू यावा म्हणून ते येथेच येऊन राहिले होते.

हिजरी सन १२०८ जिल्काद २२ ते २८ छ २८ जिल्काद शुक्रवारच्या मराठी अखबारात पुढील माहिती आहे: "हरिपंत फडक्याचा इंतकाल जाल्याचे वर्तमान पूर्वी लिहिले आहेच. त्यास मारनिलेचे पुत्र चिंतामणराव व रामचंद्रराव फडके हरिपंत मुतवफाचा आखर लवाजमा सिधटेकी करून पुण्यास आल्यानंतर राव पंतप्रधान आवल मातमीच खिलाअत देऊन बाद फौजेचे बक्षीगिरीचे काम त्याजकडेच बहाल ठेऊन खिलाअत देणारे म्हणौन यैकिले.

हरिपंत फडके मुतवफाचे पुत्राचे समाधानीकरिता राव पंतप्रधानानी कृष्णराव बलवंतास छ २५ माहे जिलकादी रुखवत केले. माशानिले छ २६ रोजी पुण्याहून स्वार होऊन सिधटेकास गेले.

हरिपंत फडके मुतवफाचे आखर लवाजम्याकरिता राव पंतप्रधानांनी तोषखान्यातून पन्नास हजार रुपये देविले.

हरिपंत फडके मुतवफाचा आखर लवाजमा छ ३ माहे जिल्हेजी केला. या उपरी मारनिलेचे पुत्र चिंतामणराव वगैरे छ. ८ रोजी पुण्यास येणार. आल्यानंतर चिंतामणराव फडक्यात राव पंतप्रधान मातमपुरसीची खिलअत देणार आहेत."

हरिपंत फडके २० जून १७९४ रोजी वारले.

येथील गणपतिमूर्तीचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे गणपतीचे पोट फारच लहान आहे. लंबोदर नाही.

देवळानजिक हरिपंत फडक्यांनी बांधलेला घाट आहे. देऊळ अहिल्याबाईने बांधले. पेशव्यांनी नंदादीप दिला. हरिपंत फडक्यांनी चौघडा दिला. आणि बडोद्याचे सावकार गोपाळराव मैराळ यांनी सभामंडप बांधला.

या मैराळांच्या गणपतिभक्तीचा स्तव शाहिरांनी एका पोवाड्यात असा केला आहे. हा पोवाडा अप्रसिद्ध, श्री. य. न. केळकर यांना नवीनच उपलब्ध झाला तो येथे मुद्दाम उद्धृत केला आहे.

"कीर्तजगी विख्यांत शहर बडोद्यांत मैराळभाऊ॥ धनिसमशेर बहाद्दूरांचे दिवाण सलामत राहूं॥धृ॥ दीन दयाळू : गोपाळराव मैराळ भुपाळू :। बहु कनवाळू : प्रसन्न गणपति मंगळमूर्ती : न्यून नसे भरपूर संपत्ती: वरहदस्त गर्भी श्रीमंती : ही तपाअंती : चहूकडे लौकीक सर्व जाणतात उमराव धनी समशेर बहाद्दूरचे दिवास चौमुखली नाऊ॥१॥ गजाननाचे पुण्य नसे कुठे न्युन्ये : विप्रभोजने गोप्रदाने। सर्वदा देणे पातका शून्ये। आतीता जाणे : साधुचा मान लक्षिता धन्ये । विधि उत्पन्न केले कर्त्यांने। ईश्वरी रूप अकस्मात उजळिला दीप। पून्यशीळ खुब : प्रसन्न चवदा विद्यांचे भूप : नित्य ब्राह्मणा साकरतूप । अंगिदया धर्माचा हूप। प्रसन्न गजानन वारणामुख।

करिता स्मरण हरती दु:ख। तयाला ध्याती ब्रह्मादिका देव सुरवर ते इत्यादिक। धन्य धन्य न कळे कौतुक। भक्त गोपाळराव मैराळ एक। दया, क्षमा, शांतीचा चातुर्य। बहुत जनाचे धर्मकार्य। मोठे लक्षुमीचे औदार्य। मोठे मोठे करिता आश्चीर्य। देणे गजाननाचे सर्व॥ सिवसुत गौरी कुमर विघ्नहर विनायक पाहू॥ कीर्ति इ.॥२॥ धर्मपाळ विशाळ धुरंधर। श्रेष्ठ पदाचे द्रव्य अचळ सुचीळ बुद्धिचे। धन्य कीर्ति किती वदूं वाचे। देणे ज्याला गजाननाचे धर्मावर मन उदार ज्याचे। नव कोटी नारायण साचे। नांव दिगांतरि रावसाहेबाचे। गोपाळराव मैराळाचे। विलायेतांत डंके नावाचे। वीर क्षेत्रि सावकार बडोद्याचे। धर्मराज्य गायकवाड सरकारचे॥ धनि मल्हारराव महाराजाचे। मैराळभाऊ दिवाण तयाचे। शोभा इमान सत्यवचनाचे। जसे रामावर मन भरताचे। सत्य जाणिजे याच रितीचे। साल १९२७ साचे। गुरुवारी रोजी बीजाचे। शुभदायक साधन मुहूर्तांचे। शुद्ध पक्ष उत्तम चैत्र। गोपाळराव सुपात्र। झाले दिवाणगिरीचे वस्त्र। वस्त्र होताना खुषी सर्वत्र। पाहुनशाने ध्याले नेत्र। शिरि विघ्नहराचे छत्र। तात्या कवीसर बहुजग मित्र। कवन केले शोधुन अंतरांता। पवाडा गाइला सभेत। आर्जे ऐकावी श्रीमंत। करा कविला ऋण मुक्त। प्रस झाले एकदंत। गजानन प्रस सद्गुण हर्षाने गाऊ। धनिसमशेर॥३॥

पाली :

अष्टविनायकांपैकी पाचवे पालच्या बल्लाळेश्वराचे स्थान.

पालीच्या बल्लाळविनायकाचे स्थान नागोठाण्यापासून सात मैलांवर आहे. सध्याचे देऊळ मोरोबादादा फडणिसांचे वडील बाबूराव फडणीस यांनी बांधून नेमणूक करून दिली.

हे स्थान पालीच्या बाहेर नजीक जंगलात आहे. जवळ दोन पुष्करण्या आहेत. सर्वत्र जमीन पाणथळ व जागा रम्य आहे. आता देवळाभोवती घरे बांधिली आहेत. देवाची मूर्ति फार रुंदा व विस्तृत, ओबडधोबड अशी अर्धपुतळ्या (बस्ट) सारखीच अकृत्रिम आहे.

देवस्थान रम्य आहे. त्रिफाळ चौघडा आहे तो रामभाऊ मोडक म्हणून वकील होते, त्यांनी देऊन आपले नाव अशा प्रख्यात ठिकाणी सर्वतोमुखी केले आहे.

पालीचा बल्लाळेश्वर मोठे जागृत देवस्थान. जुन्या काळी अनेक अतताई नवसांचे प्रकार येथे रूढ असत. त्यांपैकी आपली जीभ कापून देवास वहाण्याचाही एक प्रकार असे. पालीच्या गणपतीस अशा जिव्हा वहाण्याचा एक प्रकार १७४४-४५ साली प्रत्यक्ष घडला तेव्हा पेशव्यांनी देवस्थानची अर्चा शुद्धि केल्याचा दाखला बा. बा. पेशवे यांच्या रोजनिशीत सापडतो. तो प्रकार असा : "श्री बल्लाळेश्वर वास्तव्य कसबे पाली येथे विद्यार्थी यांनी जिव्हा वाहिल्या, यास्तव अर्चा शुद्ध करावी, म्हणोन देवाने दृष्टांत दिल्हा, याचा मजकूर लिहिला तो साद्यंत कळला. ऐशास देवस्थान, बहुत

जागृत स्थल आहे. यास्तव तुम्हास आज्ञा केली असे. तरी दोनशे रुपयांपासून चारशे रुपयापर्यंत लावून अर्चा शुद्ध उत्तम प्रकारे करणे म्हणोन रामाची बावजी हवालदार तर्फ हवेली पाल १ यास." (इ. स. १७४४-४५ खमस आर्बैन मया व अलफसात्रान ८)

सन १७५३-५४ साली पेशव्यांनी पाच-सहा जागृत देवस्थानांत अनुष्ठाने सुरू केली होती. त्यात पालीचा बल्लाळेश्वर व रांजणगावचा गणपती या दोन देवस्थानांचा समावेश होता. त्यासंबंधीची नोंद अशी : "नोंद सन इ. स. १७५३-५४ ती अर्बा खमसेन मया व अलफ मोहरम १०. चिरंजीव निळकंठ महादेव यास अनुष्ठानाचे ब्राह्मणास साहित्य प्रांत पुणेपैकी दोन म्हणोन सनदा."

मी मोरेश्वर येथे, श्री सोमया देव येथे, श्री सिद्धेश्वर परगणा पारनेर, श्री बल्लाळेश्वर तर्फ पाल हेवेली, नी यवतेश्वर सातारा, श्री जेजुरी येथे, श्री देव नारायण किल्ले पुरंदर येथे, श्री बनेश्वर येथे. श्री भगवती वेहर, श्री गणपती रांजणगाव.

तेरीज आसामी ४० साहित्य

१ श्री देव
५ अनुष्ठानाचे ब्राह्मण
१ आचारी
१ खटपट्या
८ आठ आसामीस साहित्य.

(बा. बा. पेशवे. रोज. खं. २ पृ. २०५ प. क्र. ३२७)

लेण्याद्रि :

जुन्नरजवळील लेण्याद्रि गणपती हाहि विशेष महत्त्वाचा आहे. ज्या डोंगरावर लेणी कोरलेली आहेत असा डोंगर म्हणजे लेण्याद्रि व त्यांपैकी एका लेण्यात या गणपतीची स्थापना झालेली असल्यामुळे त्या गणपतीचे नाव लेण्याद्रि गणपती असे पडले आहे. पौराणिक आख्यायिका अशी की, विनायक हा आपला पुत्र व्हावा ह्यासाठी पार्वतीने ज्या गुहेत तप केले ती ही जागा. विनायक प्रकट झाल्यावर त्याची स्थापना तिने जेथें केली त्या मूळ गुहेचे द्वार डोंगराच्या दुसऱ्या बाजूस आहे म्हणतात, पण तेथे आत जाऊन पार्वतीने स्थापलेल्या त्या गणपतीचे दर्शन घेता येत नाही. ती जागा हल्लीचा जो गणपती आहे, तिच्या दुसऱ्या बाजूस पाठीमागे भयंकर कड्याच्या ठिकाणी दुर्गम आहे, असे म्हणतात. अशीही एक आख्यायिका सांगतात की, एकदा नाना फडणिसांनी गुहेच्या दुसऱ्या टोकास जाऊन त्या गणपतीचे दर्शन घेण्याची खटपट केली होती, परंतु त्यांना साक्षात्कार झाल्यामुळे तो प्रयत्न त्यांनी सोडून दिला. ह्या एकंदर प्रकारावरून अशी समजूत रूढ झाली आहे की, लेण्याद्रीस

जे दर्शन होते ते त्या गणपतीच्या पाठीचे, आणि म्हणूनच पाठपोट दोन्ही ज्यात समाविष्ट आहेत, अशात या साऱ्या डोंगरालाच गणपती मानून पूजा करतात. वास्तविक स्थिति अशी असली पाहिजे की, बौद्धकाळी कोरलेल्या या लेण्यात पुढे कालांतराने दगडी भिंतीवर विनायकाची प्रतिमा खोदविली तोच हल्लींचा गणपती आहे. ज्या लेण्यात हा गणपती कोरलेला आहे ते ७० फूट लांब व ७० फूट रुंद व १२-१४ फूट उंच अशा एखाद्या दगडी सभामंडपासारखेच आहे.

ओझर :

ओझरचा गणपती हाही अष्टविनायकांपैकीच एक होय. अष्टविनायकांच्या स्थानांत ओझरचे स्थान विशेष रम्य आहे. विघ्ननायक राक्षसाचा येथे गजाननाने पराभव केला, या पौराणिक गोष्टीमुळे येथील गणपतीला विघ्नेश्वर गणपती म्हणतात. चिंचवडचे देव हेच येथील पुजारी असून देवस्थानास दोन हजाराचे उत्पन्न आहे. देऊळ दगडी; बाहेर फरसबंदी पटांगण व किल्ल्याच्या तटासारखा चौफेर कोट. देवळास लागूनच नदी आहे. घाटही बांधलेले आहेत. १८८५ च्या 'गॅझेटियर' मधील माहितीप्रमाणे हे देऊळ सुमारे १७८५ साली बांधण्यात आले असावे.

मोरगाव :

मोरगावचा मोरेश्वर हेही अष्टविनायकांपैकी एक स्थान. हे सुप्याच्या नैर्ऋत्येस ६ कि.मी. वर कऱ्हेच्या काठी आहे. येथील गणपतीचे देऊळ प्रशस्त व सुंदर आहे. चिंचवडास जाईपर्यंत मोरोबा गोसावी येथल्या गणपतीचीच सेवा करीत असत. देवळाचा सभामंडप म्हणजे मोठी थोरली कासवाचा आकार दिलेली फरसबंदी आहे.

महड :

महड हे अष्टविनायकांपैकी वरदविनायक गणपतीचे स्थान खोपोलीपासून जवळ आहे. अष्टविनायकांपैकी हे स्थान असतांही देऊळ मोठेसे नाही. गाव मध्यम वस्तीचा. येथील देशस्थ ब्राह्मण येथील उपाध्येपणाचे काम करतात. या गणपतीचे दोन उत्सव होतात. पहिला उत्सव भाद्रपद शु. १ पासून ५ पर्यंत व दुसरा माघ शु. १ पासून ५ पर्यंत. हा गणपती काही लोकांचे कुलदैवत असल्यामुळे त्यांच्यातर्फे पूजाअर्चा सदैव चालू असते. वर्षाच्या १२ महिन्यांच्या संकष्ट चतुर्थ्या निरनिराळ्या भक्त मंडळींनी वाटून घेतल्या आहेत. महड येथील हल्लीच्या देवळातील प्रतिमा येथील तळ्यात सापडली. ती ज्या दगडी देव्हाऱ्यात होती, तो देव्हारा देवळाजवळच ठेवला आहे. देवाला सरकारांतून पूजा व नंदादीपाबद्दल १८ रु. मिळतात.

नांदगाव :

मुरुड नांदगांवचा गणपती हे जंजिरेकर हबश्याच्या मुलखांतील प्रख्यात गणपतीचे

स्थान. नांदगाव येथील एका जोशी घराण्यातील पुरुषाला हा गणपती प्रसन्न झाला. तो गावच्या उत्तरेस एका केतकीवनात होता. तो, त्या जोश्याच्या स्वप्नात आल्यामुळे तो त्याच वनात ध्यानास जाऊ लागला. एक दिवस मुसळधार पावसाने मधली खाडी पुराने भरून गेली होती व आठ दिवस त्याला तिकडे जाता आले नाही. ते आठ दिवस त्याने निराहार निश्चक्र उपास करून व मौनव्रत स्वीकारून काढले. पूर ओसरल्यावर तो त्या वनात गेला; आणि त्या गणपतीला कडकडून भेटला. तेव्हा तो गणपतीही अगदी हलका होऊन त्याच्या छातीला चिकटून त्याला घरी आला व तेथे जाताच जड झाला. तेव्हा तेथेच त्या जोश्याने त्याची स्थापना करून हे देऊळ बांधले. तो अप्रतिम ज्योतिषी व रमल विद्या जाणणारा होता. जंजिऱ्याचा किल्ला बांधतांना त्याच्या पायाचा मुहूर्त जोशीबुवांच्या मुलींकडून शिद्याने मिळविला. कारण जोशीबुवा परगावी गेला होता. जोश्याने आपल्या मुलीस आपली विद्या सर्व हौसेने शिकविली होती. मुलीने दिलेला मुहूर्त इतका उत्तम दिला होता की, किल्ला कायमच अभेद्य रहावा. आणि ही गोष्ट खरीही ठरलेली आहे. शिवाजी महाराजांपासून पेशव्यांपर्यंत सर्वांनी तो किल्ला वेढा देऊन जिंकण्याचा प्रयत्न अनेकवार केला; पण कधीही सिद्धीस गेला नाही. इंग्रजी अंमलात व आता आपल्या ताब्यात आला तो लढाई करावी न लागता केवळ झाडावरचे पिकले फळ तोंडात पडावे त्याप्रमाणे! म्हणजे किल्ल्याची दंतकथेत सांगितलेली अभेद्यता खरीच ठरली आहे.

हा नांदगावचा गणपती उजव्या सोंडेचा आहे.

नांदगावपासून मुरुड ६ मैल आहे. ही जुन्या जंजिरा संस्थानची राजधानी होती. पालीचा जो गणपती आहे, त्याचे मूळ स्थान मुरुडासच होते. पूर्वी तेथे देऊळ होते ते नष्ट झाले व आता फक्त दगडाचा चौथरा तेवढा आहे. हल्ली कोणा जोशी वकिलांनी त्या जुन्या गणपतीचा प्रतिनिधि म्हणून एक नवे गणपतीचे देऊळ बांधले आहे. आख्यायिका अशी आहे की, मुसलमानांनी देवळाचा विध्वंस केला तेव्हा हा गणपतीही काशी विश्वनाथाप्रमाणेच पळून गेला. तो एका लमाणाच्या तांड्यांतील बैलाच्या धान्याच्या गोणीत जाऊन लपून बसला. पाली मुक्कामी पाठीवरील गोण फार जड झाल्यामुळे बैल वारंवार बसू लागला, तेव्हा लमाणाने गोणी तपासता हा गणपतीचा धोंडा दिसला. त्याने तो काढून टाकला. त्याला काय ठाऊक की, तो गणपती असेल! या आख्यायिकेतील खरा इतिहास इतकाच दिसतो की, मुरुडच्या या देवस्थानाचा मुसलमामांनी विध्वंस केला, तेव्हा तेथील पुजाऱ्यांनी ही देवमूर्ति पळवून पालीला नेऊन ठेवली.

गणपतीपुळे :

अष्टविनायकांनंतर महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली मोठी देवस्थाने तीन; एक -

पुळ्याचा गणपती; दुसरा - तासगावचा गणपती आणि तिसरा - सांगलीचा गणपती.

पुळ्याचा गणपती हे स्थान रत्नागिरी शहराच्या उत्तरेस समुद्रकिनाऱ्यास आहे. ठिकाण अत्यंत रमणीय अशा समुद्राच्या पुळणीत आहे. देवस्थानच्या उत्तरेस गाव वसलेला असून तो श्रीक्षेत्र गणपतीमुळे या नावानेच प्रसिद्ध आहे.

पुराणातली जी भारताची दिशाद्वारे म्हणून वर्णन केलेले आहे, त्यांपैकी हे स्थान पश्चिमद्वार समजतात व या गणपती देवतेला पश्चिमद्वार-देवता म्हणतात.

देवालय गावच्या दक्षिणेस असून त्याचा मुख्य दरवाजा उत्तरेकडे आहे. त्यातून आत गेल्यावर देवाचा मुख्य घुमट म्हणजे गाभारा लागतो. तो पश्चिमाभिमुख आहे. हा गाभारा शिवाजीमहाराजांचे एक प्रधान अण्णाजी दत्तो सचिव यांनी बांधला. त्या आधी तेथे देवावर केवळ एक गवती छप्पर असून भोवती पुळणवट होती. देवळाची बांधणी अशी आहे की, सभामंडपाच्या पश्चिमेकडील दरवाजात उभे राहिले असता तेथून पुढच्या समुद्रात होणारा सूर्यास्त उत्तम दिसतो. अस्तमानी सूर्याची मावळती किरणे गणपतीच्या मुखावर पडतात. हा सभा मंडप बुंदेले सरदारांनी बांधलेला आहे.

देवळाच्या घुमटाचा वरचा भाग मुकुटाकार असून वर सोन्याचा मुलामा दिलेला कळस चढविलेला आहे. हा कळस अलिकडच्या काळातील सुमारे ७५-८० वर्षापूर्वीचा असून तो कोल्हापूरचे तेव्हाचे कारभारी माधवराव वासुदेव बर्वे यांनी दिलेला आहे.

देवळातील मुख्य देवाच्या उजव्या बाजूला एक गणपतीची तांब्याची मूर्ति स्थापन केलेली आहे. ज्या वेळी मंगलमूर्तीला जुनी खोळ पडल्यामुळे नवीन शेंदराचा लेप किंवा कवच चढविण्यात येते, त्या वेळी या ताम्रमूर्तीचा पूजेसाठी उपयोग करतात.

या देवस्थानाला मिळालेल्या देणग्यांची सनदा-पत्रे शिवकालापासून पुष्कळच सापडतात. महादेवभट शेंड्ये यांना या श्रीगणपतीपुढे नित्य पुराण सांगण्याची वृत्ती थोरल्या श्री शिवाजी महाराजांनी करून दिलेली आहे. या शेंड्ये घराण्यासंबंधी सांगण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट ही की; यांच्या घराण्यातील एक महादेवभट शेंड्ये यांची कन्या, हरभट पटवर्धन उपाध्ये मौजे कोतवडे, यांना दिली होती. हे हरभट म्हणजेच पेशवाईतील 'वीरांची विलायत' म्हणून गाजलेले जे पटवर्धन घराणे त्याचे आद्य पुरुष! हरभट तपस्वी आणि गाणपत्य म्हणून विख्यात होते; आणि त्यांचे वंशज सर्वच गाणपत्य झाले. पटवर्धनांचे कुलदैवत पुळ्याचा गणपतीच आहे. पटवर्धन सरदारांनी शेंड्यांबद्दलचा जुना आप्तसंबंध फार अगत्याने सांभाळला. त्यांनी शेंड्याना आपल्या जहागिरीत काही इनामेही करून दिली होती.

पेशव्यांपैकी नानासाहेब हे प्रखर गाणपत्य. ते मुद्दाम आपल्या कटुंबियांसह

पुळ्यास दर्शनास गेल्याची हकीगत पार्वतीबाईसाहेब पेशव्यांनी अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांना एका पत्रात लिहिलेली उपलब्ध आहे. ही पुळ्याची स्वारी १७५९ साली झाली. त्या वेळी नानासाहेबांबरोबर गोपिकाबाई, आनंदीबाई, रघोबादादा व माधवराव इतकी मंडळी होती.

पार्वतीबाई पेशवी व थोरल्या माधवरावांच्या पत्नी रमाबाई पेशवी या पुळ्याच्या यात्रेस १७६९ साली गेल्या होत्या. त्यासंबंधीचे एक मनोरंजक पत्र उपलब्ध झाले आहे, ते असे. "अखंडित लक्ष्मी आलंकअत राजमान्य श्री विसाजी केशव आसीर्वाद विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावे. विशेष. श्रीमंत सौभाग्यादिसंप मातुश्री पार्वतीबाई व रमाबाई श्री गणपती पुले येथे येणार. तेव्हा रत्नागिरीसही येतील. तरी महादेव पाल व दतपाल आणखी दोनचार गलबते सदरहू पाल गोदीतून बाहेर काढून कार्याकारण चालते सामानाची तरतूद करून तोफांची सरबती करून दाखविणे. दोन वेला सरबती करणे, रा छ २८ जाखर (सुहुरसन ७०-१००-१०००+६०० = १७७०) सु॥ सबैन मयां व अलफ बहुत काये लिहिणे, लोभ करावा हे विनंती."

१७६८ साली पेशव्यांनी पुळ्याच्या गणपतीस अनुष्ठान केले होतें. त्यासंबंधी पत्र असे : "थोरल्या माधवरावांचे नाना फडणीसास विनंती, उपर, श्री क्षेत्र पुले येथे चे अनुष्ठानास चातुर्मास्यांत पाच ब्राह्मण पाठविले होते. ते अनुष्ठान समाप्ती करून पुण्यास आले आहेत. तर दर ब्राह्मणास रुपये १२० येकसेवीस, येकून पांचास साहाशे रुपये दक्षिणा देणे. छ. २१ रजब (मुसलमानी वर्षाचा ७ वा महिना) बहुत काये लिहिणे हे विनंती." (पे. द. भा. ३२ पृ. १०२-१०३)

सवाई माधवरावांच्या जन्माच्या वेळी कारभाऱ्यांनी पेशवाईस औरस अधिकारी व्हावा म्हणून अनेक देवांना अनेक नवस केले होते. त्यांपैकी पुले गणपतीला केलेल्या नवसांचा तपशील असा.

५००० रु.	श्रीपुळे ता. रत्नागिरी देवालयाचा जीणोद्धार पाच हजार रुपयांचा पुढे सामर्थ्यानुसार कालानुरुप जे रुपये लागतील ते लावून करावा.
८०० रु.	श्री पुळ्याचे गणपतीस ब्राह्मणभोजन एक हजार असामी मोदक करून देवाजवळ करावे. दर असामीस दक्षणा अर्धा रुपयाप्रमाणे भोजनखर्चसुद्धा रुपये ८०० शे.
१३६ रु.	श्री पुळ्याचे गणपतीस महारुद्र एक करावा. दक्षणा व भोजनदक्षणासुद्धा १३६ रु.
८० रु.	श्री पुळ्याचे गणपतीस ब्राह्मण भोजन असामी १०० मोदक घालावे दक्षणा दर असामीस आठ आणे प्रमाणे.

(इ स.ऐ.टि.ले. १८ पृ. २१-२२)

हरभट पटवर्धनांचे चिरंजीव गोविंदपंत नाना यांनी पुळ्याच्या देवस्थानांत बरीच बांधकामे केली. परशुराम भाऊ पटवर्धन यांनी सध्यांचे इमारतीचे तळमजल्यांत जेथे जामदारखाना होता ती इमारत बांधली. तसेच दुसऱ्या बाजीरावांत बाजीरावाला कैद करून त्याचा भाऊ चिमाजी आप्पा याला त्यांनी काही दिवस पेशवाईवर बसविले. त्या वेळी त्यांनी आपल्या या पुळ्याच्या कुलदैवताला नगारखाना करून दिला. पटवर्धन मंडळी सारीच निस्सीम गणेशभक्त. त्या सर्वांच्या पत्रावर 'श्री गणपती र्जयति' असाच श्रीकार असतो.

पुळ्याची अनेक बांधकामे या पटवर्धन संस्थानिकांनीच केलेली आहेत. त्यासंबंधी तपशिलाने पुष्कळच सांगतां येईल, परंतु येथे तेवढा निर्देशच पुरा आहे.

पुळे येथील धर्मशाळा थोरले माधवरावसाहेब पेशव्यांच्या सौ. रमाबाईसाहेब यांनी बांधलेली आहे.

पुळ्याच्या गणपतीचा नंदादीप नानासाहेब पेशव्यांचा आहे. सात जिल्काद इहिद्दे खमसेन म्हणजे २८ सप्टेंबर १७५० च्या पेशवे रोजकीर्दीत त्याबद्दल अशी नोंद आहे :

"खर्च पोता ४५ रू. धर्मादाय देणे श्री वास्तव्य पुळे नंदादीपाबद्दल साल गुदस्ताप्रमाणे रसानगी चिठ्ठी

३५ नंदादीपाबद्दल

१० त्रिंबकभट केळकर

४५

या गणपतीचा उच्छेद मुसलमानांकडून झाला होता. १७३३ ते ३६ पर्यंत जंजिरेकर शिद्द्याविरूद्ध पेशव्यांनींजी मोहिम केली, त्या काळांत शिद्द्यांनी पुळ्याचा गणपती विच्छिन्न केल्याची नोंद आढळते.

१८३० साली कॅप्टन डोवेल याने रत्नागिरी तालुक्याची पहाणी (सर्व्हे) केली. तयाची अत्यंत तपशील वार माहिती जमवून केलेल्या त्या अहवालांत या गणपतीपुळ्याबद्दल माहिती नमूद करण्यांत आली आहे ती तशी: "गणपती पुळ्याचे देऊळ नेवऱ्याचे कुळकर्णी गोविंदपंत खेर यांनी प्रथम बांधले. हे खेर थोरल्या बाजीरावांचे सरदार असून त्यांना बुंदेलखंडांत जहागिर मिळाली होती. त्यांना बुंदेलेच म्हणत. सुमारे १०० वर्षांपूर्वी म्हणजे १७३० साली त्यांनी हे देऊळ बांधले. चिंतामणाराव आप्पा पटवर्धनांनी पुढे पुष्कळच बांधकाम-विहिरी, तटाचे दरवाचे व एक मैल लांबीचा दगडांनी माचलेला रस्ता तयार केला. त्यासाठी ३० हजारांवर त्यांनी रूपये खर्च केले. देवाचे पुजारीपण नेवऱ्याच्या घनवटकरांकडे आहे. देवापुढे अधेली किंवा त्याहून अधिक कोणी ठेवले तर ते देवस्थानाकडे जमा होते, त्यापेक्षां कमी कोणी ठेवल्यास ती रक्कम घनवटकरांना मिळते. देवस्थानाकडे १४ नोकर आहेत. १ कारकून, ९ नगारखान्याचे लोक (हे मालगुंडचे गुरव आहेत.)

आणि ४ मराठे पहारेकरी; सरकारांतून या देवस्थानाला बाराणे रूपयांची नेमणूक आहे. मिरजकरांनी देवरूख महालांतील काटे नावाचा एक गांव देवास दिलेला आहे."

तासगाव :

तासगाव येथील परशुरामभाऊ पटवर्धन यांनी बांधलेले तेथील गणपतीचे देवालय हेही महाराष्ट्रांतील एक प्रेक्षणीय व विख्यात असे देऊळ गणले जातें. परशुरामभाऊ हे निस्मीस गाणपत्य, आणि त्या वीर पुरुषाला समरांगणांतच मृत्यू आला, तो दिवसही अंगारकी-संकष्टी चतुर्थीचाच होता. अशा गाणपत्याने स्थापन केलेले देऊळ म्हणून जशी त्या देवळाची अपूर्वाई तशीच त्या देवळाच्या बांधकामाचीहि आहे. भाऊंचे सारे पराक्रम कर्नाटक लढायांत झाले. त्या प्रान्तांत त्यांची हयातच गेली म्हणाना! त्यांना तिकडील देवळांच्या भव्य गोपुरांच्या शिल्पांचा चांगला परिचय म्हणून त्यांनी महाराष्ट्रांत तरी केवळ अपूर्व असे तासगांव येथील गणपतीच्या देवळाचे भव्य गोपूर बांधले.

हे देवालय फार शोभिवंत व भव्य व्हावे म्हणून भाऊंनी दूरदूरचे करागीर आणले होते. देवालयांत श्रीगणपति पंचायतनाची स्थापना शके १७०१ फाल्गुन शु॥ ९ या दिवशी त्यांनी सुमूहूर्तावर मोठ्या समारंभाने व थाटामाटाने केली. पेशवे दरबारांत खटपट करून भाऊंनी या देवस्थानाकरितां दोन हजार रुपयांची जमीन व दोन हजार रुपये वर्षासन करून घेतले.

सांगली :

पटवर्धन कुळांतील दुसरे एक वीर पुरुष सांगली संस्थान-निर्माते चिंतामणराव आप्पासाहेब यांनी स्थापलेले सांगलीचे गणपतिमंदिर हेही दक्षिणेत विख्यात आहे. त्यांनी आपले राज्यच गणपतीला अर्पण करून गणपति महाराजांचे स्वतंत्र संस्थानच निर्माण केले. सांगली संस्थान इंग्रजी अमलांतही थोडेबहुत टिकून होते. परंतु आपल्या नव्या स्वराज्यांतच ते संपूर्ण संपले; तथापि या गणपति महाराजांचे संस्थान मात्र पूर्वीसारखे अभंग चालू आहे.

सन १८४३ साली म्हणजे शके १७६६ च्या चैत्र शु. १० भृगुवारी गणपतिमूर्तीची अर्चा यथाविधी जाली. वास्तविक या गणपतीच्या देवालयाचे कामास सन १८११ मध्येच सुरुवात झाली होती. ३० वर्षे काम चालू होतें, ते वर म्हटल्याप्रमाणे १८४३ मध्ये पुरे झालें. गणपति पंचायतनापैकी ४ देवतांची अर्चा त्याच वर्षीच्या अखेरीस म्हणजे शके १७६६ चे फाल्गुनांत करण्यांत आली. अर्चेचा

सोहळा फार मोठा लग्नसमारंभाप्रमाणे केला.

श्रीमंत आप्पासाहेब देवळाच्या आवारांतच वाडा बांधून रहात होते. त्याला बाहेरचा वाडा म्हणत. किल्ल्यांतील वाडा-ज्यांत राजघराण्यांतील मंडळी रहाण्याचा ते- 'सरकार वाडा' आणि स्वत: आप्पासाहेब रहात तो हा 'बाहेरचा वाडा.' अर्चेचा खर्च २६ हजार ६४२ रुपये झाला. अर्चेकरितां लांबून अनेक याज्ञिक, वैदिक, शास्त्री आणि पंडित बोलावले होते; त्यांना २ पासून १२ रुपयेपर्यंत संभावना दिली. तो खर्च १६७९ रूपये झाला. रमण्यांत दक्षणाही वांटली, ती ११३८३. रुपये झाली. देवालवयाचे कामावरील कारागिरांना रूप्याचे कडीतोडे देण्यात आले. प्रत्येक देवाच्या सिंहासनाखाली सोने, रूपे व पंचरत्ने घातली आहेत.

१८२० साली सांगलीकरांशी इंग्रजांचा पक्का तह झाला, त्या वेळी इंग्रजांनी बेळगांवास आप्पासाहेबांस मेजवानी करून जवाहीर दिले. तेय त्याच वेळी आप्पासाहेबांनी गणपतीस देऊन टाकले.

महाराष्ट्रांतील दुसरी प्रसिद्ध गणपतिस्थाने ही:

(१) चौलचे सिद्धिविनायक मंदिर.

"सन १८५२, ९ सप्टें, बगमभट प्रथम याचे सेतातोन बिन्हा आला आहे तो बिन्हा श्री सिद्धीविनायक गणपती सेतनजीक चांभारतले या शेतात बिन्हा आला."

('आंगरेकालीन अष्टागर' पृ. ११३)

(२) श्री वक्रतुंड गणपति देवालय.

"महाल आवास तर्फ अष्टागर मामले चेऊल जीर्णोद्धार कर्दे आपाभट भाटे मुतालिक देशमुख दि॥ बाळाजी बाजी राव पेसवे तर्फसाष्टी."

('आंगरेकालीन अष्टागर' पृ. २२)

(३) मानाजी आंग्रे यांच्या कारकिर्दीत शके १६५६ तागाईत १६८० यांत जी देवालयें नवी बांधली व ज्यांच्या जीर्णोद्धार केला त्यांची नांवे आहेत. त्यांत श्रीमुक्षे गणपतीचा जीर्णोद्धार आहे. "जीर्णोद्धार श्रीमुक्षे गणपती मो चेऊल तर्फे मातुश्री आईसाहेब १ (अन्यत्र मुक्षे विनायक न्याती सोनार हाली जीर्णोद्धार लक्षुमबाई अयाल कान्होजी आंगरे सरखेल कुलाबा उपाध्ये बालंभट तैत्र पुराणिक प्रोसी आगरकर."

('आंगरेकालीन अष्टागर' पृ. ३२)

(४) "मठ (मढ ?) येथील गणपतीचे देवालय त्यानीच (कल्याण सुभेदार बिवलकर रामाजी महादेव) बांधले. देवाची स्थापना शके १६९४ चैत्र शु.॥ ५ झाली. स्थापनेस १५८ रु. १५ खर्च आला." (सन १७७२)

(५) नामलगांवचा (मराठवाडा, जि. बीड गणपतीही प्रसिद्ध आहे. त्याला पेशव्यांनी नवस केला होता. सबा मयातेन छ २१ सवालच्या पेशव्यांच्या रोजकिर्दीत ११ वर्षांकरितां देवाच्या पोशाखाची तरतूद केल्याची नोंद अशी: "छ २१ सवाल बद्दल श्री गणपती वास्तव्य नामलगाव यास वस्त्राबद्दल सन खमस तिसईनाप्रमाणे इस्तकवील सीत तीस्सेन तागाईत सालमजकूर सन सबामयातेन एकूण ११ साला दरसाल कापड आंख १९६ प्रमाणे आंख २१५६ दर रुपयास आंख प्रमाणे रसानगी यादी रुपये ४३१."

(६) होळकराच्या पुण्यावरील स्वारीचे वेळी दुसरे बाजीराव वसईस जाऊन राहिले होते. पुढे सन १८०४ साली त्यांनी वसईतील बाजीपुरा येथे असलेल्या गणपतीला नेमणूक करून दिली. त्यासंबंधी त्यांच्या खासगी जमाखर्चातील महत्त्वाची नोंद अशी: "अबी मयातेन शके १७३१ छ २९ सवाल दफाते श्री गणपती वस्ती बाजीपुरा ता. वसई यास पुजा, नैवेद्य व नंदादीपाची वगैरे नेमणूक सरकारातून नाही. सबब पूजा, नैवेद्य, नंदादीप व वस्त्रें व गणेश चतुर्थीचा उत्साह मिलोन सालमजकुरापासोन सालीना नेमणूक रूपये ७५ करून दिली आहे."

(१२ फेब्रु. १८०४)

(७) अणजुर (जि. ठाणें) येथील वाडींतील गणपती इतिहासप्रसिद्ध आहे. फिरंगाणातील पोर्तुगिजांच्या धर्मच्छळास कंटाळून पेशव्यांच्या पदरी पडून ज्या गंगाजी नाईक अणजूरकराने वसई मोहिमेंत पेशव्यांस फार फार मदत केली, तो गंगाजी नाईक मोठा गणपतिभक्त होता. मोरगांवास जाऊन त्याने तप केलें, व श्रीचा दृष्टान्त मिळाल्यावर तो चिंचवडकर देवांकडे गेला, व त्यांच्याच सल्ल्यानुसार पेशव्यांचा हस्तक बनला. चिंचवडकर देवांनी त्याला जी गणपतीमूर्ति दिली, तिचीच स्थापना त्याने अणजूर येथे केलेली आहे.

असे स्थानिक महत्त्वाचे गणपती कितीतरी आहेत. खुद्द एकटें पुणे शहरच घेतले तर त्यांत अशा गणपतींची समृद्धी सांपडेल.

दुसऱ्या बाजीराव पेशव्यास १८१०-११ साली पुत्र झाला, त्या वेळी पुण्यांतील झाडून साऱ्या देवांना दक्षिणा ठेवण्यात आली त्यांत पुढील ची नोंद आहे.

१. हरिपंत फडक्यांनी स्थापलेला गणपती, रविवार पेठ. २. रविवारातील गवळीआळीतील नंदाप्पा बालेकर यांचे घरानजिकचे गणपतीचे देऊळ. ३. सोमवार पेठेतील दलपत गोसावी यांचे समाधीतील तीन सोंड्या गणपती. ४. बेलबागेतील गणपतिमंदिर, (बुधवार पेठ). ५. बुधवार पेठेतील चोपदार यांचे घरापुढे रस्त्यांत असलेले देऊळ. ६. शुक्रवार पेठेतील नारो शिवराम चक्रदेव यांचे घराचे दक्षिणेस जांभळीचे झाडाजवळील गणपतीचे देऊळ. ७. शुक्रवार पेठेतील यशवंत सखाराम

पानसे यांचे वाड्याचे पूर्वेस रस्त्यास गणपतीचे देऊळ. ८. शनिवार पेठेत ओंकारेश्वर देवळातील गणपती. ९-१०. अमृतेश्वर व सिद्धेश्वर देवळांतील गणपती. ११. शनिवारवाड्याच्या गणेश दरवाज्यावरील डावे बाजूचा गणपती. १२. नारायण पेठेतील मातीचा गणपती. १३. मोदीचा गणपती. १४. सदाशिव पेठेत कुंभारआळीतील गणपती. १५. पेठ नरसीपुरा (सध्या सदाशिव पेठ) येथे भिकारदास यांचे बागेतील गणपती. १६. कसब्यांतील प्रसिद्ध प्राचीन गणपती. १७. कसब्यांत चावडीचे पश्चिमेस असलेले गणपतीचे देऊळ. १८. गुंडाचा गणपती (नागोजी गुंड यांचे घराजवळील पारावर). १९. गणेश पेठ डुल्या मारुतीचे उत्तरेस लगत रस्त्यातील गणपतीचे देऊळ. २०. गंजपेठेत लकडे यांच्या घरानजिकचा गणपती. २१. मौजे पर्वती सारसबाग तळ्यांतील गणपती. २२. विठ्ठलवाडीस जाताना वाटेवरील गणपती. २३. विठ्ठलवाडीस जातांना मार्गी उजवे बाजूस गोसावी यांचा गणपती. २४. गणेशखिंडीतील गणपतीचे देऊळ. (दु. बा. पेशवे रोज. पृ. २८४ ते ३०९, ले. २५३/२३१)

पेशव्यांच्या घराण्यापुरते पाहिले तर गणपतीचे भक्त नानासाहेब, थोरले माधवराव व अमृतराव हे तिघेच दिसतात. पहिले बाळाजी विश्वनाथ किंवा थोरले नाना यांच्या दैवतांसंबंधी कांही माहिती उपलब्ध नाही. बाजीरावसाहेब व चिमाजी आप्पासाहेब हे शिवभक्त होते. त्या दोघांचा चिंचवडकर देवांशी फार घरोबा होता व त्यांवर त्यांची भक्तिही होती. तथापि त्यांची मुख्य उपास्यदेवता गणपती खचित नव्हती. ब्रह्मेन्द्रस्वामी, कायगांवकर पाटणकर दीक्षित इत्यादि सत्पुरुषांप्रमाणे ते चिंचवडकर देवांना मानीत, त्यांचा प्रसाद घेत, त्यांना इनामे, देणग्या देत, आदरभाव दर्शवीत, चिंचवड संस्थानचा माल इकडून तिकडे नेण्या-आणण्याचा असता जकात माफीची दस्तके देत, इतकेच दिसते. तत्कालीन धार्मिक समजुतीप्रमाणेच इष्टकार्यसिद्ध्यर्थ निरनिराळ्या क्षेत्रांचे ठिकाणी अनुष्ठाने पेशवे करवीत असत, त्यांत केव्हा केव्हा मोरगाव, चिंचवड, थेऊर या गणेशक्षेत्रांतही बाजीरावसाहेब किंवा चिमाजी आप्पासाहेब यांनी अनुष्ठाने करविल्याचे दाखले सापडतात. उदाहरणार्थ, पेशवे दप्तर भाग २२ मधील १७३४ सालची ही नोंद पहा:

छ १५ जमादिलौवल (मुसलमानी वर्षाचा पाचवा महिना. १५ रोजी)
अनुष्ठानखर्च. थेऊरास (अनुष्ठान) केले त्यास दक्षिणा.
२१६ रू. नमस्काराबद्दल.
१२० रू. भास्करभट, एक लक्ष वीस हजार नमस्कार
९६ नारंभट ९६००० नमस्कार.
२१४ प्रदक्षणेबद्दल.
५७ अनंतभट, ५७ हजार प्रदक्षिणा.
५७ बालंभट, ५७ हजार प्रदक्षिणा.

पेशव्यांच्या वाड्यात गणपतीपूजेचा व उत्सवाचा प्रघात नानासाहेब पेशव्यांमुळे पडला. कुटुंबातील कर्तबगार. नामांकित माणसाने सुरू केलेले संप्रदाय जसे पुढील वंशज कुलाचार म्हणून सतत चालू ठेवतात तोच प्रकार वरील गोष्टीसंबंधी दिसतो. नानासाहेबाची गणपतीवर इतकी निष्ठा होती की, तत्कालीन गाणपत्यांत तो अग्रेसर समजला जाऊ लागला. इतिहास मंडळाच्या एका अहवालात श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी ओंकार घराण्यातील एका तत्कालीन बाडावरून गणपतिभक्तांची एक छंदोबद्ध मालिका प्रसिद्ध केली आहे, त्यात नानासाहेबाचा प्रामुख्याने उल्लेख सापडतो. गणपतिभक्तमुळे चिंचवडकर देवांवर त्याची फारच निष्ठा जडली होती. तो त्यांस किती मानी हे पुढील उल्लेखावरून चांगले दृष्टोत्पत्तीस येते- "शके १६८२ विक्रमनास संवत्सरे. इहिदे सितैन मया व अलफ. (१-६०-१००-१००० = १७६१) भाद्रपदमासी चिंचवडचे देव धरणीधर महाराज, मोरगावाहून आले. श्रीमंत मोतीबागात असता गैर राबत्यामुळे खबर पावली नाही. यामुळे श्रीमंत अंतर्महालात असता धरणीधर महाराज रूसून नदीपलीकडे न उतरता संस्थानी चिंचवडी जाऊन पावले. नंतर श्रीमंतास खबर लागली, तेव्हा श्रीस आपले हाते पत्र लिहून कोन्हेर त्रिंबक येकबोटे यांस पाठविले. त्यांनी जाऊन संस्थानात समारंभासहित देवास घेऊन आले. श्रीमंती नदीपलीकडे डेरे देऊन साहित्य पावते केले. महाराज आले. श्रीमंती रूप्याचा देव्हारा दिल्हा व हाती देऊन त्याचे खर्चास मौजे बाणेरे तालुका हवेली हा गाव इनाम करून दिल्हा. संतोष करून वाटे लावले." (पुरंदरे दप्तर भा. ३, पृ. ११२, शिवापूरकर देशपांडे शकावली).

श्रावणमासांत लाखो रुपये खर्च करून विद्वत्परामर्श घेण्याचा रमण्याचा मोठा उत्सव जसा बाजीरावाने सुरू केला. त्या आधी पेशव्यांच्या घरात हा उत्सव होत नसे. यासंबंधी शकावलीकार स्पष्टच उल्लेख करतो तो असा: "राजे भोसले यांचा बंदोबस्त सातारियास राखून आपण राज्य केले. पुणियाची वस्ती वाढविली. गणपतीचा उत्सव करू लागले. वडियात सात खणी इमारत बांधून नाचाचा दिवाणखाना केला. गणपतीचा उच्छाह तेथे करीत होते." (पुरंदरे दप्तर भा. ३, पृ. ११५)

गणपती हे नानासाहेबांचे मुख्य आराध्यदैवत होते, तर त्याने पर्वतीस गणपतीचे मुख्य देऊळ का बांधले नाही, असा कोणी साहजिकच प्रश्न करतील. त्याला उत्तर असे की, पर्वतीच्या टेकडीवरील स्वयंभू देवता पर्वताई देवी होती. नानासाहेबाची आई काशीताई हिला पायाचे काही दुर्धर दुखणे होते, ते या देवीला नवस केल्यामुळे गेले आणि म्हणून नानासाहेबाने आईचा नवस फेडण्याकरिता स्वत:च्या मातृभक्तीचे चिरकालीन स्मारकच होऊन राहील असे पर्वतीचे रमणीय देवस्थान निर्माण केले.

अब्दालीच्या स्वाऱ्या होऊ लागल्या तेव्हा तत्कालीन भाविक धर्मसमजुतीप्रमाणे नानासाहेबाने आपल्या इष्ट देवतास नवससायास करणे साहजिकच होते. त्यासंबंधी कांही उल्लेख वाचनीय आहेत. उदाहरणार्थ: "अब्दालीची फत्ते मल्हारराव अथवा भाऊसाहेब अथवा दादासाहेब यातून कोणीही केलिया वेंकटेशास रूपये १०००० दहा हजार देवावे. काम जाहलियावर द्यावे. काम होईल तेव्हा करावे."

"चिरंजीव माधवरावजी यास त्रिंबक जेजुरी कुरकुंब मोरेश्वर येथे दर्शनास पाठवावे. थेऊरी जावे. चिंचवडी देवाकडे जावे.".

"गंगा म्हसले येथे गणपती गंगेत आहे. येथे चऊथरा चांगला बांधावा. देऊळ नवे थेऊरी महातारीच्या डोहावर केले आहे तसे करावे. आपूर्वस्थल आहे. हरि दामोदराकडे नेमोन सनद दिली आहे."

"खेड विसाद येथे गणपति नरसिंह एक दोन देव आहेत. त्यास पूजा नैवेद्य, नंदादीप ब्राह्मणभोजन दरसाल पाचशे रुपयेपर्यंत करावा. सिवरामपंतांनी करावे. हरी दामोदरांनी करावी. याप्रमाणे करावे. येथून सनद दिली आहे."

"मोरेश्वरी स्थलाची सोये करून नगारखाना घालावा. खर्च सुभाकडे नेमून द्यावा."

नानासाहेबामुळे अर्थात् गोपिकाबाईंचीही श्रद्धा गणपतीवर बसली होती. त्यासंबंधी एक उल्लेख असा सापडतो:

सु ॥ सबा आरबैन/(सुहुर सन ७-४०
राजमंडळ
स्वारी राजश्री पंतप्रधान
खर्च खोच मु ॥

नवस खर्च

परभारे रत्नशालेपैकी

छ १५ जिल्हेज श्री गणपति रांजणगाव वि॥ सौ. गोपिकाबाई याच्या डोल्यास पीडा जाहाली सबब द्रिष्टीचा नवस केला. रा बचाजी विश्वनाथत॥ रामाजी विश्वनाथ बरवे सोने.

नानासाहेबाइतकी वैभवशाली कारकीर्द दुसरी कोणतीच झाली नाही. त्या दृष्टीने गणपत्युत्सव फारच उत्साहाने पार पडत असे. खुद्द पेशव्याचा मुक्काम पाऊसकाळामुळे राजधानीस असावयाचा. श्रावणमास दक्षिणेच्या देकारामुळे अख्ख्या हिंदुस्थानांतून झाडून सारे विद्वान् व तमासगीर पुण्यास आलेले असावयाचे. अर्थात् श्रावणास जोडूनच भाद्रपदांत होणाऱ्या या गणपत्युत्सवास फारच रंग भरत असे, हे सांगणे नको. दुर्दैवाने या उत्सवांची तपशीलवार वर्णने मात्र सापडत नाहीत. तथापि पेशवे रोजकिर्दीतून त्रुटित उल्लेख सापडतात, त्यावरून थोडीबहुत कल्पना येते :

तारीख ५-८-१७५४

खर्च जित्रस-पाा राजश्री भाऊ राा गोविंद सिवराम ताा राघोजी गवडा गणपतीजव (ळ) फुलाचे झाड करून ठेवावयाबद्दल फुलमरीचे फिरंग्याने पेटी मखमली मढीव, आंत फुले रेशमाची (अशी) पाठविली ती पेटी लाकडी फुलासमवेत.

(पे. द. भा. २२, पृ. ९६, उ. क्र. १५३)
माहे जिल्काद
ता. १८-९-१७५४

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान

खर्चाचे बंद छ. ३०

गणपत्युत्सवास आलेल्या हरदास-गोसाव्यांची, नटव्यांची, गवयांची, कलावंतिणींची नावनिशीवर यादी बिदागीसुद्धा.

(पे. द. भा. २२, पृ. १००, उ. क्र. १५७)

पेशवे दप्तर भा. १८ मधील १२५ व्या पानावर गणपत्युत्सवांतला जो जमाखर्च घेतलेला आहे. त्यावरून १७६१ साली ५१ हरदास किंवा गोसावी, १०६ नृत्य-कुशल कलावंतिणी, ४४ गवई व नटवे (नटवे म्हणजे हल्लीच्या उत्सवांतील नकलाकारांचे पूर्वज), १७ पखवाज वाजविणारे, १० गुरव कर्णेकरी इतक्या लोकांचे कार्यक्रम झाल्याचे दिसते. पेशव्यांसारखा 'हिंदुस्थानचा सम्राट' उत्सव करावयास बसल्यानंतर अत्यंत गुणी व नामांकित कसबी कलावंत लोक येऊन हजेरी देत असतील हे सांगावयास कशास पाहिजे? त्या वेळेच्या सुबत्तेच्या मानाने बिदागीच्या रकमा मात्र आज फारच हलक्या दिसल्या तर नवल नाही. या ५१ हरदासांना ६३२ रुपये, कलावंतिणीना १५. नक्त बिदागीखेरीज या लोकांना कापड व पोशाखहि देण्यात आले आहेत. सध्यांचा गणेशोत्सव भाद्रपद शु. ४ पासून भाद्रपद शु. १४ पर्यंत चालतो. शनिवारवाड्यांतील उत्सव शु. १ पासून दशमीपर्यंत चाले. त्या वेळी गणपतीरंगमहाल हंड्या-झुंबरांनी व आरासेने अत्यंत शोभिवंत करण्यात येई.

नानासाहेबाने पार्वतीची व गणपतीची अशा दोन सोन्याच्या मूर्ति करविल्या, त्याप्रमाणे माधवरावानेहि आपल्या उत्कृष्ट भक्त्यनुरूप गणपतीची एक नवी सुवर्णमूर्ति मुद्दाम कर्नाटकांतील कारागिराकडून करवून आणविल्याचा दाखला पेशवे रोजकिर्दीत मिळतो तो असा : "छ १२ जमादिलावल सु. सबा तिसैन मया व अलफ सुा (मुसलमानी वर्षाचा ५ वा महिना. सुहुर-सन-७-९०-१००-१०००-६००=१७९७) तुलजाजी राजे चंदावरकर यांचेकडून सोन्याची गणपतीची मूर्ति घेऊन माणसे आली त्यास १४० रुपये दिले." (पे. द. भा. २२, पृ. १०३, उ. क्र. १६४, ता. १७-१०-१७६६)

माधवरावाच्या कारकिर्दीत गणपत्युत्सव चांगलाच साजरा होत असे हे सांगणे

नको. १७६७ साली झालेल्या शनिवारवाड्यांतील उत्सवासंबंधी पुढील दोन खर्चाच्या नोंदी आढळतात.

२६८२ रुपये गणपती उत्सवनिमित्त खर्च झाले. ह्या खर्चात मुख्यत्वेकरून हरदास, गवई, कलावंतिणी वगैरेंच्या बिदाग्या आल्या आहेत.

"१९५ रुपये, खाशा दिवाणखान्यांत लावावयासी खरेदी चित्रे रागमालेची सुमार ३६ येकून रसानगी यादी रुपये." (पे. द. भा. २२ पृ. १०८, उ. क्र. १७९, तारीख २५-९-१७६७ ते २४-१०-१७६७)

९-८-१७६८ चे पत्र : पत्र पंतप्रधानास कोरीगडाहून गणेश चतुर्थीच्या महोत्सवाकरिता.

"मोरपिसे मागविली आहेत तरी त्याप्रमाणे प्रयत्न करून रवाना करतो."

पेशवे रोजकिर्दीत माधवरावसाहेबांनी एक नीलरत्नांची गणपतीची मूर्ती मुद्दाम करून घेतली होती. ही मूर्ती कोणा मणिराम पाथरवट नावाच्या कारागिराकडून घडविली गेली. ती घडविण्याचे काम पेशव्यांच्या जवाहिरखान्यांत बसूनच त्याला करावे लागे. मूर्ती तयार होत असता माधवराव पेशव्यांनी नाना फडणिसांना स्वारीतून मुद्दाम असे लिहिले होते की, "तुम्ही मणिरामाचे काम जातीने पाहावे. त्याने मूर्ति चांगली केली असली, तर उत्तम झाले. त्याच्याने न होय तर बखतरायाकडून चांगली करणे चांगली सिरा मूर्ती होय हे पाहाणे." (१७७० जानेवारी)

माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणराव गादीवर आला. त्याची कारकीर्द अवघी सात-आठ महिन्यांची. त्याच्या कारकिर्दीत वाड्यांत उत्सव झालाच, पण गणेशोत्सवांतच म्हणजे शु. १३ स गारद्यांनी शनिवारवाड्यांत त्याचा खून केला. हीच तेवढी त्याच्या कारकिर्दीतील उत्सवासंबंधाने कायमची लक्षात राहण्यासारखी गोष्ट झाली!

नारायणरावाच्या मृत्यूनंतर पहिली २-३ वर्षे पुण्याच्या दौलतीला फारच संकटाची गेली; त्यामुळे शनिवारवाड्यांत उत्सव तांत्रिक करविण्यात येत असे. १७७४ सालच्या पुण्यांतील गणपति उत्सवासंबंधी नाना फडणिसाची दोन आज्ञापत्रे पाहण्यासारखी आहेत. त्यावरून उत्सवाचे काही अधिक तपशीलही कळतात. पत्रे अशी :

"राजश्री नारो आप्पाजी स्वामी गो।। विनंती उपरी पत्र पाठविले ते पावले. गणपती उच्छाहाची याद पावली. अनुष्ठानाचे येकवीस ब्राह्मण ४ दिवस लावणे. कलावंताचे ताफे चांगले ५-७ व हरनास जुने बहुता दिवसांचे ७-८-१० पर्यंत असतील तितके, या करवी उच्छाह करणे. सालाबादप्रमाणे इतक्यांत बिदाई करणे. विशेष काही करावयाचे नाही. जाणिजे." (पे. द. भा. ३२, प. क्र. २७)

"राजश्री नारो आप्पाजी स्वामी गो।। यांसी विनंती उपरी श्री गणपतीचा उत्साह होत आहे. ह्यास ललिताचे दिवसी समारंभ बहुत होत असे. तो तसा करावयाचा नाही. नित्य हरिकीर्तन होत असते. त्याप्रमाणेच ललिताचे रोजी करून ललिताच्या ४ ओव्या म्हणून आरती करवावी. खिरापत वाटल्यानंतर स्वस्तपणे बसोन प्रसाद श्रीमंतास वगैरे देणे ते द्यावे. बंदोबस्त चांगला राखावा. गणपती पोहोचवा त्या दिवशी पालखीत गणपती घालून समागमे वाजंत्री यांचा एक ताफा देऊन पोहोचवावा. आणखी समागमे न देणे. थोडक्यात लिहिल्याप्रमाणे करावे. जाणिजे. छ ५ रजबसु।। (५-७०-१००-१०००-६०० = १७७५) खमस सबैन मया व अलफ हे विनंती." (पे. द. भा. ३८, प. क्र. २८)

१७७८ साली सवाई माधवराव पुरंदरावर होता. त्या वर्षी गडावरच उत्सव मोठ्या प्रमाणांत करण्यात आला. या वेळी सवाई माधवराव अवघा ३-४ वर्षाचा असेल. उत्सवाची सुंदर माहिती मल्हार बल्लाळाच्या पत्रांत आली आहे ती अशी :

२८-८-१७७८

"सेवेसी मल्हार बल्लाल साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ६ साबानपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. पुरंदरी श्री गणपतीचा उत्साह चतुर्थीपासून काल शुक्रवारपर्यंत यथास्थित जाहला. रात्रौ नित्य श्रीमंत कथेस बसत होते. दीड पावणेदोन प्रहरपर्यंत रात्र कथेस होत असे. काल सा घटिका दिवस शेष राहिला होता. तेव्हा श्री गणपतीचे प्रस्थान जाहले. स्वारीसमागमे श्रीमंत गेले होते. पर्जन्याची झड बसली होती. परंतु स्वारी जाते समयी चांगला पर्जन्य उघडला होता. स्वारीस शोभा फारच चांगली आली होती. राजहंस बच्चा हत्ती याजवर जरिपटका दिला होता. व तेजरावा हत्तीण शिवापुराहून आणिली होती. श्रीमंतांची मर्जी बहुतच प्रसन्न होती. आज तेजरावा हत्तीण मागती शिवापुरास रवाना केली. स्वारीचा बंदोबस्त राजश्री बळवंतराव पटवर्धन यांनी चांगला केला होता. आपण श्रीमंताचे पालखीजवळ होते. स्वामीच्या वाड्यापुढील रस्त्याने थोरल्या तळ्याकडे स्वारी गेली होती."

(पे. द. भा. ३, प. क्र. २९)

या सालचा हा उत्सव पुण्यातंहि सरकार वाड्यांत म्हणजे शनिवारवाड्यांत पूर्वीच्या चार वर्षांपेक्षा फार उत्साहाने झाला असे परशरामभाऊ पटवर्धनांनीही आपल्या पत्रांत लिहिले आहे. ते म्हणतात : "सरकार वाड्यात चतुर्थीचा उत्सव होत आहे. आज चार वर्षे संकलितच करीत होते. (पण) यंदा उभयतां कारभारी (नाना फडणीस व सखारामबापू) येथे (पुण्यास) आहेत. त्यामुळे समारंभ बराच होत आहे."

सवाई माधवरावाच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी हा उत्सव फारच चांगला झाल्याचे नमूद आहे. त्यासाली १८१ कथेकऱ्यांच्या कथा झाल्या व त्यांना २१५५ रुपये बिदागी दिली. हरदासांखेरीज गवई ३९, कलावंतिणीचे ताफे ४, गुरवपखवाजी ४३, वाजंत्री ताफे २५ आले होते. त्यांना अनुक्रमे ३२९, १०२६, १२३ व २४० रुपये नख्त बिदागी व खेरीज कापडचोपड देण्यात आले. या उत्सवात सर्व

लहान मोठ्या कामगारांस भाग घ्यावा लागे. त्यांनाही ... गरिबांस शिधा वाटीत. वाड्यांत ब्राह्मणभोजने होत. शेवटच्या दिवशी फुलांनी व मढविलेल्या पालखीत उत्सवमूर्ती घालून वाजतगाजत मिरवणूक काढून तिचे नदीवर विसर्जन होई. त्या वेळी पेशवे पायउतारा पालखीबरोबर समागमे असत. इंग्रज रेसिडेंट मॅलेट हाही पेशव्यांच्या गणपती उत्सवात हजर राहिल्याचे दोन मौजेचे उल्लेख पारसनिसांच्या "सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार' या पुस्तकांत आले आहेत.

"सेवेसी महादजी चिंतामण याची विज्ञाप्ति की, सर चार्लस वारे मालिट इंग्रज आज तिसरे प्रहरी राजश्री हरिपंत तात्या त्याचे वाड्यात श्री गणपती उत्साहानिमित्त मंडळीसुद्धा आले होते. तात्या काही कचेरीस बसले नव्हते. पोट फार दुखत होते. राजश्री दाजीबा व बाबा व अन्याबा व माधवराव यांजप्रमाणे बसले होते. व राजश्री बहिरोपंतबाबा व त्यांचे पुत्र अन्याबा आले होते. मी प्रात:काळी राजश्री परशरामभाऊ यांजला घेऊन मालिटाकडे आमंत्रण केले होते. राजधी बहिरोपंत बाबांनी याजप्रमाणे सांगितले होते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति."

"सेवेसी महादजी चिंतामण याची विज्ञाप्ति की, मालिट इंग्रज यांस श्री गणपती उतसाहाबद्दल आमंत्रण सरकारचे वाड्यांत राजश्री आन्याबा मेहेंदळे यांनी सोमवारी तिसरे प्रहरी या म्हणोन आपली आज्ञा सांगितली होती. आज्ञेप्रमाणे मंडळीसुद्धा उदईक मालिटास आमंत्रण केले. यासी तिसरे प्रहरी येतात. सेवेसी श्रुत होय विज्ञप्ति."

दुसरा बाजीराव हा राघोबाइतकाच कडक शिवभक्त होता. राघोबादादाला याच्या शिवभक्तीच्या अतिरेकामुळे 'सांब' हेच टोपण नाव मिळाले होते. "दादासाहेब ग्यप्रतापी निस्सीम शिवभक्त" असा शाहिरांनीही त्याचा गौरव केलेला आहे. त्याच्या पत्रांतून श्रीकाराचे जागी 'श्री सांबो जयति' हेच शब्द असत. त्याने माधवरावाशी भांडून अमृतराव दत्तक घेतला तेव्हापासून 'श्री सांब; सपुत्रो जयति' असे शब्द तो शिक्क्यांत घालू लागला. अशी एका संशोधकाची उपपत्ति आहे. ती खरी असो वा खोटी असो, राघोबादादाच्या श्रीकारांतील सांबपुत्र म्हणजे गणपती. त्याची भक्ती अमृतरावाने उचलली येवढे मात्र खरे. बाजीरावाने शिवाची व अमृतरावाने गणपतीची अशा वाटण्या झाल्या. तथापि कुळाचार म्हणून दरसालचा गणेशोत्सव बाजीरावास शनिवारवाड्यांत करावाच लागे. १७९९ सालच्या उत्सवांत बाजीरावाने कायगावकर, लक्ष्मी नारायण दीक्षितास पालखी पाठवून आणल्याचे पत्र राजवाड्यांच्या खंडांत छापलेले आहे. बाजीराव पुण्यास नसला तर कोपरगावास जाऊन उत्सव करी, असेहि ऐतिहासिक लेखसंग्रह प. क्र. ६१४९ व ५० वरून दिसते.

पेशवाईतील शेवटच्या गणेशोत्सवाचा उल्लेख १८१५ सालचा सापडतो. त्यावर्षी बाजीरावाने १५ शे रुपये "गणपती व रुद्धी सिद्धीच्या मृणमय मूर्ति करण्या" कडे खर्च करावयाचे व हंड्याझुंबरांतून 'एक हजार रुपयांच्या मोंबत्या म्हणजे मेणबत्त्या लावावयाच्या असा संकल्प केल्याचे पे. द. भा. ३२, प. क्र. ३० वरून दिसून येते.

तिस्सा मयातेन रजब उर्फ भाद्रपद

दु. बा. खाजगी जमाखर्च (सन १८०८)

रु.	तपशील
४४०	भाद्रपद शु. ४ स श्री गणपती स्थापना झाली. सबब भूयसी दक्षणा खर्च छ. २ रजब
३८	भाद्रपद शु. ४ श्री गणपती दर्शने घ्यावयास गेलो तेथे दक्षिणा वगैरे छ. २ रजब
६१४४	भाद्रपद शु. ३ छ १ रजब पासोन तागाईत छ. १२ रजब शु. पौर्णिमा १२ दिवस पावेतो, श्री गणपती उत्सवानिमित्य दररोज पाचशे ब्राह्मण भोजन समई दर ब्राह्मणास १ रुपयाप्रमाणे दररोज ५१२ रु. प्रमाणे छ. १२ रजब.
३६२२	गणपती उत्सवात लवंग, वेलदोडे, जायफळ, जायपत्री छ ११ रजब
२९	गणपती जावयाचे दिवशी केशरीरंग जाहला छ १२ रजब
४३८	गोसावी यास शेला पागोटे ११ रजब.
२१७६	मेणवाती उत्सवात ११ रजब
३८३४	(४२२ रोषणाई, ३३ रु. शेलापादुका काढावयाबद्दल लळीताचे वेळेस)
१४७५	गणपती जावयाचे दिवशी कलवांतीणी वगैरे यांस दुपट्टे वगैरे
११३६	फुलांचे हारतुरे
७३८	तेवज खर्च
३८३४	
२६४०	संत भोजन छ १ रजब
२१७	गणपती उत्सवात बुक्का व क्षीरापत. छ १२ रजब
४८	गणपती उत्सवात अत्तर गुलाब गुजारात बाजी महीपत रांजणगावकर रामचंद्र गोसावी यांचे जावई छ १२ रजब
५०	गणपती उत्सव गणपती नदीस जाते समयी गुलाल १४ रजब
६०५०	गणपती उत्सवात हरदास वगैरे यांस शिधे १४ रजब
६६८	गणपती उत्सवाच्या दिवाणखान्यात नव्या बिछाईती केल्या छ १४ रजब

२६९ श्री गणपतीपुढे उत्सवात दोन चोपदार उभे राहतात. त्यांस अंगावर घालावयास पोशाख छ रजब

८००० गणपती उत्सव बिदागीबद्दल गुजारात रामचंद्र गोसावी व गोविंद गोसावी छ १४ रजब

(हे जमाखर्च १८०८ सालचे आहेत.)

पेशवाईतील गणेशोत्सवाचा प्रारंभ व गणपती विसर्जन तसेच त्या दिवसांत चालणारे कार्यक्रम याबाबत अनेक उल्लेख कागदोपत्री आहेत.

"शुक्रवारी भाद्रपद शु. ४ स श्रीगणपतीचे उत्सवाचा दिवस. त्यास श्रीमंतांचे वाड्यात सर्व सिद्धता जाली. दोन प्रहरा मृत्तिकेचे गणपतीची स्थापना होऊन पूज्या अर्चा मोठा गजर करून जाली. वीस पंचवीस तोफांचे बार जाले व गारद्याच्या सिलक्या वगैरे जाल्या. याप्रमाणे राजश्री नाना फडणवीस यांचे येथे व राजश्री दाजीबा फडके यांचे येथे पूज्याविधी यथास्थित जाली." (पुणे अखबार ३.२१०) याच पत्रांत असाहि उल्लेख आहे : "सरकारवाड्यांत तृतीय प्रहरापासून चार घटका नाच जाला नंतर दो घटिका रात्रीस कीर्तनास आरंभ होऊन सहा घटका रात्रीस समाप्ती जाली. ऐसे प्रतिपदेपासोन नित्यशा होत आहे."

गणेशोत्सवांत गणपतिदर्शनासाठी परस्परांचे घरी जाण्याची प्रथा पेशवाईत होती. खुद्द पेशवेही याप्रमाणे आपल्या सरदारांकडे जात असत व सरदारमंडळी पेशव्यांकडील उत्सवाच्या कार्यक्रमांस हजर रहात असत. यासंबंधीचा उल्लेख सवाई माधवरावांबाबत असा आहे. "मदारुल महान (नाना फडणवीस) यांनी श्रीमंतांस पोषाख हिरवा बऱ्हाणपुरी दिला. अत्तर पानदान सर्वास विडे व फुलांचे हार व गजरे ऐसे दिले. यावर श्रीमंत तेथून निघाले ते आइतवार पेठेत राजश्री दाजीबा फडके यांचे हवेलीस गेले. मदारुल महान समागमेच होते. तेथे देवदर्शन झाल्यांवर एक घटिका स्थिर झाले. अत्तर पानदान इत्यादी मुदारतीचे साहित्य सर्वास पावल्यावर श्रीमंत तेथून निघाले ते कसब्यात श्रीगणपतीचे देवालय आहे. त्याचे दर्शनास जाऊन, नंतर तसेच आपल्या वाड्यांत माघारा गेले."

सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील गणेशोत्सवाचे वैभव फार मोठे होते. दुसऱ्या बाजीरावाच्या वेळेसही मोठ्या धामधुमीत हा उत्सव साजरा केला जाई. किंबहुना दुसऱ्या बाजीरावाच्या काळातील गणेशोत्सव पूर्वीच्या पेशव्यांच्या मानाने अधिक खर्चिक व भव्य प्रमाणांत होऊ लागला असेच म्हणावे लागेल. तो स्वतः या उत्सवातील सर्व कार्यक्रमांना जातीने उपस्थित राही. इतर सरदारांकडील वाड्यांत चालणाऱ्या गणपत्युत्सवांना आवर्जून भेटी देई.

तसेच गणपतिविसर्जनाच्या कार्यक्रमांतही तो समक्ष हजर असे.

१८०७ च्या गणपतिविसर्जनाची माहिती पुढीलप्रमाणे मिळते. "सरकारचा गणपती जावयाचा तेव्हा समस्य गृहस्थ व शास्त्री पंडित हरदास मुत्सद्दी मंडळी वगैरे आले होते. तेरा घटका दिवस आलेवर श्रीस जाग्यावरून उत्थापन केले. सहा घटका दिवसास मुहूर्त पालखीत बसविली. दोन घटका दिवस राहता उदकांत सोडली. उभयतां श्रीमंत (दुसरा बाजीराव त्याचा भाऊ चिमाजी आप्पा) पाईच गेले होते." (सांगली दप्तर - अप्रकाशित)

".. याप्रमाणे चौदा दिवस होऊन चतोर्दशीस अनंतचतुर्दसीचे दिवशी श्रीची रवानगी अस्तमानी केली. बरोबर सर्वत्र मंडळी गेली होती." असाहि उल्लेख सांगली दप्तरांत दुसरे एके ठिकाणी आढळतो.

यावरून, पूर्वी गणेशमूर्तिविसर्जन दशमीला व्हावयाचे ते पुढे चतुर्दशीला होऊ लागले, असे दिसते.

याप्रमाणे पेशवाई अखेरपर्यंत हा उत्सव साजरा होत असे. सन १८१८ च्या जूनमध्ये रावबाजीला आपली गादी सोडून इंग्रजांच्या नजरकैदांत बिठूरला प्रयाण करावे लागले; आणि पुढे लवकरच १८२७ त इंग्रजांनी हे गणेशोत्सव ज्या वास्तूंत साजरे होत तो शनिवारवाडाही जाळून टाकला. आणि कालाच्या ओघांत हा ऐतिहासिक गणेशोत्सवही बंद पडला.

अशा रीतीने गणेशोत्सवाचे राजवैभव लुप्त झाले. तरी गणेशदेवतेबद्दलचे जनमानसांतील स्थान अढळच राहिले. घरोघरी चालणारे गणेशोत्सव कमी-अधिक प्रमाणात चालतच राहिले. आणि पुढे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीअखेरीला त्याला पुनश्च महान लोकवैभव प्राप्त झाले.

❑

साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांचे सुपुत्र, महान साक्षेपी इतिहाससंशोधक य. न. केळकर यांचे लेखन म्हणजे अस्सल सोनं आहे. गेली अनेक वर्षे हा दुर्मीळ खजिना जणू विस्मृतीच्या गुहेत गडप झाला होता. तो पुन्हा प्रकाशात येताच त्याचा मूळचा झळाळ डोळे दिपवून टाकतो. आजच्या पिढीला याचे दर्शन व्हावे यासाठीच हा प्रपंच.

शिवपूर्वकालापासून मराठेशाहीच्या अंतापर्यंत एवढ्या विशाल कालपटावरून लेखक आपल्याला फिरवून आणतो. अनेक वास्तू, व्यक्ती आणि घटनांबद्दल मनोरंजक तरीही अस्सल माहिती पुरवतो.

समृद्ध अनुभव देणारं हे साहित्य अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य वाचकानेही वाचावं असेच आहे.

ऐतिहासिक लेखनातील अस्सल सोने

य.न.केळकर
यांचे
अनेक वर्ष उपलब्ध नसलेले साहित्य
आता उपलब्ध !

- इतिहासातील टेहळणी
- ऐतिहासिक पोवाडे
- इतिहासातील सहली
- ऐतिहासिक शब्दकोश
- मराठेशाहीतील वेचक-वेधक
- वसईची मोहीम
- भूतावर भ्रमण
  ऐतिहासिक लेखसंग्रह
- तंतकवि तथा शाहीर
- काही अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे

डायमंड पब्लिकेशन्स
१६९१, सदाशिव पेठ, शंकरप्रसाद बिल्डिंग,
ग्राहक पेठेजवळ, टिळक रोड, पुणे - ४११०३०
Email : diamondpublications@vsnl.net
शैक्षणिक संदर्भ ग्रंथ प्रकाशनात अग्रेसर